
# अंधारछाया

शशिकांत ओक



नेहा प्रकाशन

# अंधारछाया

ॐ नमःशिवाय

## शशिकांत ओक

नेहा प्रकाशन

ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

# अंधारछाया

लेखक व ईबुक निर्मिती : ©शशिकांत ओक.
पत्ता - ए- 4 / 404 गंगा हॅमलेट हौ. सोसायटी
विमाननगर, पुणे 411014.

मो. 9881901049
shashioak@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
G1102, Eternity, Teen Hath Naka, Thane
www.esahity.com
esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- या पुस्तकाची मूळ किंमत रुपये २००/- असून लेखकांच्या व मूळ प्रकाशकाच्या परवानगीने ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध करून दिले आहे.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे विनामूल्य फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची किंवा श्री शशिकांत ओक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या कादंबरीतील
पात्रे, प्रसंग आणि स्थळे
काल्पनिक नाहीत.
या पात्रांच्या प्रत्यक्ष फ़ोटोंसाठी आपण शेवटची पृष्ठे पाहू शकता.

# अंधारछाया

## प्रत्येक व्यक्तिमत्वाच्या छायेत अंधार लपलेला असतो.

## त्याचा शोध घेणारी

## आत्मनिवेदनात्मक, सत्यघटनांवर आधारित कादंबरी

कै. ती. दादांना व कै. आईस सादर समर्पित

**लेखकः शशिकांत ओक**

निवृत्त वायुसेना अधिकारी

# अंधारछाया

## लेखकाचे मनोगत

**ॐ नमः शिवाय**

ही कादंबरी रुपातील सत्यकथा आहे. या कादंबरीतील घटना १९६० च्या दशकातील प्रत्यक्ष अनुभवाच्या आहेत.

याचे लिखाण हा पहिल्या गुरूचरित्र पारायणाचा प्रचिती रुपाने मिळालेला प्रसाद आहे. सन 1985 ते 2013 पर्यंतच्या दर दत्त जयंतीच्या आधीच्या आठवड्यात गुरूचरित्राचे पारायण अखंडपणे चालू राहिले आहे. ही गुरूंची कृपा आहे कि या 28 -29 वर्षांच्या काळात बदल्या, सेवा निवृत्ती यामुळे वरचे वर घरे बदलली जाणे, सीमेवरील तणावाच्या वातावरणात काश्मीर, पंजाब सारख्या अत्यंत महत्वाच्या हवाई केंद्रावर जबाबदारीची व रात्रंदिवसाच्या ड्युट्यांची वेळ सांभाळून पारायणाच्या काळात कधीही खंड पडला नाही. ही गुरू महाराजांची कृपा दृष्टी होय.

1981पासून 1986 पर्यंतच्या सुमारास सुब्रतो पार्क मधील रेग्युलर क्वार्टर न मिळाल्याने मी नवी दिल्लीच्या जनकपुरी भागात राहात असे. तेथील दत्त विनायक मंदिरात आरतीला व त्या आधी बॅडमिंटन, चेस व मराठी पुस्तकांच्या लायब्ररीत तर कधी नाटकांच्या तालमींत मी रंगलेला असे. असेच एकदा माझे वरिष्ठ स्नेही कै. रमेश काजवाडकर यांच्याशी चर्चेत गुरूचरित्राचा विषय निघाला. गुरूचरित्र प्रचितीचा ग्रंथ आहे. संकल्प करून प्रचिती घ्यावी. असे त्या चर्चेत त्यांनी आवर्जून सांगितले. मग तर मी जरूर याचे पारायण करू इच्छितो व प्रचिती येते का ते आपल्याला जरूर सांगतो म्हणून थोडेसे

आव्हानात्मक बोलून गेलो. पोथीची समस्या त्यांनी आपल्या कडील पोथी देऊन सोडवली. मला आता संकल्प करून पारायण न करायला कारण ही नव्हते. थोडी रजा शिल्लक होती म्हणून वेळेचा प्रश्न ही सुटला.

पारायणाला बसण्याधी. मी संकल्प बोलून दाखवला, 'हे श्रीपाद श्रीवल्लभ, हे नृसिंह सरस्वती व दत्त महाराज, गुरूचरित्राचे पारायण करत आहे. तरी मला प्रचिती मिळावी ही आपल्या चरणी प्रार्थना. मी हे वाचन आपल्या प्रती दृढ श्रद्धाभाव ठेवून करत आहे.' सुरवात झाली व दुसऱ्या दिवशीचे वाचन झाले. तरीही काही प्रचिती मिळाली नाही. त्या दिवशी दत्त विनायक मंदिरात एकांचे कीर्तन होते म्हणून मी त्यासाठी पुढील रांगेत स्थानस्थ झालो. पण कीर्तनकारानी पुर्वरंगातील पद आळवायला चालू केले व मला मनाने अस्वस्थ वाटू लागले. मधेच उठून जाणे अशोभनीय असूनही सभास्थानाचा शिरस्ता मोडून मी घरी परतलो. वाटेत एक 200 पानी वही घेतली. अन डायनिंग टेबलपाशी खुर्चीत मांड ठोकून जो लिहायला बसलो ते लिहितच राहिलो. रात्री 2 वाजले तेंव्हा लेखनाचा वेग मंदावला. त्यानंतर रोज थोडे थोडे लिखाण होत राहिले. ते म्हणजे ही सत्य घटनेवर आधारित कादंबरी रुपात उतरलेली ही कथा. अशी या कादंबरीची नाळ गुरूचरित्राच्या पारायणाशी जोडली गेली आहे. त्या नंतरच्या प्रत्येक पारायणाच्या नंतर प्रचिती रुपाने घटना, किंवा अन्य रुपाने प्रेरणा, व्यक्तींच्या भेटी अशी प्रसाद रुपात प्रचिती येत राहिली आहे. अगदी नुकत्याच 2013 नंतरच्या पारायणानंतर घडलेल्या अदभूत घटनांची मालिका याचे उदाहरण आहे. त्याचे सूत्ररुपाने वेगळे सादरीकरण केले गेले आहे.

गुरूचरित्राच्या पारायणाची प्रचितीचा आणखी एक प्रखर दाखला म्हणजे माझ्या हवाईदलातील सेवेत माझ्यावर आलेले संकट व त्यामुळे निर्माण झालेली अत्यंत आणीबाणीची परिस्थिती. दृढश्रद्धा भाव व गुरूचरित्राच्या पारायणातून मागितलेली प्रचिती. याचा परिपाक म्हणजे गुरूकृपेने त्या संकटातून आश्चर्यकारकपणे लीलया मुक्तता  झाल्याची घटना. नंतर ‘मन में है विश्वास’ या सोनी टीव्हीवरील एका मालिकेत या घटनेवर आधारित 26 जानेवारी 2007 ला एक **एपिसोड** दर्शवला गेला. ही कथा मी हवाईदलातील काही निवडक मित्रांना रात्रीच्या निवांत वेळी तर कधी वैष्णोदेवीच्या वाटेवर सांगून रात्र जागवली होती. कदाचित म्हणून ती अंतर स्मृतीत दडली होती. मात्र ती पारायणाच्या निमित्ताने प्रचितीच्या माध्यमातून लेखन गंगेच्या रुपाने प्रकट झाली.

याशिवाय असे अनेक प्रसंग  घडत गेले की ज्यामुळे गुरूचरित्राच्या पारायणाची प्रचिती वारंवार मिळत राहिली. नाडी ग्रंथ भविष्य, ऑटो रायटींग आदि विषयांची गोडी व त्यावर लेखन कार्य ही त्याच कडीतील एक  एक भाग आहेत. असो.

‘तेरा काम हो जाएगा’ म्हणून मला नाडीग्रंथातील आदेशातून मिळालेल्या योगी राम सूरत कुमार नामक गुरूंची वाणी कशी साकार झाली याचे रंजक उदाहरण या कादंबरीच्या संदर्भात घडले. त्याचे असे झाले की ही कादंबरी दिवाळी अंकात प्रकाशित होऊन अनेक वर्षे लोटली होती. दिवाळी अंकाचे आयुष्य अल्प असते असे म्हणतात. ही कलाकृती पुस्तक रुपाने जपली जावी व वाचनालयात त्याला स्थान

मिळावे असे मला वाटे. पण ते घडत मात्र नव्हते. एकदा सुट्टीत पुण्याहून सांगलीला रेल्वेने जायचा प्रसंग आला. दुपारी दीडच्या गाडीत बसलो. माझ्या समोरील बाकावर एक जण आधीपासून प्रवासात असल्याने कदाचित निद्रासुखाचा आनंद घेत होते. त्यांच्या छातीवर वाचता वाचता डोळा लागल्याने एक पुस्तक पडले होते. त्यांच्या निद्रेत बाधा न आणता मी ते सहज चाळायला घेतले. नंतर काही काळाने त्यांना जाग आली. पुस्तकाच्या अनुरोधाने गप्पा निघाल्या. ते म्हणाले, 'ह्या पुस्तकाचे लेखक प्रकाशक ही आहेत. इस्लामपुरला असतात. ते अप्रकाशित लेखकांची पुस्तके छापायला तयार असतात.' मी त्या लेखकाचा पत्ता घेतला. चेन्नईला परतल्यावर त्यांच्याशी पत्राने संपर्क केला. त्यांनी 'छापीन पण हस्तलिखिताच्या बरोबर दहा हजाराचा ड्राफ्ट पाठवावा' असा प्रेमळ सल्ला दिला. मला ते शक्य नव्हते. पैशाची अट सोडून आपण पुस्तक छापायला तयार असाल तर हस्तलिखित पाठवीन म्हटल्यावर विचार करायला हस्त लिखित मागवले गेले. नंतर काय झाले कोणास ठाऊक त्यांनी पैशाच्या मागणीची अट रद्द करून पुस्तक छापायला सुरवात केली. काही काळाने ते प्रकाशितही झाले. पुढे सवडीने मला इस्लामपुरला जायचा प्रसंग आला तेंव्हा मी आवर्जून त्यांच्या पत्त्यावर संपर्क केला. ते प्रकाशक घरी नव्हते. पण त्यांच्या घरच्यांनी मला माझ्यासाठी ठेवलेले पुस्तकाचे पुडके दिले. त्यात अटी प्रमाणे दहा प्रती होत्या. कालांतराने त्या कमी होत शेवटी एकच हाती राहिली. (प्रकाशनाचे नाव मनोकामना किंवा असेच काहीसे होते असे अंधुक आठवते. पुस्तकाच्या सुरवातीला लेखक-प्रकाशक यांचे नाव, पत्ता किंमत आदीचे महत्वाचे

पान या पुस्तकाला नाही.) या गोष्टीलाही अनेक वर्षे झाली. मला आठवतेय एकदा कॉलेजात नोकरीला असताना एक विद्यार्थ्याने तो इस्लामपुरचा आहे म्हटल्याने त्याला मी प्रकाशकांचा फोन नंबर शोधून आण म्हटले होते. त्याप्रमाणे तो मिळाला नंतर प्रकाशकांनी आवर्जून भेटूया असा निरोप दिला पण काही ना काही कारणांनी त्यांची प्रत्यक्ष भेट सफल होऊ शकली नाही. मात्र अगदी अनोळखी लोक तुला मदत करायला पुढे येतील असा वारंवार मिळणारा प्रत्यय इथेही मिळाला. असो.

आता ईपुस्तक रुपाने ह्या लेखनाला प्रकाशनासाठी मी एकुलत्या एक कॉपीची रोज थोडी थोडी टायपिंग करून एक नवी प्रत बनवून तयार केली. त्यात हे नवे लेखकाचे मनोगत घातले आहे. कादंबरीचे उपनामकरण विषय-वस्तूला समर्पक ॐ नमः शिवाय असे केले आहे.

नवी दिल्लीच्या वास्तव्यात हे लिखाण करत असताना ते ऐकायला दोन व्यक्ती नेहमी तयार असत. एक माझ्या घरी त्यावेळी राहायला आलेल्या द्वारका (सोवनी) आत्या व आसपास राहणारे मित्र प्रमोद व कुंदा पानसेचे वडील. आत्याबाई तर या घटनांच्या नंतर माधवनगरला काही वर्षे वास्तव्याला होत्या. म्हणून त्यांना यातील घटना ऐकून माहिती होत्या व अनेक व्यक्तिमत्वे पाहिलेली, भेटलेली होती. आता हे दोन्ही हयात नाहीत.

मी स्वतः 11- 12 वर्षाचा होतो. तरीही त्या घटनांच्या आठवणी इतक्या पक्क्या होत्या की मला लेखन करत असताना कोणाला काही विचारायची गरज पडली नाही. कच्च्या लेखनाचे पक्के करताना कार्बन टाकून दोन प्रती तयार झाल्या. त्याना बाइंडींग करून ती दोन बाडे झाली. एकदा सुट्टीत पुण्याला गेलो असताना अवनी

वार्षिक दिवाळी अंकामधे छापण्याबाबत चर्चा झाली व 87च्या दिवाळी अंकात ती प्रकाशित पण झाली. प्रकाशित झाल्यावर दादा सोडून (त्यांचे 1981 साली निधन झाले.) जवळजवळ सगळयांनी ती वाचली. खुद्द बेबीला ही घटना अंधुकशी देखील आठवत नाही! सांगलीतील गुरूजींना बेबीच्या केस प्रमाणे आणखी कोणाची केस ठीक केल्याचे आठवत नाही असे म्हणणे पडले. त्यांनी गोखले हे आडनाव (ते जीवंत असे पर्यंत तरी) गाळावे असा सुचवले होते. मंगला, आईला ही घटना चांगलीच आठवत होती. इतक्या तपशीलवार घटनांची मी नोंद केल्याचे तिला आश्चर्य वाटले. दादांनी केलेल्या युक्त्या व नामजपावरील भाष्य तुला कसे समजले असा तिला प्रश्न पडला होता. मी तिला जेंव्हा सांगितले की या प्रकाराची जेंव्हा चर्चा दादा करत त्यातून अनेक गोष्टींचा माझ्या स्मृतींवर प्रभाव पडला असावा.

माझ्यापुढील आयुष्यात ॐ नमःशिवाय हा जप नकळत चालू असे. काही काळाने ॐ गं गणपतये नमः असा नामजप मोठ्या प्रमाणात झाला. त्याचा प्रभाव पत्नीच्या त्वचा दाहासाठी उपयोगी पडला.

दिवाळी अंकातून प्रकाशित झाल्यावर काही प्रतिक्रिया वाचायला ऐकायला मिळाल्या. काहींना वेगळया विषयावरील वेधक लिखाण वाटले, आत्मनिवेदनातून फुलत जाणारी कथा वस्तू, बोली भाषेतील वाक्य रचना, सर्व पात्रे रोजच्या घसटीतील वाटतात असे काहींनी मत नोंदवले. दादा हे व्यक्तिमत्व फार छाप टाकणारे आहे. अडचणीतून मार्ग शोधून, विपरीत परिस्थितीत न डगमगता धीराने वाट काढत जाणारे दादा वेळोवेळी विविधांगाने भेटतात. कधी अध्यात्मिक विचारकाच्या बाजात तर कधी गुप्त हेराच्या मानसिकतेने घटनांचा अन्वय लावायला सरसावणाऱ्याच्या थाटात या प्रकारांची

उकल करायला प्रेरित करतात. भीषण प्रसंगी वातावरण निर्मिती फार प्रभावी झाली आहे असे साधारण वाचकांचे मत होते तर काहींनी अनेकदा पात्रांची नावे व नाते संबंध सरमिसळ झाल्याने वाचकाला गोंधळात पडायला झाले होते. उदा. कादंबरीतील पात्र काका लेखकाच्या आईच्या वडिलांचे नाव. पण व्यवहारात वडिलांच्या भावाच्या अर्थाने वापरले जाते म्हणून काही वेळा ते नक्की कोण ते कळायला जड जाते. एकाच पात्राला अनेक तऱ्हेने संबोधण्याने काहीसा गोंधळ उदा. लता, शशी मुले ज्यांना दादा म्हणतात त्यांना मंगला ह्यांना म्हणून संबोधते तर आजी त्याला जनार्दन म्हणून हाका मारतात. आत्मनिवेदन कोणाचे चालू आहे. भान न राहून असे होते खरे. यासाठी पात्रांचे अंतर्गत संबंध व नावे असा परिचय सोबत दिला आहे.

काहींचे मत पडले की गुरूचरित्राच्या पारायणाची चर्चा अनेक खाजगीत करतात. पण ही सार्वजनिक झालेली घटना श्रद्धा व चिकाटीचा प्रत्यय कसा आणतात याचे उत्तम उदाहरण आहे. काही म्हणाले, 'ॐ नमःशिवाय या पंचाक्षरात मंत्रसामर्थ्य आहे. या नामजपाने मनोशक्ती तयार होऊन मानवेतर योनीतील प्रभावावर उपाय म्हणून उपयोग होतो, याचे धडधडीत उदाहरण म्हणून मानता येईल'. 'नामजप म्हणजे वेळ जाण्याचा विरंगुळा नाही. जप करणे म्हणजे अमानवीय शक्तीला प्राप्त करण्याचे प्रभावी साधन किंवा शिडी आहे.'

योग्य गुरूच्या मार्गदर्शनामुळे चिकाटी, दृढ श्रद्धेच्या जोरावर आसुरी शक्तींशी समर्थपणे लढा देता येतो व विजय मिळवता येतो. हे पटवून देणारे उदाहरण म्हणून या सत्यघटनेकडे बोट दाखवता येईल.

हे लेखन 'जसे घडले तसे' या स्वरूपात आहे. त्यात अतिशयोक्ती वा वातावरण निर्मितीसाठी रंगवून केलेले वर्णन नाही. दुसरी बेबी हे पात्र परिस्थितीजन्य पुराव्यातून निर्मित झालेली व्यक्तिरेखा आहे.

कालौघात बेबी मावशी, बहीण लता, सुभाष व श्रीकांत मामा, मधू, इतकीच पात्रे ऑक्टोबर 2014 मधे जीवित आहेत. ([1]माझी आई - मंगला) प्रत्येक जण संसारिक कर्तव्ये पार पाडून सेवा निवृत्त होऊन मुले नातवंडे यांच्या समावेत रंगलेली आहेत.  बेबी मावशीचे विवाहोत्तर जीवन काही ना काही कारणांनी खडतर व कष्टाचे गेले. माझी आई व बेबीमावशी सध्या वृद्धनिवासात एकत्र राहातात. काही कारणांनी बेबी मावशी आता अन्य वृद्धनिवासात राहायला गेली आहे. विवाहानंतर तिच्या मुलाला पोलिओ झाला. अपंग मुलगा, पतीचे दुर्लक्ष, कडक सासूरवास, बेताची माहेरची परिस्थिती यामुळे अनेकदा टोकाचे प्रसंग आले.

आपल्या सासूच्या तालेवार वागण्याचे अनेक किस्से सांगताना ती म्हणे, 'आमच्या सासूबाईंना हिन्दी सिनेमे पहायचा फार शौक होता. सकाळ मधील सिनेजाहिरातीतून त्यांच्या आवडत्या कलाकारचा सिनेमा सेकंड रनला आला की त्यांचा हुकूम सुटे. मग मला मॅटिनीच्या खेळाचे तिकिट रांगेतून काढायला आधी पायी पाठवले जाई. मग तंगडतोड करत घरी जायला लागे. कारण सासूला टांग्यात चढवायला-उतरवायला मी लागे. सासू एकटी मागे बसणार. मग टांगेवाल्याच्या शेजारी बसून मला जावे लागे. मध्यांतरात खाऊचा डबा द्यायला थेटरात डोअर कीपर प्रमाणे बाहेर थांबून राहावे लागे. मुखशुद्धी साठी

---

[1] माझ्या आईचे वृद्धापकाळाने दि 22 ऑगस्ट 2014 ला पुण्यात देहावसान झाले.

पान व आईसक्रीम तत्परतेने आणणे आदि कामाला मी लागे. सिनेमा सुटला की पुन्हा सासू-सुनेची वरात टांग्यातून घरी परत. पण एकदाही त्या पठ्ठीने 'तू पण थांब सिनेमा पाहायला, तू पण आईसक्रीम खा' म्हणून म्हटले नाही! पुण्यात एकदा  कुठेसे सत्यसाई आले असताना त्यांनी दूरवरून गर्दीतून नेमके हिच्या कडेवरील मुलाला हस्त स्पर्ष करून दिलेला आशीर्वाद, विजेचे बिल फार येते म्हणून मेणबत्या पेटवून रात्र काढणारा, कष्टाळू पण मनस्वी, तापट व मदिराप्रेमी पती, या परिस्थितीने ताऊन सुलाखून जीवनाचा गाडा हाकताना 'कशी मी जगले याचे नवल वाटते!' असे खदखदा हसून किस्से सांगताना मला माधवनगरातील बेबी मावशी डोळ्यांसमोर येते. मेहनती जावई व तिची मुलगी स्मिता मात्र जिद्दी व कष्ट करून आपले व घरच्यांचे सर्व यथा साग्र लाड पुरवत, आईच्या हार्टच्या बायपास ऑपरेशनसाठी तिने केलेल्या अपार धडपडीतून आर्थिक सहाय्य मिळवून, आईला सांभाळताना पाहून एक मुलगी आईच्यासाठी प्रेमाखातर किती तत्पर आहे याची खात्री पटते.

ईश्वरावर प्रगाढ श्रद्धा, नामजपाचे सामर्थ्य यामुळे जीवनाच्या अनेक कसोटीच्या क्षणी आधार मिळतो. याचे इतरांसाठी प्रेरक एक उदाहरण म्हणजे अंधार छाया उर्फ ॐ नमः शिवाय.

------- -----

शशिकांत ओक

# व्यक्ति परिचय

**शशी** – लेखक.

**दादा** – शशी चे वडील. जनार्दन,

**मंगला** – शशीची आई, माहेरची शांता,

**बेबी** - शशीची मावशी, मंगलाची सावत्र बहीण,

**सुभाष व श्रीकांत** – शशीचे सावत्र मामा.

**मधू** – शशीच्या आईचा मामेभाऊ,

**काका** – बाळकोबा गोखले, शशीच्या आईचे वडील,

**काकू** – शशीच्या आईची सावत्र आई,

**आजी** – शशीच्या वडिलांची काकू,

**लता** - शशीची धाकटी बहीण,

**स्वामी** – प्रज्ञानानंद सरस्वती –दादांचे अध्यात्मिक गुरू,

**डॉ. फडणीस** – माधवनगरातील फॅमिली डॉक्टर,

**गुरूजी** – सांगलीतील नामजपाची दीक्षा देणारे गुरू.

# अंधारछाया

## एक

## मंगला

खर तर सगळं आठवलं की अंगावर शहारे येतात. आणि मन सुन्न होऊन जातं! आता चांगले सहा महिने झाले त्या सगळयाला, तरीही झोप चाळवतेच!

आज ते पत्र येऊन पडले आणि जीव भांड्यात पडला. बेबीचं लग्न आहे म्हणे. मुलगा नागपूरकडचा. पुण्यात आई-वडील आहेत. नोकरीला नागपुरात आहे म्हणे. पण ही पसंत पडली पाहिजे ना. हं जाऊ देत. उद्या हेच ठरवतील पुढं काय करायचं ते. आता इतकं त्यांच्यामुळं निस्तरलयं! साहजिकच काका-काकूला, ह्यांना बोलावल्याशिवाय लग्नाचं पुढचं ठरवणं कसं प्रशस्त वाटणार? जाऊ दे. उद्या पाहू.

मी हळूच लताला मधून ह्यांच्या पलिकडे सरकवली. सरळ ह्याच्या कुशीत गेले. ह्यांचा हात अंगावर घेतला. इतकं निर्धास्त वाटलं! का कुणास ठाऊक एक एक आठवायला लागलं...

आम्ही राहायला आलो माधवनगरात ते इस्लामपुरहून. ट्रकने सामान आलं. आम्ही मिलच्या कार मधून. माधवनगर गाव तसं टुमदार. सात वारांच्या सात पेठा. म्हणजे काय गल्ल्याच. एका बाजूला रेल्वे स्टेशन. पलिकडे कॉटन मिल. सांगली तासगाव-विटे जाण्यासाठी हेच स्टेशन उपयोगी. म्हणून स्टेशनात ही चांगली वर्दळ. मिल मालक ब्राह्मण म्हणून काम करणारे कटाक्षाने ब्राह्मण. शिवाय गावात मागांचा धंदा. त्यामुळे गल्ली गल्लीत खटर-फटरचा सतत आवाज. आधी आधी तर डोकं भणभणे त्या आवाजाने, मधोमध सांगलीकडून बुधगावकडे डांबरी रस्ता. वाटेत रेल्वे फाटक. तिथेच बस स्टॉप.

आम्ही उतरलो तो ट्रक येऊन अर्ध सामान आत गेलेलं! शशी, लता तर आधीच ट्रक मधून आले होते. सामान लावलं गेलं. आठ दिवसात आसपासच्या ओळखी झाल्या. महिला मंडळात नाव घातले. यंदा मलाच अध्यक्ष केलंय बायकांनी. म्हसकरांचा गाण्याचा क्लास लावला. गेल्या वर्षी भिशी चालू केली. फटक्यात स्टीलच कपाट घेतलं ह्यांच्या मागे लागून. आधी म्हणाले हे, ‘कशाला’ म्हणून, पण मीच जोर केला!

गेल्या मे मधे दोन वर्षं झाली आम्हाला इथे येऊन. आल्या नंतरच्या मेमधे शशी म्हणतो बाई मुंजीची तारीख चार मे साठ की काय म्हणून. आमचे शशोबा म्हणजे काय? काय काय तारीख-वार लक्षात ठेवत असतो! झाली थाटात मुंज त्याची. अगदी माझ्या मनासारखी. स्वामी पुर्वी म्हणायचे, ‘जनार्दन, मुंज करशील शशीची तेंव्हा यथासांग वैदिक पद्धतीने झाली पाहिजे. बरं. हे प्रथम सांग, तू संध्या करतोस की नाही? हे वेळ मारून नेत ‘करतो’ म्हणाले, पण खरोखरच दुसऱ्या दिवशीपासून लागले करायला! स्वामी म्हणजे काय, लगेच मला खडसावलं त्यांनी, म्हणाले ‘मंगला, तू लक्षांत ठेव. डामडौल जास्त नको. संस्कारांवर भर दे. तुझं असतं याला बोलावू, त्याला बोलावू.’

झालं बाई सगळं यथास्थित. तीनशे पान झालं मुंजीच्या दिवशी. शिवाय घरचे पंचवीस–तीस लोक सात आठ दिवस राहायलाच आले होते ते वेगळेच. गुप्ते काका, चिटणीस डॉक्टर, आमचे काका, नाना, सगळी टक्कलवाली मंडळी मधल्या हॉलमधे बसून होती चक्का फेटत. हसत खेळत तीनशे जणांचे श्रीखंड फेटलं सगळयांनी! शशी, लता होते सगळयांच्या टकलावरचा घाम पुसत! नंतर एक दिवस

आमरस-पुरी, रात्री पिठलं-भात, एक दिवशी भरीत-भाकरी, मजा आली सगळयांना.

ह्यांचा धंदाही छान चाललाय. पुण्यात गेले की काका-काकू विचारायचे, ‘काय शांते, कसा काय चाललाय पंतांचा धंदा?

‘छान चाललाय’, हसून म्हणताना ऊरात इतकं भरून येई. मग ह्यांचं पुराण सुरू होई, किती माणसं कामाला आहेत, सध्या कुठे कुठे माल जातो, यावर्षी काय काय दागिने घेतले, काय अन काय. तिकडे पर्वत्यांच्याकडे गेलं आजोळी की, आजी विचारे, ‘शांते ठीक चाललंय ना गं बाई सगळं? ‘हो ताई, खूप छान’ म्हणे मी. पण आजीच्या डोळयातलं पाणी पाहून मलाही थांबवत नसे. जवळ जाऊन मायेनं हात फिरवलान की फार फार जवळ गेल्यासारखं वाटे. खरंच आई असती तर असंच वाटलं असतं का? मग मला काय म्हणाली असती ती?

बापूंचं गर्जना करणारं बोलणं, ‘काय शांता बाई केंव्हा आलीस? सर्व कुशल मंगल?’ ऐकल्याशिवाय बरंच वाटायचं नाही. बापूंना ह्यांच्या बद्दल फार जिव्हाळा वाटे. ह्यांचा थाट तसा गंभीर. मध्यम उंची. पोट सुटल्या सारखं. चेहेरे पट्टी गोलसर. रंग गोरटेला. गोबरे

गाल घारे डोळे. चटकन कोणाशी न बोलणारे. बापूंच्या भाषेत विदेशी साहेबाच्या म्यानर्सचे!

आजी बाबांबद्दल विचारे, ‘कसे काय आहेत बाळकोबा? मुलं कशी आहेत? खरे तर माझ्या लग्नापासून त्यांच्याकडे पर्वत्यांचे येणे-जाणे कमीच झाले. त्यामुळे दिवाळी, मेच्या सुट्टीत गेले की माझ्याकडूनच त्यांना माहिती कळे.

‘आहे, आता सुभाष, एसटीत लागलाय नोकरीला, बेबी यंदा मॅट्रिकला आहे. श्रीकांत आहे नववीत. सुमन आहे तिसरीत. काकांनाही मिळाल्येत एक दोन पिक्चर्सची कॉन्ट्रॅक्ट्स. गेल्या महिन्यात मुंबईची माणसं आली होती. उग्रमंगल नाटक बसवताय का विचारायला. काकूची कथा-कीर्तनं, भजनं चालू असतात दुपारच्या वेळी.’

रग लागली म्हणून हात काढला अंगावरचा ह्यांच्या. पांघरूण ओढलं ह्यांच्या अंगावर. लतीचा फ्रॉक नीट केला. शशीचे हात-पाय नीट केले. मोरीवर जाऊन आले. मच्छरदाणी जरा ठीक खोचली आणि झोपले कुशीवर.

# काका

'मी बाळकोबा. जुन्या नाटकातून प्रोज काम करणारा. बलवंत मधे होतो बरेच दिवस. त्याआधी बाकीच्या कंपन्यातही हजेरी लावली. नंतर वयही वाढलं. पुण्यात प्रभातमधे बोलावलं दामल्यांनी मला. मग तिथेच राहिलो. रमलो. आता दिसायला ही अंधुक झालंय. तेंव्हा जरा जास्त विश्रांतीच घेतो. मला मुलं दोन अन तीन मुली. एकीचं लग्न झालेय ती दिलीय ओकांच्याकडे. शांता तिचे नाव. सुभाष एसटीत अकौंट्स खात्यात. सरोज - बेबी म्हणतो आम्ही तिला – यंदा मॅट्रिकला पुन्हा बसतेय. श्रीकांत आहे नववीत. धाकटी सुमन तिसरीत गेलीय.'

मी बोललो खरं खरं. त्या फोटोग्राफर व चश्मिश वार्ताहराबरोबर. राजा कामतेकरान धाडला होता त्याला. 'रसरंग' मधे मुलाखत घ्यायला. मी म्हटले, 'घ्या लेको मुलाखत. नट म्हटला की ते छपवाछपवी, भानगडी, नशापाणी वगैरे असणारच अशी झालीय सध्या समजूत. आमच्याकडे पहा लेको. आज साठी उलटली पण भलते सलते काही केलं नाही. आपले काम बरे की आपण बरा.'

'गेले चाळीस वर्षे राहतोय सदाशिव पेठेतल्या बोडस वाड्यात. आहे एकच दोन खणी खोली. पण आहे कामचलाऊ.' एवढ्यात सौ आल्या चहा घेऊन. त्यांना चहा देऊन बसल्या स्टूलावर. पदर सावरून बोलणार इतक्यात मीच म्हणालो, 'या आमच्या सौभाग्यवती. हा आमचा द्वितीय संबंध. पहिली पत्नी पहिल्याच बाळंतपणानंतर आजारात वारली. पर्वते तिकडचे आडनाव. पहिली मुलगी शांता तिचीच.'

जुजबी नमस्कार चमत्कार झाले. तसा कॅमेरा उचलून जाताना चश्मिश म्हणाला, 'दिवाळी अंकात येईल छापून.' मग मी कलंडलो कॉटवर. डोळ्यावर ठेवला रुमाल पसरून आणि पडलो स्वस्थ.

मुलाखत दिली मी. पण माझी खरी मुलाखत माझ्यापाशी चालू झाली. झाली साठी आपली. काय पडलं  आपल्या गाठी? म्हणायला ठीक आहे हो हे मुलाखतीत की मी कामाकरता कोणाच्या दारी गेलो नाही म्हणून पण आता पश्चात्ताप होतो कधी कधी. 'रामशास्त्री'त मोठा रोल देणार म्हणत होते दामले. करता करता काही बिनसलं. पार्ट्या पडल्या. त्यात आमची उगीचच वर्णी लागली त्यांच्या विरोधकात! आणि मला रोल आला लेल्याचा पाच मिनिटांचा! 'ज्ञानेश्वर' मधे अशी

चीड आली डायरेक्टरची. पण वाद नाही. बरं. “मी हेच काम करीन ते नाही” असं म्हणायचं माझ्या स्वभावात नाही. तोही रोल गेला पुढं!

प्रभातला कंटाळून दोन तीन नाटक कंपन्यात काम केली. एकच प्याल्यात सुधाकर केला गंधर्वाबरोबर. आधी बालगंधर्वांची अवस्था मोडकळीची. त्यात ती गोहराबाई. तीन-चार प्रयोग झाले पण लोकांनाही गंधर्वांचा आदर राहिला नाही म्हणा किंवा सिनेमाच्या आकर्षणाने म्हणा, नाटक चालेना. भावबंधन मधलं माझं पेटंट काम धुंडीराजाचं. काय एक एक डायलॉग आहेत पान पान भरून. आधीच गडकरी मास्तरांचं नाटक. त्यात ते पात्र गोष्टी वेल्हाळ. झाले काही प्रयोग विदर्भात, तिकडे खाली गोव्यात. मा. दत्तारामने खूप कष्ट केलेन. पण पुण्या-मुंबईत नाटक चालेना. मग कंटाळले सगळेच. प्रयोगाच्या पैशाचा भरवंसा राहीना, प्रभातला मग पुन्हा चिकटलो झालं.

सौ. नेहमी म्हणायच्या, ‘अहो जरा व्हावं पुढं. म्हणावं मला हा रोल द्या. इथली माझी सीनियारिटी पहा. कालची पोरं तुमच्या पुढं जातात आणि तुम्ही मात्र असेच? खरंच, मी हा असाच. तडकफडकपणा कमी. संताप यायचा खूप. मग कुढत बसे घरात. हे बरं पडतं कॉटवर कलंडून पडलेलं.

सायकलची घंटा वाजली. सुभा आला वाटतं ऑफिसातून. चला आता त्याच्या बरोबर चहा होईल. मग फिरायला जावे सारसबागे पर्यंत. तेवढ्यात पाय वाजलेले वाटले कुणाचे. कोण असेल? की भास

असावा? ‘काका चहा’ म्हणून ऐकलं. डोळे किलकिले करून पाहतो तो, बेबी कपबशी हातात घेऊन!

‘केंव्हा आलीस ग?’ मी विचारलं.

‘झाला बराच वेळ. सुभ्या आला. त्याला चहा केला. श्रीकांताही चहा घेऊन गेला सायकलवरून बाहेर. आई येईल आता देवळातून. मी बसलेय पडवीत बाहेर अभ्यासाला.’

चहा सावकाश ओतला बशीत आणि पहात होतो पडवीत. बेबी आमची जरा हडकुळीच. मॅट्रिकची ही पोरगी. अजून आठवी-नववीच्या मुलींपेक्षा जरा चणीनं लहानच वाटते, रंगही जरा फिक्कट. दोन लांब लचकशा वेण्या. मी कितीकदा म्हणतो, ‘बेबे जरा खावं झडझडून, काय हे चिमणीच्या घासाचं जेवण? शक्ती यायची कशी तुला? ती शांती बघ कशी होती. खाणंपिणं यथास्थित अन् कामाला वाघ!

चहा थंड झाला होता. पुढच्या दोन घोटात संपवला. कपबशी कॉट खाली सरकवली. थोडं तोंडावर पाणी मारून शर्ट बदलला. धोतर सावरलं. टोपी घेऊन पंपशू पायात सरकवला.

हिराबागेपर्यंत वर्दळ संपली. माझी चाल मंदावली. मोठी पोस्टर्स लावून लाऊडस्पीकरवरून कुठल्याशा सिनेमाची जाहिरात करत वरात पुढे चालली होती. गीताबाली अन् देव आनंद. काय नाव

सिनेमाचं म्हणाला? जोराच्या आवाजात नाव नीट कळलं नाही. हा देवानंद लेकाचा बारा पंधरा वर्षात कुठच्या कुठं पोचलाय! आत्ता आत्ता अठ्ठेचाळीसपर्यंत आमच्या बरोबर हम एक है मधे होता प्रभात मधे. शामळू लेकाचा! आम्ही तसेच राहिलो. त्या मानाने रेहमानला बरे मिळाले रोल प्यासाबिसात, मलाही हिन्दीत जायला हवं होतं पुर्वीच. निदान शांतीला तरी करायचं होतं पुढे सिनेमात.

शांती. तिचं नाव काढलं की घरच्याना वाटतं मी तिच्या स्तुतीआडून त्यांची निंदा करतोय. पण आता आहेच ती तशी त्याला कोण काय करणार!

ती गोरी, शाळेत एकदम हुशार. कामाला ताठ. तर यांना सदा आळस भरलेला! तो शिंक्या सदा सायकलवरून भटकतो मित्रात. दिडदमडीचे त्याचे मित्र! एकही धड नीट नाही अभ्यासात. त्यात त्याची जीभ जड. नुसते केसांचे कोंबडे करून हिंडायला हवं झालं. बेबी एक अशी. गेले चारपाच महिने टॉनिकची बाटली लावलीय द्राक्षासवाची. पण काय उपयोग? ना शरीर तरतरीत ना बुद्धी तल्लख!

मला वाटतं बेबीला जरा हवा पालटासाठी पाठवावी शांतीकडे माधवनगरला. सुभ्याला सांगावं पत्र पाठवायला तिच्याकडे. पावले झपाझप पडली.

बागेतला गणपती लवकर आला असे वाटले. देवाला हात जोडले. काय मागावे कळेना! आपल्याला रोल मागावा हिन्दी पिक्चर मधे की तो इंग्रजीत गांधी-नेहरूवर सिनेमा काढणार आहेत त्याच्यातल्या रोलची मागणी करावी? स्क्रीनटेस्ट तर छान झाली होती गांधी करता. का त्या कीचकवधाच्या आणखी प्रयोगा बद्दल मागावे? अरे हो विसरलोच ते मध्यंतरी ते फॉर्म भरून पाठवले होते मुंबईला सुभ्याने. साठीच्या वरच्या नटांना पेन्शन देतंय सरकार म्हणे! त्याचं काय झालं कोणास ठाऊक! एव्हाना पत्राचं उत्तर तरी यायला हवं होतं. तेच मागू का गणेशाकडे? की बेबी, श्रीकांतच्या नीट वागण्याबाबत मागू की बाबा यांना नीट मार्गी लाव. बेबी आता लग्नाची होईल. ती नीट पास होऊ दे. श्रीकांताची वाईट संगत सुटू दे. काय मागावे?

तेवढ्यात धक्का बसला. लोकांच्या गर्दीमुळे मला हलायला हवं होतं. काहीच न मागता!

रात्री कॉटवर पडल्या पडल्या पुन्हा विचार आला. शांतीला कळवाव पत्रानं. बेबीला ठेव तुमच्याकडे. जरा अभ्यास घे. यंदा मॅट्रिकला गचकता कामा नये. पंतांना विचारून कळव म्हणावं लवकर. म्हणजे सोबतीनं पाठवता येईल तिला कोणाच्या तरी. नाहीतर सुभाषच पोचवील पासावरून.

रामकृष्ण हरी...!

# अंधार छाया

## दोन

## दादा

स्वामींची मात्र कमाल आहे. माझ्यासाठी स्वामींनी नातू शेठना शब्द टाकला! म्हणाले , ‘ शेठ, या जनार्दनला चांगलासा धंदा द्या बरं. सचोटीचा व चार पैसे मिळवणारा हवा. इथे इस्लामपुरात आल्यापासून माझ्या माहितीचा आहे हा. विश्वासू आणि सरळ मनाचा आहे. सध्या त्याला काही धंदा हवा आहे. मी त्याला ओळखतो. माझी दीक्षा घेतलीय त्याने. त्याला धंदा देणे तुमचे काम.’

शेठ काही बोलले नाहीत. पण नाही ही म्हणाले नाहीत. नंतर खाली डॉक्टरांच्याकडे चौकशी केली. दुसऱ्या दिवशी मला भेटायला सांगितले. पुढे मी भेटलो. त्यांच्या सोबत माधवनगरला आलो. महिन्याभरातच लक्ष्मी टॉकीजची मिलच्या मालकीची जागा मला भाड्याने देऊन एका हुंडीतून पैसे देऊन, त्यांनी माझ्या नावाने धंदा काढून दिला. माझे होते आठ दहा हजार. बाकीचे चाळीस-पंचेचाळीस हजार व्याजासह देणे होतो मी त्यांचा. मिलच्या सुताची खरेदी करून बाहेरच्या मागवाल्यांना मी ते द्यायचे. त्यांचे कापड विकत घऊन मिलला विकायचे. असा व्यवहार होता. म्हणता म्हणता दोन वर्षांत

कामगार स्टाफ वाढून तीस-चाळीस झाला. क्लार्क, वॉचमन वगैरे धरून बावन्न जण झाले.

माझं मिलमधे येणं जाणं वाढत होते. नातू शेठ असेच कष्टाने मिलमालक बनले होते. मुंबईला बंगला होता. दादर चौपाटी जवळ. महिन्यातून 2-3 आठवडे ते माधवनगरात असायचे. एरव्ही मुंबईतून विक्रीखाते पाहायचे. ब्राह्मणांना कामाला घेण्यात त्यांचा कटाक्ष असे. गोरे-केळकर त्यांची आवडती मंडळी. ही त्यांच्या तालमीत शिकून तयार झालेली होती. आज मोठे मोठे मॅनेजर झालेत.

तसा माझा कापडधंद्याशी संबंध जरा विचित्रच. मॅट्रिक पर्यंत शिक्षण झाले आणि मी मुंबईला आलो. मुळजी जेठ मार्केटात दलालीचा धंदा केला. काही गाठी कापड अंगावरून वाहून बाजारात विकून पाहिले.

नंतर बंधू रघुनाथचं पत्र आलं म्हणून इंदूरला गेलो. पुढे काही दिवस इलेक्ट्रिक सामानाचा धंदा केला. काही कॉंट्रॅक्ट्स घेऊन कामं केली. पुढे त्याला ही कंटाळलो म्हणून एका डॉक्टरकडे कंपाऊंडर म्हणून नोकरी केली. कागद कापून बाटल्यांना डोसची लेबलं चिकटवणं, लाल, पिवळी, काळी, मिश्रणं बनवणं याच्यातही जीव रमेना. म्हणून मग पुणं गाठलं.

पुण्यात माझी गाठ केळकरांशी पडली. त्यांचा हुबळी-धारवाडला टुरिंग टॉकीजचा धंदा होता. त्यांना मॅनेजरच्या कामासाठी

माणूस हवा होता. मी होतोच. टुरिंग टॉकीजमधून हुबळी, धारवाड, बेळगाव, विजापुर, खानापुर भाग खूप फिरलो.

पुढं इस्लामपुरात मोहन टॉकीज घ्यायची टूम निघाली. तेंव्हा केळकरांनी मला तिथे जायला सांगितले. मीही तयार झालो. एक तर कंटाळलो होतो एकटेपणाला. वाटे लग्न करावे छान पैकी. रोज रोज वणवण फिरणे नको आता. शिवाय शिलकीत पैसे होते. त्या जोरावर मी मालकीतही भागी मागितली मोहन टॉकीजची. केळकर खूष होते माझ्यावर. लगेच तयार झाले आणि मी इस्लामपुरात आलो. थिएटर मालक म्हणून मी मॅनेजर होतो. रोज दोन खेळ असत. उरूस, जत्रेच्या वेळी चार-चार, पाच-पाच खेळ चालत.

जवळच गांधी चौकात पहिल्या मजल्यावर जागा घेतली मारवाड्याची भाड्याने. काकूंना बोलावले इंदूरहून. आई माझ्या लहानपणीच वारली. उमाकाकूंना लग्नानंतर लगेच वैधव्य आलेलं. तेंव्हापासून मुलाप्रमाणे त्यांनीच मला वाढवले. मुलं आता त्यांना आजी म्हणायला लागलीत. तशी मंगला व मी त्यांना आजीच म्हणतो. त्यांनाही इंदुरात राहून कंटाळा आला होता. तेंव्हा मीच घेऊन आलो इथे. माझ्या पाठचा गजाननही वायरमनचा डिप्लोमा घेऊन इथेच आला राहायला.

आम्ही मजेत होतो तिघे. संध्याकाळच्या शोला गजानन जाई. मी तोवर क्लबमधे ब्रीज-रमी खेळून येई. जेऊन रात्री साडेनऊला मी

आधीच्या व रात्रीच्या शोचा गल्ला गोळा करे. शो संपला की अकौंट्स ठीकठाक करून एक दीड पर्यंत परते. सकाळी उशीरा उठणे, थोडासा कॉरस्पॉडन्स फिल्म डिस्ट्रीब्यूटरशी, बाकी वेळ मोकळाच मिळे.

मला ब्रिजचा नाद होता. त्यामुळे गोराजी साहेब व मॅडम खुष. पुढे सत्तेचाळीस नंतर डी.एस.पी, जज् मंडळीही तिथं असायची. त्यामुळे आमची क्लबची घसट मैत्री वाढतच गेली. तिथेच दत्तू फडणीस भेटला. डॉक्टर चिटणिसांची कोंबडी, वहिनींच्या हातची फ्रेंच आमलेट. त्यावेळी हटकून मी हजर असे.  पोलिसात असलेले शांताराम व वत्सला गुत्ते म्हणजे माझे परम स्नेही. एक दिवस असा गेला नसेल की त्यांना भेटलो नाही म्हणून

हळूहळू माझे सर्कल वाढत गेले. मला मोहन टॉकीजचा मालक म्हणून लोक ओळखायला लागते.

इस्लामपुर गाव तसे त्रासाचे. पत्रीसरकारच्या वेळी काही स्वातंत्र्यवीर थेटरात लपले होते. त्यांना पकडायला पोलिस आले, तेंव्हा गोळीबारापर्यंत मजल जाणार हे ओळखून मी मधेच सिनेमा थांबवून स्लाईड दाखवली पोलिसांच्या खुणेची. ते चारपाच जणांचे टोळके गेलेले पाहिले मी माझ्या डोळयांनी. मगच पोलिस पार्टीला मी माझ्या मॅनेजरच्या केबीन मधून तलासासाठी थेटरात पाठवलं. इतर प्रेक्षकांना कळलंही नाही. तरी काम झालेलं होतं.

स्वातंत्र्य मिळालं आणि त्याच्या नंतर प्रज्ञानानंद सरस्वती म्हणून एक संन्यासी स्वामी इस्लामपुरात आले. राहायला होते डॉक्टर वैद्यांच्याकडे. एकदा त्यांच्या प्रवचनाला सहज गेलो होतो. विषय होता अध्यात्मवादाचा. भारदस्त व्यक्तिमत्व, ओघवती वाणी, एकदम भारावलोच मी. पुढे स्वामींच्या दर्शनाला रोज जायला लागलो. क्लबला जायलाच हवे असे वाटेना. माझे क्लबपेक्षा स्वामींकडे जाणे येणे वाढले. स्वामींकडे दादा व कमाताई वैद्य, कमुताई लेले, मी असे असायचो.

स्वामी तेंव्हा रामायणावर टीका लिहिण्यासाठी इस्लामपुरात वास्तव्य करून होते. पहाटे चार पासून ते लिहायला बसत, ते दुपारी बारापर्यंत. नंतर वैश्वदेव झाल्यावर पुन्हा साडेसात पर्यंत लिखाणाला बसत. भजन, प्रवचन, लोकांच्या गाठी-भेटी होत. भोजनानंतर स्वामी विश्रांतीला जात. पुढे मला अध्यात्माची गोडी चांगलीच वाढली. स्वामींच्या निदर्शनाखाली योगमुद्रा, योगमार्गाने जायचे पसंत केले. आणि दीक्षा घ्यायचे ठरवले.

मध्यंतरी एकंदर माझे बस्तान ठीक बसलेय असे पाहून काकूही मागे लागल्या होत्या लग्नासाठी. मला आधी पसंतच येईनात मुली. मी जरा मुलींबद्दल नाठाळ. काळी दंताडी, थोराड मला बिलकुल आवडत नसत. शिवाय माझं वय ही बत्तीस तेहेत्तीस झालेलं. शेवटी पुण्याहून एक स्थल आलं. आमच्या एका लांबच्या नातेवाईकांकडून. पाहिली मुलगी. छान होती. शांता नाव म्हणे. मीही गेलो होतो रुबाबात.

दुटांगी धोतर, पांढराफेक शर्ट, वर पोमेड लाऊन भांग पाडलेला. पायात कोल्हापुरी वहाणा. मला मुलगी आवडली. जरा अटकळ बांध्याची होती. आत्याबाईंनी बाकीचे ठरवले. अठ्ठेचाळीसच्या जूनमधे मी लग्न करून आलो इस्लामपुरात. होता होता बारा तेरा वर्षं उलटलीही.

सरावाने रोज ध्यानाला बसतो. आज ध्यानाहून उठलो. रेमीचे कॅस्टर ऑईल डोक्याला लाऊन केस उलटे फिरवले. कपडे करून सायकल काढली. शशी सायकल पुसेपर्यंत तंबाखूचा एक बार भरला. घड्याळ मनगटात घातले. तेवढ्यात पोस्टमनने पत्र टाकले. लताने उघडून वाचले. म्हणाली, ‘सुभाषमामाचं आहे पुण्याहून’. काय लिहिलंय म्हणून मीही थांबलो जायचा.

मंगला म्हणाली, ‘काका म्हणतायत बेबीला पाठवू का तुमच्याकडे काही दिवस? गेल्या परीक्षेत पेपर पुन्हा खराब गेलेत म्हणतेय. अक्काकडे अभ्यास करीन म्हणतेय ती. वाळलीय फार. जरा हवापालटही होईल.’

मंगला म्हणाली, ‘काय करावं?’

मी म्हणालो, ‘तू बोलव ना तिला. मला काय विचारायचं’ आणि सायकल चालू केली.

## बेबी

सकाळ मधून एसएससीचा रिझल्ट छापून आला. मला तो पहायची गरज नव्हती. पण समोरच्या इंदुताईंना कौतुक ना! म्हणाल्या, ‘निराश होऊ नकोस. नसला नंबर तरी. खूप अभ्यास केलास गं तू. नसतं नशीबात कधी कधी.’

आवर्जून पेपर घेतला. बाबीताईंच्या शशी, मीरा पास झाल्या होत्या. माझा नंबर नव्हताच!

माझा स्वभाव मस्करीचा, म्हणाले ‘इंदिताईंना, अहो थर्डक्लासातच पाहून ठरवलंत होय मी नापास म्हणून? फर्स्टात नंबर असणार माझा.’ अन खदखदून हसले मी.

मला सवयच लागलीय हसायची. काही म्हणून झालं तरी मला आपलं हसायलाच येतं. एकदा शाळेत पोट दुखायला लागलं. शाळेतली ती सुधी म्हणाली नाही का? ‘अग सरोज, गाढवे कळलं का पोट का दुखतय ते? अगं आईनं काही सांगितल नाही का? जा घरी. ’ते ’ साफ कर. आराम कर.’ माझं पोटही दुखत होतं आणि हसायलाही येत होतं की मी आता बाई झाले याचं. मी प्रदक्षिणेला जाई भिकारदास

मारुतीला. तेंव्हा अशी ठेच लागली होती पायाला! चपलेचा अंगठाही तुटला. कळ तर अशी मारत होती. पण मला हसूच सुटलं कलंडून पडल्याचं!

आई सकाळी मला म्हणाली, ‘बेबी शांतीचं पत्र आलंय, ’पाठवा ’ म्हणून. मग आता केंव्हा जातेस?’

मी जरा घुश्शातच होते. मला मनातून जायचं नव्हतं. पण आत्ताच नाही म्हटलं आणि पलिकडे लवंडलेल्या काकांनी जर ऐकलं तर  घर डोक्यावर घेतील. म्हणतील, ‘पहा शांतीनं मोठ्या मनानं बोलावले तर ही शिंची आता अडून बसतेय. इथे काय पुरलंय तुझं पुण्यात? आत्ताच्या आत्ता सामान भर आणी चालू लाग.’

मी म्हटलं ‘पाहू’ अन वेळ मारून नेली.

अक्काकडे जायला मला काही वाटत नाही. खर तर अक्का मला फार आवडते. सावत्र बहीण असूनही कधीच तसं वाटलं नाही. पण ते माधवनगर. छोटं गाव. तो गांवढळपणा, ते आवडेना. तसं पुण्यात तरी माझं कोण होतं? मैत्रिणी मला आधीपासून कमी. होत्या त्या कधीच पुढे सटकल्या. मी आपली एकटीच. म्हणून माझ्या मनानंच मी भिकारदास मारुतीला फेऱ्या मारायला जाई. आईला माहितही नव्हतं बरेच दिवस!

# अंधारछाया

## तीन

## बेबी

स्वारगेटवर सुभाष, श्रीकांता आले होते पोहोचवायला. सुभाषच्या ऑफिसातले होते कोणी. त्यांच्या सोबतीने बसले मी सातच्या मिरज गाडीत. सुभाषला काळजी फार, 'बेबी, पुस्तकं घेतलीस का? काल आणलेली साडी ब्लाऊझ घेतलास का? दुपारच्या जेवणाचा डबा घेतलास ना? श्रीकांताला गाडी सुटायला निघता निघता केळी आणायला पिटाळलंन! ऑफिसच्या माणसाला सारखं सांगत होता, 'प्रथमच जातेय एकटी. नीट लक्ष असू दे.' मला तर हसूच येत होतं त्याच्या काळजीचं. जरा घाबरट आहे आमचा सुभा. एसटी चालता चालता केळी हातात पडली. हात हालवत दोघे दिसेनासे झाले.

गाडी मेन रोडवर आली. दहा-बारा मिनटात कात्रजच्या वाटेवर लागली. ओसाड डोंगर, लांबवर सिंहगड पाहून मला एकाकी वाटलं. वाटलं, आपण एकट्याच कुठे चाललोय? आपल्याला कोणी नेलं पळवून

तर? नाही आलं सांगलीला कोणी तर? नाही नाही ते विचार मनात आले.

घाटाची वळणं लागली आणि मला मळमळायला लागलं. पुणं आठवलं. भिकारदास मारुतीला जायची वेळ. चिंचेची झाडं, गाभुळलेल्या चिंचा. पुण्याहून दूर जातोय म्हणजे पुन्हा मी परतणारच नाही असं वाटायला लागलं. करता करता सातारा गेलं. डबा खाऊनही डचमळतच होतं. कराड, इस्लामपुर गेलं आणि मला पेंग आली.

सांगलीला गाडी नगरपालिकेपाशी आली. 'मा sss वशी' असं कोणी ओरडलं! पाहते तो शशि आणि लता! आले होते घ्यायला. टांगा ठरवलेला होता. लगेच बसलो नि निघालो माधवनगरला. मी, शशी मागे होते. लता व मधू होते पुढे टांगेवाल्याच्या शेजारी. 'मधू?' मला आठवेना.

शशी म्हणाला, हा आईचा मामेभाऊ – नाना पर्वत्यांचा मुलगा. सध्या कॉटन मिलमधे नोकरीला आहे. टांगा घरापाशी आला. फाटकातून आत गेलं तो अक्का वाटच पाहात होती आमची!

घर प्रशस्त छान होतं. फाटकातून आत शिरलं की आठ - दहा फुटांचं अंगण. त्यातच गोड्यापाण्याचा खड्ड्यातला नळ. कपडे धुवायसाठीचा दगड. घरात जायला चार पायऱ्या चढून जावे लागे.

आत गेलं की हॉल होता. अक्कानं हॉल छान सजवला होता! दोन सोफा कम बेड, मधे टी पॉय, एच एम व्हीचा रेडिओ सेट, भिंतीवर सीन-सीनरीच्या तसबिरी. बर्माशेल कंपनीच भलथोरलं कॅलेंडर लटकलेलं. एका कोपऱ्यात टेबल खुर्ची. त्याला डिझाईनचे कव्हर. मोठं लाकडी कपाट भरून पुस्तकं.

मधल्या खोलीत गेलं की एका कोपऱ्यात शिसवी लाकडाचा पलंग होता. शेजारीच गोदरेज स्टीलचं आरसेवालं कपाट होतं. बाकी जागेत भिंतीतली कपाटं होती. आणखी एक गोदरेजची अलमारी होती लहान. कमरेच्या उंचीची. त्यावर सुरेख फ्लॉवरपॉट होता. दादांचे पान तंबाखूचे सामान, अडकित्ता, पिना, पेन, सुटे पैसे पडले होते. सैंपाकघरात नुकतच किचन टेबल करून घेतलं होतं अक्कानं. लाल पाट होते बसायला. देव्हारा एका भिंतीतल्या दिवळीत होता. आजींची त्या शेजारी बैठक असे. ताक–लोणी काढणं, वाती करणं, निवडणं, टिपणं चालू असे न बोलता त्यांचं.

बाजूलाच कोठीची खोली होती. शिवाय जोडून बाथरूम. त्यातूनच मागे जायला दार. तिथूनच संडासासाठी शहाबादी फरशा टाकून वाट होती केलेली. मागल्या बाजूला विहीर होती समाईक. सकाळी रहाटाचे पाणी काढून ड्रम भरणे हे काम असे. पाणी शेंदायची मला तर बिलकुल माहिती नव्हती. शिवाय विहीर! बाप रे! वाकून पहायला सुद्धा घाबरे मी!

घराच्या एका बाजूला अर्धा प्लॉट मोकळी जागा होती. अक्काने हौशीने त्यात गुलाब, पारिजातक वगैरे लावले होते. शिवाय शंकासूर, हजारमोगरा, झेंडू बिंडू तर होताचं. मधल्या खोलीतून बाहेर बागेत जायला दार होते. दुपारचे जेवण झालं आणि दादांच्या पानांवर माझा डोळा होता. ते विडे बनवूनच आणत. मी एक तोंडात टाकला आणि आडवी झाले.

संध्याकाळी दादा आले. रात्री जेवताना आस्थेनं मला विचारलं, ‘कशी काय आलीस? पोहोचवायला कोण आलं होतं? मधू आला होता का? वगैरे. मी खरी तर मेव्हणी त्यांची, पण त्यांचा चेहराच असा दरारा पुर्ण होता! अक्कात व माझ्यात 7-8 वर्षांचे  अंतर होतं. तिच्यात अन दादांच्या 10-12 वर्षांचा तर होतं असं ऐकले होतं मी. मला ते मेव्हणे कधीच वाटले नाहीत. वडलांसारखे वाटले!

जेवणं झाली. सगळयांची अंथरुणं मधल्या खोलीत असायची. आजी कॉटवर, बाकी अक्का, दादा, शशी, लता मोठ्या तीन जणांच्या मच्छरदाणीत झोपायचे एकत्र. माझी सोय शेजारीच वेगळी मच्छरदाणी घालून केली शशीनं. अंथरुणं घालणं काढणं त्याचं काम. अंथरुणावर पडले. लगेच झोप लागली.

## दादा

मल्लिकार्जून मन्सूरचे शास्त्रीय संगीत संपले. रेडिओ स्विच ऑफ केला. मच्छरदाणी गादी खाली पुन्हा खोचून अंथरुणावर पडलो. थोडासा डोळा लागला असावा. इतक्यात दाराची कडी निघाल्याचा आवाज झाला. म्हणून मी जरा निरखून पाहिलं नाईट लँप मधे. बेबी वाटली उठलेली. काकूही असतील कदाचित असे वाटून मी डोळे मिटले. तेवढ्यात पुन्हा कडी निघाली. दार उघडल्याचा आवाज झाला. बाहेरची गार झुळूकही आत आली. तेंव्हा मी मच्छरदाणी उचलून पाहिलं तर, ती बेबी होती दारात! पटकन उठून मी दारात गेलो.

‘बेबी, अग बाथरूमला जायचय का? तो दरवाजा इकडे आहे’ असं म्हणालो. तर ती म्हणाली, ‘अं, हो हो, दारापासून परतली गेली. आपल्या मच्छरदाणी घुसली, झोपलीही!

मी अंगणातल्या बाजूला जाणाऱ्या दाराची परत कडी घातली. पुन्हा गादीवर झोपलो. ती परवाची गोष्ट. काल रात्रीही बारा-साडेबाराच्या सुमाराला दाराशी खुट्ट वाजलं म्हणून मला आपसूक जाग आली. दार सताड उघडलेलं! बेबी दाराची पायरी ओलांडतीय!

खडबडून उठलो. तिच्याजवळ जाऊन खांद्यावर हात ठेऊन विचारलं, ‘अग बाथरूमला बाहेर कशाला जातेस? आतच जा. दिवा लाव.

म्हणाली, ‘हो हो.’ आणि लगबगीनं गादीवर जाऊन पडली. मच्छरदाणी न खोचताच! मीच डास चावतील म्हणून तिची मच्छरदाणी खोचून झोपलो झालं.

काल रात्री मात्र मी बॅटरी घेऊन झोपलो, काकूंना दम्याच्या खोकल्याची उबळ आली म्हणून जाग आली. तो इकडे कडी काढून बेबी दाराच्या पायऱ्या उतरतेय! मी झटकन बॅटरीचा प्रकाश तिच्यावर पाडला. तो ती पायऱ्या उतरून उजवीकडे वळून फाटकाकडे वळली! म्हणताना मी मच्छरदाणी बाजूला सारून उठलो. कोपऱ्यात शशीचा बॅट पडली होती, ती हातात घेऊ अनवाणीच बाहेर पडलो. तोवर ती फाटकापाशी पोहोचलेली! बॅटरीचा झोत तिच्यावर टाकून दरडावतच मी तिला म्हणालो, ‘बेबी कुठे निघालीस?’

ती पुढेच चाललेली! मग मी तिच्या दंडांना धरले आणि गदागदा हालवले, ‘बेबी, बेबी’, असे म्हणालो. कुठे निघालीस रात्रीची?

असे म्हणता, ती हात वर करून म्हणाली, ‘ते काय, ते बोलावतायत मला. मी जाऊन येते!’

दंडाला धरून तिला परत फिरवली. रस्त्यावर दूरवर कोणीच नव्हते. बॅटरीचा झोत टाकून पाहिला. रस्ता निर्मनुष्य होता. तिला परत नेलं. तर सरळ आपल्या अंथरुणत जाऊन झोपली. मी पुन्हा बाहेर जाऊन पाहून आलो रस्त्यावर.  कुंपणाला लावलेल्या कडू कोयनेलच्या झुडुपांची नीट तपासणी केली. इतक्यात एक दोन जण येताना दिसले. रात्रीच्या कामगारांना चहा देण्यासाठी हातात पेटवलेली शेगडी व किटली घेऊन जाणारे ते चहावाले होते. त्यांना विचारलं, ‘कुठून आलात रे?’

ते म्हणाले, ‘तिकडून हळिंगळयांच्याकडून आलो आता सांगल्यांच्या मागाकडे चाललोय.’

‘आत्ता इकडून कुणी जाताना पाहिलेत का तुम्ही?’ मी म्हणालो.

‘नाही बाबा’ ते म्हणाले. मी परत आलो. गादीवर पडलो. मंगलाला उठवावे काय असे वाटले पण नाही उठवले. रात्र विचारात काढली.

# बेबी

तरी म्या सांगतच व्हतो सगळयास्नी, हिला जाऊ देऊ नका म्हनून. ऐकलं न्हाई. आता हितं आलोय हिच्या बरोबर. पन ही भाईर पडलं तर शप्पत. आज चार दीस झालं ही घराभाईर य़ीना. दोन्दा गेली ती तिच्या भनी बरबर देवळात. वाटेत एक झाड न्हाई बसायाला. मी तरी काय करनार. बाकीचे म्हनायला लागलेत, 'काड रातीला भाय़र तिला. पहाटच्या प्यासंजरनी नेऊ परत तिला पुन्याला. कटकट नको.'

दोनदा भाईर काडता काडता, त्यो दादा उटलान धरून घिऊन ग्येला. तिसऱ्यांदा म्याच लई जोर केला. अन नेली फाटका पातूर. बाकीचे काय जवळच येईनात. म्हनत्यात, 'तू पकडलंस, आता तूच घिऊन चल. मी यकटा किती वडनार?

त्येवड्यात आला दादा. ब्याटरी घ्युन म्हनला, 'ब्येबी, ब्येबी हित कशी?' परत घ्युन गेला. माझ्यासकट. वाटलं हात सोडावा अन पळाव यांच्या संगट. आमी धा बारा जन आलोया हिच्या संगट पुन्यासनं. पन ती हात लावाया तयार होईनात. म्हनत्यात, 'हा दादा आला की भ्या वाटतया! खर तर हे घरच वाईट हाय आमास्नी! सगळी मानसं हैत खमकी!. दोन चार पोटू बघितलं सामीबिमीचं. दादाचं लैच भ्या वाटतया आम्च्या लोकास्नी. आता काही नवा उपाय केला पायजे. जरा घाबरावावं काय यास्नी?

## दादा

पडलो मी अंथरुणावर. विचार करायला लागलो. ही बेबी चालली कुठे? झोपेत आहे? का जागी? झोपेत आहे म्हणावे तर कडी व्यवस्थित काढून कोपऱ्यात पडलेल्या चपला घालून होई तोवर तिला जाग आली नाही कशी? मग जागी म्हणावं तर आत्ताच ही चालली कुठे? काही कळत नाही. झोपेत चालणारे असतात त्यातला तर प्रकार नव्हे?

'ते, ते कोण ते, म्हणजे कोणी आदरार्थी व्यक्ती असावेत. मग ते आत्ता रात्रीला का बोलावतील? कोण असतील? असे गुरू असणे शक्य नाही.

करेक्ट, ते म्हणजे 'बरेच जण!'

पण असे कोण बसलेत बोलवायला? नेणार कुठे तिला? क्षणिक विचार केला की मी कोणास नेणार आहे म्हणून, तर मी कुठे जाणार

पायी लांबवर? म्हणजे कुठे विठोबाच्या देवळात? का तिकडे साखर कारखान्याकडे? नाही काहीच पर्पझ नाही त्यात मग ...

आता रात्री दोनला एसटी, टांगे इतर वाहनंही जात नाहीत सांगली, बुधगावला. मग काय असेल? एखादी मालगाडी, एक पॅसेंजर जाते पुण्याकडे. असो.

तिला काही भ्रम झाला असावा स्वप्नात. खरंच स्वप्न म्हणजे काय? स्वामी म्हणायचे प्रवचनात, ‘स्वप्नावस्था, ही एक अवस्था आहे. जागृती आणि सुषुप्ती मधली. जेंव्हा निद्रेत आत्मा शरीर कोषाच्या बाहेर हिंडत असतो, तेंव्हा त्याची शक्ती अशक्यातीत असते. तो जेंव्हा वासनामय वस्तूंवर बसतो आणि त्याची ओढ शऱीराला लागते. त्या आत्म्याच्या अवस्थेला स्वप्नावस्था असे म्हणतात. अशी अवस्था तर नसेल हिची?

ते जरा अवघडच आहे! आम्ही इथे रोज बसतोय ध्यानाला, तरीही इतकी प्रगती नाही, काही लागीर तर नाही?

मंगलाला उद्याच सांगावे.

# अंधारछाया

## चार

### मंगला

गेले चार रात्री काही माझा डोळयाला डोळा नाही. ह्यांनी सांगितलं, ही बेबी अशी कड्या काढून बाहेर जाते म्हणून. मी हबकलेच. हे रात्री जागे झाले म्हणून बरं. गेली असती पुढे चालत एकटी तर शोधायची कुठे तिला ? आधीच ही नवीन गावात. रस्ते माहित नाहीत. काही म्हणता काही होऊन बसलं असतं बरं. मी यांना सांगितलं, ‘आधी सगळया दारांना कुलुपं घाला रात्रीची. मगच मला झोप येईल.’

हे म्हणाले मला, ‘विचार तिला काय होतंय झोपल्यावर म्हणून. पण ती म्हणते, ’काही नाही. मी झोपते छान. इथे आल्यापासून झोप छान लागतेय ’. मला पुढे काही सुचेना विचारावं कसं ते. आता हे

अंघोळ करून येतील चहा नाश्त्याला, तेंव्हा काढते विषय तिच्याजवळ. आज शनवार आहे. शशी-लता पण गेलेली आहेत शाळेत सकाळच्या. नाहीतर त्यांनी कान टवकारले असते लगेच!

'बेबी, चहा झाला गं, येतेस का आत स्वैंपाकघरात?'

'हो आले' म्हणत आली. 'सकाळ वाचतेय ग. अक्का, पुण्यात विजयानंदला "सांगत्ये ऐका" शंभर आठवड्याच्यावर चाललाय! माहिती आहे का? मला इतका पाहायचा होता तो! पण काकांना म्हटलं तर वसकन अंगावर आले. काही पहायला नकोत तसले नायकणींचे तमाशापट. मग राहूनच गेलं.'

'अग आपल्या काकांना कोण देणार तसल्या तमाशाप्रधान सिनेमात काम? म्हणून राग असेल त्यांचा अशा सिनेमांवर' मी म्हणाले.

चहाचा कप हाती दिला. पाट पुढे सरकवून हे बसले जरा आरामात आणि मग म्हणाले, 'का गं बेबी, परवा विचारलं कशी काय झोप लागते तुला इथे म्हणून, तर म्हणालीस की छान लागते म्हणून. खरे ना'?

‘हो, का?’

‘हे पहा तो पेपर ठेव खाली. नंतर वाच’.

‘हे म्हणतायत तुला रात्री उठायची सवय आहे. उठतेस का तू रात्री?’

‘कोण? मी?’

‘अरे गंमतच आहे! तुला काय म्हणायचंय की तू उठतच नाहीस म्हणून?’ मी विचारले.

‘हो मी कशाला उठेन? मला रात्री बाथरूमला सुद्धा जायला भिती वाटते म्हणून तर मी झोपतानाच करून येते लताला सोबत घेऊन.’

मी यांच्याकडे पाहिलं. ते गंभीर होते. मग हेच म्हणाले, ‘का ग बेबी, तुला स्वप्नं बिपनं पडत होती का गेले काही दिवस? कोणी सांगतंय, उठ चल तिकडे. बाहेर जाऊ. फिरून येऊ. सिनेमाला जाऊ. खायला हॉटेलात जाऊ वगैरे’

'नाही स्वप्न तशी काही नाही पडली! निदान पडली असली तरी आठवत नाहीत!'

'बरं जाऊ दे. नाही पडत ना? ठीक आहे. मंगला, तू मुलांना व हिला घेऊन आज नाही तर उद्या जरा सांगलीला जाऊन फिरून सिनेमा पाहून या. अंबोळी, इडली खाऊन या' हे म्हणाले.

'आज शनिवार बाजारची गर्दी, आम्ही उद्यालाच जाऊ. अहो, मग तुम्ही पण चला की. सगळेच जाऊ.'

ह्यांनी तंबाखूचा बार भरला. पेपर हातात घेऊन चष्मा पुसत हे बेबीला म्हणाले, 'का ग तुझ्या चपला तू रात्री मधल्या खोलीच्या बाहेर का ठेवतेस? आम्हीतर सगळे बाहेरच्या खोलीतल्या स्टँडवर ठेवतो चपला. गेले चारपाच दिवस पाहतोय मी.'

'काही नाही असंच. उद्यापासून ठेवीन बाहेरच्या खोलीत हं अक्का?' बेबी म्हणाली आणि उठून गेली.

शशी–लताला रविवारचा सिनेमा–हॉटेलिंगचा बेत कळला. पोरं लागली उड्या मारायला. आमचं ठरलेलं होतं साधारण महिन्या दीड

महिन्यातून एकदा जायचे सिनेमाला, फिरायला सांगलीत. टांगा ठरवून.

सगळीकडे झोपाझोप झाली. मी कड्या लाऊन कुलुपे लावली. पुढच्या, मधल्या, दारांना. पडले गादीवर. महिला मंडळाचा नवरात्रीचा हिशोब यायचा होता शिंत्रेबाईं कडून. समोरच्या अंबूताईंना बोलावणार आहे गप्पा मारायला. गव्हले छान करतात एक हाती. काकूंनाही दम्याचा त्रास वाढलाय. त्यांना तरी कशाला म्हणावं करणार का? विचार करत करत केंव्हा झोप लागली कळलं नाही.

एकदम जागी झाले! ह्यांच्या गादीवर हात ठेऊन पाहिला. तेव्हड्यात कोपऱ्यातून काठी घेतल्याचा आवाज आला. त्यासरशी उठले मी धसक्यानं! दार उघडलेलं! हातात धुणं वाळत घालायची काठी घेऊन हे बॅटरीच्या प्रकाशात जाताना दिसले. मी ही उठले झटक्यात. सापडली ती केरसुणी घेतली हातात! अनवाणीच गेले बाहेर. तोवर हे पोचले होते फाटकाच्या बाहेर. ह्यांच्या पुढे ही भवानी! तरातरा चालली होती. मला कळेना, ओरडलेच, ‘बेबी, ए बेबी. ढिम्म नाही. हे मागे वळून हातानेच म्हणाले, ‘थांब’ म्हणून. आणि आपण गेले तिच्या मागोमाग. भस्मे टांगेवाल्याच्या शेजारी पवारची चाळ होती. तिकडे

तर नाही चालली ही? मग मला राहववलं नाही, ‘अहो आणा बरं पकडून तिला.’

हे गेले. धरला दंड तिचा. गदागदा हालवलं तिला. काही पत्ताच नव्हता तिला. परत फिरवली तर यायलाच तयार नव्हती. दंड सोडवायला पहायला लागली. तेवढ्यात मी पोचले. धरली बखोट्याला दोघांनी आणि ओढत आणली तिला घरात.

इतकं धस्स झालं. पाह्यलं तर कोणी उठलेलं नव्हतं म्हणून बरं! नाही तर काय म्हणली असती लोकं?’

घरात पाऊन ठेवलन आणि एकदम आपली हात सोडवून अंथरुणात परत चपला सकट!

यांनी मला खूण केली, असू दे म्हणून. मग मी आणि हे बाहेरच बसलो होतो घराच्या पायरीवर. गार गार वारा होता. कोपऱ्यावरच्या दिव्यामुळे लांब लांब सावल्या हालत होत्या झाडांच्या. मनःस्थिती जरा शांत झाली. तशी हे म्हणाले, ‘जरा कॉफी टाकतेस का? नाही तरी झोप गेलेलीच आहे.’

‘आता कसल्या कॉफ्या पिताय? ह्या पोरटीच काय करायच ते बोला? आता रोज का असं धावायचं मागे?

'मंगला, तू आज कड्या कुलुपं लावलीस ना? नीट? नक्की?

'हो?'

'मग किल्ल्या कुठे ठेवल्यास? मला वाटलं ठेवल्या असशील माझ्या उशाखाली!'

'हो बाई, विसरलेच मी, आपल्या उशाशी ठेवायला! कुलुपं लावली आणि ठेवल्या किल्ल्या कपाटावरच.

'बेबी काय करत होती तेंव्हा?'

'काय की बाई! असेल इथेच कुठेतरी. नाही, पण आज लता शशी अन् आजी बसले होते कवड्या खेळत. सगळी अंथरुणावर पडली. मगच मी कुलुपं घेतली घालायला. पोरांनी विचारायला नको म्हणून.'

'अस्सं? ठीक! मला वाटतं तिला अजून माहिती नाही आपण बाहेर जाऊन आलोय ते.'

आतून काकूंचा ढास लागल्याचा आवाज झाला. अन आम्ही आत गेलो. ह्यांनी कॉफी करायला लावली. रात्र जागवून काढली आम्ही. बेबीचं उठणं पथ्यावर पडलं म्हणायचं माझ्या!

# बेबी

का sss न, का sss न अशा दोन झापडा लगवाव्यात यास्नी! कोण उठाया सांगितलं यास्नी? म्या तर वाईच डाव धरून होतो, किल्या कुठ हैत म्हणून. त्यो दादा उशी खालती ठेवायचा. हात घातला एक डाव. जमेना म्हणताना पडले गप. आज चांगला वकूत आला होता. भैनीनं ठेवलेली पाह्यली किल्ली. मग म्या केलाच चटका. तिकडं ती चाळीच्या कडंला बसली व्हती दबा धरून. पर दोघं दोघं धरून निघाली परत न्यायाला म्हनल्यावर मला बी कुठवर पेलणार? हे नुस्ते बघत बसले व्हते! एक रांडीचा जवळ येईल तर शप्पत! सगळं म्हनत्यात, 'इकती वर्स झाली. धरलं तवा पासून. देतासा का तिच्या आत?'

आता इकडं आलियात. मी सोडन तिला म्हनून. आलेत संग संग.

त्यो ढोल्या म्हणतो, 'मी हिला धरतो. आता हित मटनाचं जेवान बिवान देतो म्हनत्यात. तू फक्त सोड तिला. मी बघतो तिच्याकडं. बघ कसा बकाबका खातो ते.'

चकन्य म्हनतो, 'हित आलो कशापाई? पुन्याला पाडली झाडं चिंचा-बाभळीची. आता जावं कुठ आमी? आधी भनीचा दादला मारपीट करायचा सनीमा बघतो म्हनून! म्हनून जीव दिला हिरीत. आता बसलोय वाट बघत. पुन्यात लै पंचाईत झालिया. लोकाला ऱ्हायाला जागा न्हाई. आमी तरी कुट कुट बसावं वळचणीला? बरेच दिस पडून होतो हिरीतल्या पिंपळावर. दोन वर्स धरले एका डोरकीपरला. पण ते मेलं. मी बी थांबलो वाट बघत दुसऱ्याची. ही बरी होती. हिचं कुळ झालयं बुद्ध! खाईना. पिईना. सोडलं तर धरावं म्हनतोय.'

# अंधारछाया

## पाच

## मंगला

सदासुखला तीनचा शो पाहिला. तिथेच कॅफे रॉयलमधे आंबोळया, टॉमॅटो आम्लेट खाल्ले. परत टांग्यातून येता येता साडे आठ झाले. काकू वाट पहातच होत्या आमची.

अंथरुणे घालून पडलो. मुलं झोपल्यावर हे दारांना कड्या कुलुपं लावून आले. उशी खाली किल्ल्या ठेवून झोपलो. पण कालचा प्रकार आठवून झोप थोडीच येत्येय?

रात्र अस्वस्थेतच गेली. हे ऑफिसातून संध्याकाळीच एकदम येणार असा निरोप तातोबा घेऊन आला. मग आम्ही तिघींनी जेवणं उरकून घेतली. पडलो मधल्या खोलीत मासिकं वाचत. इतक्यात दारावरची बेल वाजली.

जरा त्रासातच दार उघडले, तर दोन अनोळखी बायका दारात. म्हणाल्या, ‘आम्ही सांगलीहून आलोय. आपण महिला मंडळाच्या अध्यक्ष आहात, म्हणून भेटायला आलोय.’ दारातून कटवणार होते. पण ‘आत या’ म्हणावं लागलं. एक बाई होत्या स्थूल, गोरटेल्या. जरा थोराड वाटल्या. घारे डोळे, कलप लावलेले केस विरळ होत चालले होते. दुसरी बरीच ओढग्रस्त खप्पड वाटली. दोघींच्या हातात मोठ्या पिशव्या होत्या. मेतकूट, पापड असावेत असं दिसलं.

कोचावर जरा दबकत बसल्या. पाणी देऊन दोघींसाठी फॅन सुरू केला. आणि म्हटलं, ‘बोला’

त्या थोराड बाई म्हणाल्या, ‘आम्ही सांगलीत गाव भागात राहतो. आमचा वाडा आहे गाव भागात. येतानाच्या चढावर. माझे यजमान रिटायर झाले, मग त्यांच्या पेन्शनवर व घर भाड्यावर भागेना. म्हणून घरगुती पदार्थ बनवायचा धंदा करते. मेतकूट, पापड्या, कुरडया, लोणची, मसाले सगळं आम्ही घरी बनवतो. माधवनगरात जर माल विकता आला तर फार बरं होईल. मला जरा मंडळातील बायकांची नाव, पत्ते दिलेत. तर आपलं नाव सांगून विकेन म्हणते. बाजारपेक्षा आमचा माल स्वस्त व चांगला आहे. हे बघा सँपल’ असं म्हणत त्यांनी काही पापड कुरडयांचे पॅकेट हातात दिले. माल

पाहताच कळत होत चांगला आहे म्हणून. आपल्या हातून जर मदत होत असेल त्यांना तर काय हरकत आहे असा विचार करून ह्यांच्या लेटर पॅडवर बायकांची नाव व पेठा लिहायला घेतले.

बेबीला हाक मारून म्हटले, ‘अग जरा चहा टाकतेस का? आणि हे बघ हे पापड पण आण तळून.’ हो म्हणत बेबी बाहेर आली. पापडाचे पॅक घेऊन आत गेली.

चहा बनवून आणे पर्यंत मी सहज विषय काढला त्यांच्या घराचा. वाडीकरांच्या मंगल कार्यालयात जाताना एकदा पाहिल्यासारखा वाटला बोर्ड. म्हणाल्या, ‘आहे मोठा वाडा. पण भाडेकरी जुने. भाडेही कमी. लोकही टाळाटाळ करतात. बायकामाणसांना कोण विचारतोय? शिवाय मागच्या बाजूला एक खोली दिलीय एक गुरूजी म्हणून आहेत त्यांना. ते आठवड्यातून सोमवारी, गुरूवारी येतात कोल्हापुरहून. त्यांना भेटायला लोक येतात कुठूऩ कुठून. आधी आधी कौतुक वाटलं. पण आता डोकेदुखीच झालीय. लागिराचे, भ्रमिष्ठ लोक येतात त्यांना दाखवायला. आणि ओरडा, त्रास आम्हाला होतो. बरं बोलायची सोय नाही. खरं तर मलाही त्यांनी मदत केलीय काही वर्षांपुर्वी, आमच्या पडत्या काळात.’

मला उगीचच गुरूजींची उत्सुकता वाटली. एकदा वाटलं झाला प्रकार सांगावा का या बाईंना? पाहू काय म्हणतात ते!

चहा आणि पापड तळून आलीच बेबी. आणि मी तो विषय काढला नाही. बेबीची ओळख करून दिली. चहा पिऊन त्या बाई लगेच उठल्या. चपला अडकवून निघायला लागल्या. तेंव्हा बेबीला मी दोन रुपये आणायला सांगितले, पापडाच्या पॅकेटचे. तशा थांबल्या. दोन रुपये हातावर ठेवले आणि म्हणाले त्याबाईंना, 'जरा थांबता का मला काही बोलायचय तुमच्याशी.'

दुसऱ्या बाई पुढे होते म्हणाल्या. गेल्या. बेबी आतल्या खोलीत गेल्याचे पाहून जरा दबक्या आवाजात त्यांना थोडक्यात सांगितले, काय झाले ते. त्यांचं म्हणणं पडलं अशा केसमधे त्यांच्याकडेच जावे. त्यांचा चांगला गूण आहे. मुख्य म्हणजे ते भोंदू किवा खोटारडे नाहीत व पैसे मुळीच घेत नाहीत.'

'बरं येते' म्हणून त्या गेल्या व उगीचच मनाला हलकं वाटलं.

रात्री जेवणं झाल्यावर हे टाईम्स वाचत बसले होते कोचावर. तेंव्हा रेडिओचा आवाज जरा मोठा करून मी ह्यांना त्या बाईंबद्दल व गुरुजींबद्दल सांगितले. तसे हे म्हणाले, 'हे पहा, उद्या डॉ. फडणिसांकडे घेऊन जा पाहू. त्याना दाखवून ते टॉनिक्स वगैरे देतात का ते विचार.

जरा जाऊ देत दोन चार दिवस. कदाचित थांबेल तिचे बाहेर जाणे आपोआपच.'

त्या रात्री काहीच घडलं नाही. तिच्या चपलाही मधल्या दाराशी नव्हत्या!

मंगळवारी सकाळी आम्ही  डॉक्टर फडणीसांना जाऊन दाखवले. त्यांनी नेहमी प्रमाणे हसत खेळत तिला बोलतं केलं. वजन उंची घेतली. नाडी, बीपी घेतला. केस पेपर तयार करून मला म्हणाले, 'जनरल वीकनेस आहे. हिमोग्लोबिन पाहायला हवं. ब्लड, युरीन टेस्ट करून घेऊ. मी ही औषध देतो ती रेग्यूलर घ्या.'

एकदा वाटलं सांगावे का यांना रात्रीचे प्रकार? पण हे म्हणाले होते, डॉक्टरांशी या बाबत बोलू नकोस म्हणून.

संध्याकाळी आम्ही शनिवार पेठेतील दत्ताला जाऊन आलो. आजी मधल्या खोलीतल्या दारात बसल्या  होत्या. शेजारच्या पाटलीण बाईंशी बोलत. म्हणून तिथे चपला काढून आम्ही आत आलो. थोड्या वेळानं शशीनं सगळया चपला बाहेरच्या खोलीत स्टँडवर ठेवलेल्या पाहिल्या. मी भाकरी करत होते. तेवढ्यात हे आले. सायकल भिंतीला वाकडी करून लावत जरा त्रासातच बोलले, 'बेबा कुठाय? तिच्या

चपला इथे मधल्या दारात कशा? मी चमकलेच. बेबीने पटकन चपला बाहेरच्या खोलीत नेल्या. आजची रात्र कशी जाणार होती? मी तेंव्हाच ठरवलं गुरूवारी गुरूजींना दाखवायचं.

बुधवारची सकाळ उजाडली. बेबीला पाहिलं अंथरुणात आणि मनांत हायसं वाटलं. 'आता आजची रात्री ठीक जाऊ दे रे बाबा' असे म्हणत मी स्वामींना नमस्कार केला. दुपारची भिशी होती, शरयूबाई भिड्यांच्याकडे. छान झाले होते दोन्ही पदार्थ. पण माझे मनच त्यात नव्हते. धाकधूक होती. ही आजींबरोबर राहील ना? घरात निघून जायला रात्र थोडीच लागतेय? भिशीत इतर कोणाला आणायचे नाही असं ठरल होतं, म्हणून माझ्याही नाईलाज होता!

चपला काढता काढता बेबीच्या चपला दिसल्या. आपण जरा जास्तच धास्तावलो होतो की काय असं वाटलं.

त्या रात्री ह्यांनी सगळयांच्याच चपला दडवून ठेवल्या कुठेतरी. म्हणाले, 'चपला मुळेच अडत असेल तर आज रात्री ही काही जात नाही.'

गुरूवारचा दिवस उजाडला. दुपारचा चहा घेऊन साडेतीनला सांगलीला जायचं ठरलं आमचं. तेवढ्यात ह्यांना शेठचा फोन आला.

म्हणून ह्यांच येणं रहीत झालं. चहा पिता पिता मी बेबीला म्हणाले, ‘अग सांगलीला एक ज्योतिषी आहेत. पत्रिका, हात वगैरे पाहतात. दादा म्हणाले, ‘दाखवून ये तुझी पत्रिका त्यांना. जाऊ या का आपण आज?’

‘आज? माझी तर काहीच तयारी नाही. आजच जायला हवे का? उद्या परवा जाऊ?’ बेबी म्हणाली.

‘नाही, आजच भेटतात ते म्हणे. चल कपडे बदल. निघू अर्ध्या तासात.’ तिने माझी पांढरी साडी नेसली. पर्स वगैरे घेऊन आम्ही सव्वाचारला बस स्टँडवर होतो. रेल्वे क्रॉसिंगचे फाटक बंद होते. म्हणून गाड्या अडकल्या होत्या. एक मालगाडी गेली रेंगाळत. फाटक उघडायला सुरवात झाली तशी आम्ही जरा तयारीत उभ्या झालो, तो हिची पाठ माझ्या बाजूला झाली. पहाते तो पोलक्यावर काळया फुल्या! काळया कुळकुळीत! डिजाईन सारख्या फुल्या! मी पटकन तिचा पदर पाठीवरून ओढून घेतला. तिला म्हटले, ‘अगं पाठीवर काय हे पाहिलस का?

‘काय आहे?’ म्हणत तिने माझ्याकडे पाहिले. इतक्यात धूळ उडवत बस आली. आम्ही लगबगीने आत चढलो.

## गुरूजी

ॐ नमः शिवाय, ॐ नमः शिवाय असे म्हणा माझ्याबरोबर 108 वेळा. मी देतो ही पुडी भस्माची आहे. ती रोज सकाळी संध्याकाळी लावायची आणि कमीत कमी रोज 108 माळा करायच्या. मला येऊन सांगायचं पुढच्या गुरुवारी. मी मंत्र दिला.

इतक्यात बाई चहा घेऊन आलेल्या दिसल्या. बऱ्याच दिवसात बाई माझ्या करता चहा घेऊन आल्या नव्हत्या. मला आश्चर्यच वाटलं!

प्रत्येकाचं असंच असतं. गरज असली की मारतात लोक चकरा. पुढे कुणी कुणाला विचारतही नाही. या बाईंना इतकी मदत केली. माझ्या सारखा खंबीर म्हणून निभावलं मी. हिचे यजमान मला ही खोली घेऊन रहा म्हणाले, पुढे ही बाई बरी झाली. मग पुढे आमच्याकडे येण्याचं बंद झालं. मग कुठला चहा अन काय!

बाई या ओकबाईंना चहा द्यायला आल्या होत्या होय! त्यामुळेच मला चहा मिळाला म्हणायचा! चहा घेता घेता ओक बाईंनी विचारले,

‘आपण कुठले? ही विद्या कुठे शिकलात? आपणाला भुतं खेतं त्रास देतात का? ’

मग मी सविस्तर उत्तर देत गेलो. ‘मी तसा हरिपुरचा. जळितानंतर नांद्र्याला प्राथमिक शाळेत शिक्षकाच्या नोकरीसाठी आलो. लहानपणापासून भुताखेतांचे प्रकार पाहिलेले. तिथेच एक जोशी महाराज म्हणून होते. शिवाचे भक्त. त्यांना भूत प्रेत योनीच्या माध्यमाशी बोलता येई. त्यांनी बऱ्याच लोकांना सोडवले. सुधारले. प्रथम मी भीत असे असल्या प्रकारांना. मग धीट झालो. त्यांच्या कडून ॐ नमः शिवाय मंत्र घेतला. त्यांच्या हाताखाली काम केले. त्यांनीच कुंडली पहाणे, हस्तसामुद्रिक, थोडाफार आयुर्वेद शिकवला. पुढे ते वारले. तसे लोक माझ्याकडे यायला लागले. मग मी इतर गावात गेलो. लोक तिथेही पिच्छा पुरवीत. आता मी कोल्हापुरात दोन दिवस व इथे दोन दिवस येतो. सोमवारी आणि गुरूवारी.

चहा घेऊन त्या गेल्या. मी पुढली केस घेण्यासाठी आलेल्या पागोटेवाल्यांना म्हणालो, ‘या मामा.’

# अंधार छाया

## सहा

## बेबी

गुरूजींनी जे सांगितलं त्याच्यावर माझा विश्वासच बसेना! काय मला कोणी झपाटलय? कस शक्य आहे? मी तर माझी मीच आहे. खातेय पितेय, आणखी कोण असणार माझ्या शरीरात?

गुरूजी म्हणाले, ‘हिचा पत्रिका जरा विचित्र आहे. अनिष्ट ग्रहयोग मान आहे. शिवाय सध्या साडेसातीही चालू आहे. तिच्या राशीला. तेंव्हा त्रास हा होणारच.’ ते ठीकच होत. माझी तब्बेत ही अशी लुकडी सुकडी. शिक्षणाचे असे तीन तेरा वाजलेले. तेंव्हा कुंडलीच्या भविष्यावर माझा विश्वास बसला. पण पुढे लागिराबद्दल म्हणताना मला काही खरंच वाटेना. अक्का म्हणाली त्यांना, ‘गुरूजी

आम्हाला नक्की काय ते सांगा बरी होण्यासारखी आहे का तुमच्या उपायांनी? का नाहीतर आम्ही तिला परत पाठवू पुण्याला? आईवडील पाहून घेऊ देत काय ते.’

गुरूजींनी मग बऱ्याच जणांचे दाखले दिले. म्हणाले, ‘काही चिंता करून नका, ही बरी होईल. तुमच्याकडेच राहू दे तिला. घरी आईवडिलांना नका कळवू आत्ताच. फक्त माझ्यावर विश्वास ठेवा. मी देतो तो मंत्र म्हणत चला.’ आणि आम्ही ॐ नमःशिवाय मंत्र घेऊन भस्माच्या पुड्या घेऊन आलो बाहेर.

## मंगला

बस मधून उतरले शिवाजी मंडईपाशी. झपाझप पावलं टाकत पोचले गुरुजींच्या वाड्यात. बेबीला वाटेत मागेमागेच ठेवलं. तिच्या पोलक्याकडे पहायची छातीच होईना माझी! केंव्हा केलन हे गधडीनं? आपण काय करत होतो हे ही करे पर्यंत? असे विचार सारखे येत होते मनात, बसमधे बसल्या बसल्या.

गुरूजी बसले होते जपमाळ घेऊन खुर्चीत. मी माझी व बेबीची ओळख करून दिली. हिच्या रात्रीच्या हकीकती सांगून टाकल्या सविस्तर. बेबीलाही त्यांच्या बरोबरच कळत होते. निदान तसे ती दाखवत होती. शेवटी पाठ करून दाखव म्हणून सांगितलं. गुरूजींना काळया फुल्या दाखवल्या!

एकंदरीत तिची कुंडली व हकीकत ऐकून ते म्हणाले, 'हिला बाधा आहे. कितपत कडक आहे आत्ताच नाही सांगता येणार. पण एकंदरीत काम कठीण वाटतय. या तऱ्हेच्या केसेस मी हाताळतो. पण यासाठी दोन गोष्टी हव्यात. मंत्र म्हणण्याची चिकाटी व काहीही संकटांवर मात करायचे धैर्य हवे. सर्वात मुख्य म्हणजे माझ्यावर विश्वास हवा. मला खात्री आहे की मी हिला बरी करेन.'

गुरुजींचे बोलणे, त्यांचे व्यक्तिमत्व यानी मी प्रभावित झालेली होतेच. मी लगेच तयार झाले. मला फुल्यांबद्दल जाणून घ्यायची खूप उत्सुकता लागून राहिली होती. 'गुरूजी, या फुल्या का व कशा पडल्या? ही रात्री जाते कोणाच्या बोलावण्यावरून? हे काय गौड बंगाल आहे?

गुरूजी म्हणाले, 'आलो हं जरा भस्माच्या पुड्यासाठी रद्दीचा कागद आणतो आणि सांगतो.' कागदाचे सारखे भाग करत गुरूजी म्हणाले, 'त्याचं असं आहे. हिच्यातल्याला ती इथे, तुमच्याकडे आलेलं आवडलं नसावं. म्हणून काही ना काही कारणांनी तिला तुमच्या घरातून घालवायचे प्रयत्न आहेत. रात्री असे केले की कदाचित घाबरून तिला आईकडे पाठवेल असतेत.'

'हो बाई. तुम्ही भेटला नसतात तर एव्हाना तिला आम्ही घरीच पाठवली असती.'

त्याला तुम्ही बधला नाहीत. शिवाय माझ्याकडे आणायचं ठरवलंत. म्हणून तुम्हाला आणखी भिववायला त्या फुल्या पडल्या पोलक्यावर.'

'पण मग बेबीला इथे येणार आहोत, तुम्हाला दाखवायला, हे माहितही नव्हते! अगदी निघायच्या अर्ध्या तासापर्यंत!

'तुम्हाला काय वाटतं बेबीचं हे जाणं, तिच्या पोलक्यावर फुल्या पडणं, तिच्या हातून होतंय? तिला याची माहितीही नाही! विचारा तिला' गुरूजी म्हणाले.

बेबीन मानेनच नाही म्हणून सांगितलं.

गुरूजींनी मग ॐ नमःशिवाय मंत्र आम्हाला दिला. भस्माच्या पुड्या दिल्या व बेबीला बाहेर जायला सांगितले.

गुरूजी खालच्या स्वरात म्हणाले, 'हिची पत्रिका फारच वाईट आहे. शनिमंगळ युती, स्वस्थानातील राहू, केतूची वाईट दृष्टी तिच्या लग्न स्थानावर आहे. नीचेचे सर्व योग गर्दी करून आहेत. धन स्थानातील गुरू त्यातल्या त्यात बरा आहे. तेंव्हा एकंदरीतच हिचे आयुष्य त्रासाचे आणि हाल अपेष्टांचे जाणार आहे. पुढील काळात लग्नानंतर पतीसुख कमी मिळेल. एका अपत्याचा अपमृत्यू, संतती पासून मानसिक ताप व शारीरिक कष्ट उद्भवतील. सट्टा-जुगार यापाय़ी पतीच्या पैशाचा व्यय होईल. वारंवार जीव देण्याचे प्रसंग. वडीलधाऱ्यांकडून मारपीट संभवते. असो.'

'सध्या तिच्या राशीला साडेसाती चालू आहे. म्हणून तिला ही बाधा, शिक्षणात खंड, शारीरिक दुर्बलता वगैरे आहेत. घाबरू नका. अमक्या ग्रहाची शांती करतो, मृत्युंजय मंत्राचा जप ब्राह्मणांकडून करवून घेतो, इतके ब्राह्मण जेवायला घालतो वगैरे करून पैसे उकळणाऱ्यांपैकी मी नव्हे. माझे चरितार्थाचे साधन वेगळे आहे. हे सर्व मी काहीही पैसा न घेता करतो. याच्यासाठी माझ्याजवळ एकच साधन आहे, ते म्हणजे हा मंत्र. मंत्राच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा. सर्व काही ठीक होईल.'

'हो आणि एक लक्षात ठेवा. ही नुसती सुरुवात आहे. पुढे आणखी बरेच वाईट अनुभव यायची शक्यता आहे. पण घाबरू नका. धीर सोडू नका. प्रथम प्रथम एकशे आठ माळा करता आल्या नाहीत तर तिचा हात धरून तुम्ही म्हणालात तरी चालेल. आधी नक्कीच खळखळ करेल ती जपाला.'

बाईंनी चहा आणला, आम्ही आलोय हे पाहून. त्यांचा माल हातोहात विकला गेला होता. बऱ्याच ऑर्डरी मिळाल्या त्यांना. मलाही बरं वाटलं ऐकून.

## बेबी

‘कोन ह्यो गुर्जी हाय? त्याच्याकड जायाच म्हनताना म्या अदूगर काजळाची डबी धुंडाळली. अन हिची भन गेली परसदाराला बघितलं अन मास्तरड्याला बोलिवलं बिगी बिगी. त्यो दोड बसला व्हता पवाराच्या चाळीच्या लिंबावर. मास्तरड पाट्या रंगवायचं आधी. म्हनलं, ‘भाड्या, चांगल्या निगाल्या पायजेत फुल्या. आन काढ झरारा.’ ते हळू हळू करत बसलं ब्लौजाला फुल्या, मागावून तिनं घातलान ब्लौज.

गुर्जीला पाह्यलं आन घाबारलोच मी. हे काय ऱ्हावू देतीलस वाटत न्हाई. पर म्या काय अशी सोडू व्हय हिला. कुटून कुटून मारीन पन सोडनार न्हाई.

## अंधार छाया

## सात

## शशी

आज शुक्रवार म्हणजे एच व्ही सर दाढी करून येणार आणि चिडणार! मग स्पेलिंग चुकलं की बसणार पट्ट्या हातावर! विचार करत मी एकनॉलेजमेंट म्हणजे पोच असे पाठ करत होतो. मनात येई दाढी करणं आणि रागावणं याचा काही संबंध असेल तर मी दाढी करणार नाही मोठेपणी!

आत आई बेबी बोलत होत्या. लती काहीतरी दौत पेनाशी चाळे करत होती. आजी दुर्वा तोडायला फिरत होत्या बाहेर फुलझाडांपाशी. दादा सायकलवरून गेलेले पाहिले ऑफिसला, मग मी सकाळ घेतला हातात. 'क्रीडा विषयक बातम्या हे पुढच्या पानावर का देत नाहीत?

आहाला काय करायचय ते मंत्री काय म्हणताय ते वाचून.’ जरा सिनेमाच्या जाहिराती वाचेपर्यंत आईची हाक आली, ‘शशी, पाटी पेन्सिल आण.’ तसा उठलो. आत आलो पहातो तो बेबीमावशीच्या हातात माळ ? नवलच होतं!

आईने ॐ नमःशिवाय पाटीवर लिहिलेले पाहिले. बेबीला म्हणाली, ‘आता म्हण बरं वाचून. तर ही गप्प! मग आईने सांगितले मला की काल एका गुरुजींनी ॐ नमःशिवाय जप करायला सांगितलाय रोज एकशे आठ माळा.

सकाळी अंघोळ वगैरे करून मावशी बसली देवासमोर हातात माळ घेऊन, आई म्हणाली, ‘मोठ्यानं म्हण ग बाई. आम्हाला ऐकायला येऊ दे.’ बराच वेळ झाला ही बोलेना म्हणून, आई पोळया करता करता मागे वळून पाहते तो ही गप्प पुतळयासारखी! आई म्हणाली, ‘म्हणतेस ना?’

तर मावशी म्हणाली, ‘काय म्हणायच?’

'अग ॐ नमः शिवायचा जप म्हणतेस ना? काल गुरुजींनी दिला नाही का आपल्याला?' आई म्हणाली.

'हो हो म्हणते' म्हणून पुन्हा थांबली तशी आईने पोळया करायचे थांबवले. 'काय झालं म्हणत का नाहीस?' मावशी म्हणाली, 'काय म्हणायचं ते आठवत नाही!

आई चाट! मग आईने मला बोलावलं. पाटीवर लिहून वाचायला दिलन तिला. मावशी पाटीवर पाहून म्हणाली, 'मला दिसत नाही.' मी बावचळलो. अरे दिसत कसं नाही एवढ्या मोठ्या अक्षरातले?

तर म्हणाली, 'मला दिसत नाही तर मी काय करू?'

आईने मला प्रथम पिटाळले दादांना बोलवायला. तस्सा मी धावत गेलो, पायी चालत जायच्या अंतरावरच्या ऑफिसात. दादांना म्हटले, 'लवकर घरी चला, आई बोलावतेय.' डब्बलसीट मी मागे बसून आलो दादांबरोबर. तोवर आई, आजी, लता बसून होत्या मावशी जवळ.

दादा आले तशी आई म्हणाली, ‘अहो ही एकदाही म्हणायला तयार नाही जप! म्हण म्हटल तर आठवत नाही म्हणतेय! वाचायला दिसत नाही म्हणते! आता ओरडूनही पाहिलं तर पाटी टाकून दिलीन जोरात! पहा बाई काय करायच ते! दादा थोडे विचारात पडले. म्हणाले, ‘बरं नाही तर नको वाचू. चहा करा थोडा थोडा.’

चहा घेता दादा आईजवळ हळूच म्हणाले, ‘जरा दमाने घे. थोड्या वेळाने तू तिला समोर बसव आणि म्हण म्हणावं, मी सांगते तू म्हण. पाहू काय होतंय ते.

आई तिला जपमाळ घेऊन बसली. प्रेमळपणे म्हणाली, ‘बेबी काल ऐकलस ना काय ते? मग तू जर आता अडून बसलीस तर मग बरी कशी होणार तू? सांग बरं? आता तू असं कर की मी म्हणते मग तू म्हण’

मावशी म्हणाली, ‘अक्का कसं सांगू. मी काही मुद्दाम केलं नाही! मला काही कळेच ना. मी तरी काय करू?

‘बरं मी म्हणते तुझ्या बरोबर.’ असं म्हणून आई सरसाऊन बसली. म्हणाली असेल पंधरा वीस वेळा कशी बशी. पण मग एकदम ताठ झाली अन गप्प झाली! आईने म्हण म्हणताना ओरडली वसकन, ‘नाही म्हणत जा.’

तशी आईने आवाज वाढवला. ‘म्हणतेस की नाही ॐ नमःशिवाय?’

’ऐकायला नाही येत काय म्हणायचं ते!”

दादा दुरून पहात होते. म्हणाले, ‘नाही ना ऐकायला येत? मग मंगला तू तिचा हात धर आणि तू म्हण ॐ नमः शिवाय’.

आणि असा त्यांचा जप चालू झाला. आजींनी बाकीचे जेवण बनवले. मी न लता थोडेसे खाऊन शाळेत पळालो. पण मावशीचे ते ताठर रुप डोळ्यासमोरून जाईना!

## मंगला

मी बेबीचा हात धरून पंचवीस माळा केल्या. तोंडाला कोरड पडायला लागली माझ्या. कधी सवय नाही मोठ्याने जप करायची. थोडा वेळ उठून जेवणाची तयारी केली. हेही आले ऑफिसात जाऊन परत. मग जेवणानंतर बसलो पुन्हा जपाला. कशाबशा पन्नास माळा झाल्या पुढे दिवसाभरात. कधी ही गप्प बसे, हाताने हालवून म्हण म्हटलं तर झोपेतून जागी झाली असे करी. रात्री दहा पर्यंत बासष्ठ पर्यंत माळा झाल्या आणि ही सरळ अंथरुणावर जाऊन झोपली मग ह्यांनी मला खुणेनी थांबवलं. रात्री पडले अंथरुणात. माझ्या मनातून हे जाईना की मी का अशी करत बसू रोज माळा? आज एक झालं! रोज कसं शक्य आहे? मुलांचा अभ्यास आहे, माझा भजनाचा क्लास असतो आठवड्यातून दोन वेळा. महिला मंडळाच्या मीटिंगा असतात कधी मधी. लोकं येतात ह्यांना भेटायला.

ह्यांना म्हटल तर हे एकच म्हणाले, 'हे पहा, आता हिला ठीक करायचं ठरलंय ना? मग बाकीचे सगळे सोड. होईल काय व्हायचेय ते. पण तू पहिल्याच दिवशी असं म्हणायला लागलीस तर कसं होईल बरं?'

रात्र तशी शांतच गेली. सकाळी मी उठले पुन्हा एकशे आठ माळा जपाच्या करायच्या आहेत हे मनात येऊन माझ्यावर इतके जडपण आले क्षणभर सुचेना काय करावं ते. आज शनिवार, उद्या रविवार, परवाच भेटतील गुरुजी. आधी नाही! काय करावं?

विचार करत मच्छरदाणीतून बाहेर आले. घड्याळ अंथरुणाजवळून उचलून कपाटावर ठेवलं. नजर स्वामींच्या तसबिरीकडे गेली. नकळत हात जोडले गेले. ‘स्वामी मार्ग सुचवा आम्हाला’ असे मनातून म्हणताना डोळ्यातून पाणी आले.

अंघोळ करून भस्म लावून बसलो आम्ही दोघी देवासमोर जप करायला. शंकाच होती ही म्हणेल याची. म्हणायला चालू केलं आणि पटकन बेबी म्हणायला लागली हात हातात घेऊन! दोन-तीन माळा झाल्या. पाच-सात- दहा-पंधरा बसल्या बैठकीला पंचवीस झाल्या एकदाही थांबली नाही की काही ओरडली नाही, नाही म्हणणार म्हणून! आजींनी चहा दिला अर्धा अर्धा कप गरम गरम आणि आम्ही पुन्हा बसल्या बैठकीला पन्नास माळा केल्या मग माझंच अंग मोडून आलं म्हणून आम्ही थांबलो.

# आजी

मंगलाला चहा करून दिला कढत कढत. बसलीय बहिणी बरोबर जपाला म्हणून. थोडी धाप लागली होती सकाळपासून. पण एफिड्रिनची आणखी एक गोळी टाकली तोंडात. स्टो पेटवला. उभे राहून मला नाही जमत. मी आपली खालीच बसते स्टो उतरवून जमिनीवर. कधी मधी वाटले तर.

कपबशा मोरीपाशी नेऊन ठेवल्या. अन बसले मंगलापाशी. बाधाबिधा आहे म्हणतात हिच्या बहिणीला! इतकी वर्ष झाली पण मी कधी पाहिले नव्हते असले! सदाशिव भाऊजींकडे होते इंदुरात, तिथे आमच्या वाड्यातल्या पिंपळाबद्दल म्हणायचे लोक काही बाही. नागूभाऊजी त्याच्या मुळेच भ्रमिष्ट झाले म्हणे! पुढे काय झाले काही कळले नाही नीट. माझा भाऊ होता पुर्वी संस्थानिकांच्या अमदनीत फौजदार. तो सांगे भुता खेतांच्या गोष्टी. आमचा घोडा कसा बुजला. रात्री पलिते कसे दिसले, जंगलात पळताना काय अन काय!

काल बेबीचा झंपर पाहिला धुवायला टाकलेला. काजळाच्या रेषांनी भरली होती पाठ. बाईला धुवायला टाकलान मंगलाने. मी घेतला चुबकायला अंघोळीला बसताना. गंगव्वा विचारत बसेल कसल्या फुल्या पाठीवर म्हणून. कशाला इतरांना वाच्यता!

मंगला पुन्हा माळ करून घ्यायला बसली. सकाळची शाळा आटपून मुले येथील. जनार्दनही येईल म्हणून भात टाकायला उठले.

## दादा

'प्रसाद टेक्सटाईल्समधे मुकुंदराव परांजपे आलेत मुंबईहून शेठ बरोबर. ते येणार आहेत संध्याकाळी गप्पा मारायला. गाण्या बिण्याचा शौक आहे त्यांना. मिलच्या गेस्टहाऊस मधे राहतात ते.' मी मंगलाला सांगत होतो. ही म्हणाली, 'अहो जरा मला विचारले असतेत बोलावू का तर बरं झालं असतं. ही बेबी आपल्याकडे. एकशे आठ माळा झाल्या शिवाय मला हालता येत नाही. मलाही पटलं तिचं म्हणणं.

सुपारीचं खांड तोंडात टाकून लवडलो कॉटवर. दुपारचा चहा केला आजींनी. माझ्यापुढे ठेवत म्हणाल्या, 'ऐशी माळा होत आल्यात. संध्याकाळपर्यंत आले तुझे कोण ते, तरी चालतील. वाटले तर मी टाकीन खिचडी-पोहे.'

मुकुंदराव गेले गप्पा मारून. मंगला चहाचे कप नेता नेता म्हणाली, 'अहो बेबीनं केल्या बरं का एकशे आठ माळा! खरं तर तुम्हाला आत बोलावून सांगणार होते. पण म्हणलं इतकं नको उतावीळ व्हायला!

'झाल्या? छान' मी म्हणालो, शशीने कान टवकारलेलच होते. म्हणाला, 'दादा, आईनंच केल्या एकशे आठ माळा. मावशी बसली होती हात धरून आईचा. कधी म्हणे कधी बसे गप्प. पण आज उठून नाही गेली रागावून.'

आज सोमवार. पुन्हा एकशे आठ माळांचा जप झाला. मंगलाला मी म्हटले, ‘हे बघ, मुलांना घेऊन जाऊ गुरूजींना भेटायला. सगळयांनीच घेऊ मंत्र. म्हणजे तुझ्या एकटीवर ताण पडायचा नाही. मुलेही तिचा हात धरून म्हणायला लागतील.’ शशी, लता तयारच होते. म्हणाले, ‘आम्हाला नाही भीती वाटत मावशीची. आम्ही धरू मावशीचा हात!’

गुरूजींकडे मी व मुलांनी मंत्र घेतला. गुरूजी म्हणाले, ‘जातील, अजून एक दोन आठवडे जातील. मग आपोआप ती स्वतःच म्हणायला लागेल! तोपर्यंत तुम्हीच म्हणा. पण तिचा हात हातात असायलाच पाहिजे.

माझी कुंडली पाहिली त्यांनी. म्हणाले, ‘सिंह राशीला साडेसाती आहे काही वर्षांनी. तेंव्हा जपलं पाहिजे तुम्हाला, जॉईंट्सचे दुखणे, मधुमेह संभवतात. आणखी एका अपत्याचा योग दिसतो.’

मी म्हटलं, ‘माझी अध्यात्मिक प्रगती कुठवर आहे? माझा हा पेटंट प्रश्न असतो कोणी असे भेटले की!

ते म्हणाले, ‘म्हणावी तशी गती येणार नाही.’

मुलांच्या पत्रिकाही पाहिल्या त्यांनी. ‘पत्रिका ठीक आहेत. शिक्षणं बेताचीच आहेत. बुद्धी सामान्य आहे. सांपत्तिक स्थिती चांगली असेल. ‘

## लता

भाग्यश्री हेंद्रे आणि माझा अभ्यास घेऊन आई थांबली. आत शशी आणि मावशी कशी जप करतायत हे पहायची इतकी गडबड झाली मला. माझे लक्षच नव्हते अभ्यासात. एकीला जाऊन आले. पलंगावर चढून मावशी जवळ बसले.

पाटीवर पंचाऐशीचा आकडा होता. मी पेसिल घेऊन बसले. मोठा तांबडा मणी येऊन गेला. तशी मी पाटीवरचा आकडा पुसून बदलला. शशी म्हणाला, ‘लते घेतेस का माळ करायला? मावशी मी जरा लघवी करून येतो.’ मी मावशीचा हात घट्ट धरला. आणि ॐ नमः शिवाय म्हणायला लागले. थोड्यावेळाने मावशी म्हणाली, ‘आण माळ इकडे. मी माळ ओढते. तुला नाही जमत.’ मावशीने माळ हातात घेतली. बसली हात धरून माझा. जप मी करत होते. ती फक्त माळ ओढत होती. शशी आला. इतक्यात त्याच्याकडे मित्र आले, सुभ्या, रवी जोशी. म्हणाले, ‘पुर्षा फडके बोलावतोय रिंग खेळायला.’ मी हातानेच ‘जा’ म्हटलं. तो गेला. थोड्यावेळाने आई-आजी आल्या पाहायला, मी कशी करतेय जप. आजींना कौतुक वाटलं माझ्या बरोबर त्याही म्हणायला लागल्या!

रात्री दादांच्या कुशीत झोपले मुरकुटून. इतकी मज्जा वाटली जप करायची!

# अंधारछाया

## आठ

### मंगला

कॅलेंडरचा नोव्हेंबर महिना फाडला. बेबीला येऊन आता दोन आठवडे झाले. डिसेंबरचे एकतीस दिवस. डिसेबर महिन्याचे पान फाडून नवे कॅलेंडर लावीन तेंव्हा काय झाले असेल? करायला घेतलंय हे आपण, पण निभेल ना असे मनात सारखे वाटे! मग ह्यांनी सांगितल्याचे आठवे. ‘मंगला, एक लक्षांत ठेव आपण तिच्या चांगल्यासाठीच करायला जातोय ना मग होऊ दे काहीही. तू सर्व भार स्वामींच्यावर सोपव. जपावर विश्वास ठेव. तूच म्हणालीस ना त्या दिवशी, स्वामींच्या फोटो, समोर तू प्रार्थना केलीस आणि बेबीच्या वागण्यात फरक पडला म्हणून?’

‘हो बाई’ मी म्हणाले होते.

डॉ फडणीसांनी पुन्हा चेक अपला बोलावले होते. एक दोन टॉनिक्स दिली म्हणाले, ‘दर आठवड्याला पाठवा तिला वजन

पहायला. यायचं बरं का एकटीने दवाखान्यात. बहीण काही येणार नाही दर आठवड्याला.’ बेबीला ते म्हणाले.

खाडिलकर नर्स बाईंना म्हणाले, ‘ही येईल तेंव्हा केस पेपरवर, बीपी, पल्स, टेस्टची नोंद करा बरं.’

परत येताना मधूच्या खोलीवरून आले. खोली बंदच होती. शेजारच्या बाईंना म्हटले, ‘सांगा बहिणीकडे बोलावलंय संध्याकाळी.’

तिरशिंगराव आहेत आमचे मधोबा! लहरी कारभार. आले तर रोज येतील. नाहीतर पंधरा पंधरा दिवस फिरकणार नाही हा! आला होता तेंव्हा राहिला होता आमच्याकडे. मिलमधे नोकरीसाठी गेला इंटरव्हूला तेंव्हा हे म्हणाले, ‘मधू, माझ्या नात्यातला म्हणून तुला नोकरी लागलेली मला आवडणार नाही. तुझ्या हुषारीवरच नोकरी मिळवली पाहिजेस.’

पुढे हा लागला नोकरीला. मग घेतलीन एक खोली. आता राहतो तिथे. खाणावळीत जेवतो. मधून मधून येतो जेवायला संध्याकाळी.

मधे म्हणत होता. केळकर मॅनेजर आले होते अकौंटेस डिपार्टमेंटमधे. एम डी लिमयांबरोबर. डेप्युटी मॅनेजर गोरे आणि दादाही होते आलेले शेठजांना भेटायला. एम डी लिमये म्हणाले,

'पर्वतेला अकौंट्स डिपार्टमेंटमधून मी देणार नाही. ही इज एॅन एॅसेट टू माय सेक्शन. तुम्ही दुसऱ्या कोणालाही मागा. ब्रेनी आहे पोरगा.'

गोरे म्हणाले, 'सहा महिन्यात याने तीन लेजर्स अप टू डेट केली आहेतच, पण हा मला रफ ट्रायल बॅलन्स व पी एन्ड एल अकौट्स काढून देतो. गेली इतकी वर्ष मी शेठजींना कॉस्टींग व अकौंट्सची स्टेटमेंट्स देतोय. पण हे मला कोणी क्लार्कने बनवून दिले नव्हते!'

केळकर म्हणाले, 'हे पहा एम डी, मी तुम्हाला सांगायला अकौंट्स डिपार्टमेंट मधे आलोय ते यासाठीच की शेठजी म्हणतायत की पर्वते मला पर्सनल स्टाफमधे हवा आहे. कदाचित ते नंतर श्रीकांत शेठ बरोबर देतील त्याला.' शेठ विचारत होते कुठून आला हा. दादा उभे होते. म्हणाले, 'माझ्या मिसेसचा मामे भाऊ आहे. माझ्याच नात्यातला आहे.' घारे डोळे मिचकावत मधू म्हणाला. 'दादांनी असे म्हणाल्याने इतका आनंद झाला मला 'आणि डोळे पुसलेन.

संध्याकाळी जप करता करता बेबीचं अंग जरा कोंबट वाटलं. जरा कणकणी आहे असे म्हणता म्हणता, थर्मामीटर मधे शंभर निघाला. जरा तिला अंथरुणावर आडवी करून मी एकशे आठ माळा पुर्ण केल्या.

## डॉ. फडणीस

स्टेथॉस्कोप कानातून काढून ठेवला. ताप पाहिला एकशे पाच! काही कारण नव्हते इतका चढायला! आधी फ्ल्यू वाटला. म्हणून पॅरॅसिटेमॉलने कंट्रोल होईल असे वाटले. पण आता सात दिवस झाले. तेंव्हा टॉयफॉईड तर नाही असे वाटून एंटीबायोटिक्सचे डोस चालू केले. पण गेले चार दिवस ताप हटेना. डॉक्टर गोसाव्यांना दाखवावी का मिरजेला? पाहू एक दोन दिवस वाट नाहीतर नेऊ हिची केस मिरजेला. प्रिस्क्रीप्शन लिहून दिले. चहा घेतला. ओकांना म्हणालो, 'हे लक्षण काही चांगले नाही. टेंपरेचर खाली येत नाही. सिरीयस आहे.' बूट पायात घातले. मोपेडला कीक मारली.

## बेबी

किती गोळया खायाला देतासा, तेबढ्या द्या. खातो. माला काय होतय? म्हनली बाकीची माला, ‘शानं असशील तर गप सोड लवकर. तुझ्याच्यान निभनार न्हाई.’ पर मी हट्टाला अडून बसलो. म्हनालो, ‘का रे माझ्या माग लागलायासा? गप गुमान हुडका की लहान सहान. माला कशाला भिडताया?’ पैल पैल लई तरास वाटला. ती भैन म्हनाली म्हन म्हनून. पर मी बी हट्टाला पेटलो. न्हाईच तिला म्हनू दिलं. पर भन लागली तिचा हात धरून म्हनाया मग म्यातरी काय करनार? एखादा दीस केली खळखळ मग त्या जपाच काय भ्या वाटं ना.

पन काल पासनं कळ मारतीया पायाना, मग म्याच बोलीवला त्यो मांग गारुडी. तिकडं रेल्वे पुलाच्या खाली मसनवाटीकडं गेलाता कोनी मिळतं का म्हनून वाट बघाया! म्हनलो त्याला, ‘जरा जादू टोना काय जमतय का ते बघ. म्हनला, ‘बघ, ताप आनवतो. हाटलाच न्हाई पायजे कायबी औषाध खाऊन! ताप आनलान लै. पर मालाच निबना! नुसत्या खिरीवर आन वरनभातावर कुठवर जगू? आज म्हनालो, ‘बाबा रे थांबीव तुझी करनी!

म्हनला, ‘बरं’

# मधू

पहिला भोंगा झाला साडे अकराचा. फौंटनपेन शर्टाच्या खिशाला अडकवले. पांढरा शर्ट जरा मळका झालाय. टाकला पाहिजे भट्टीला. म्हणत उठलो खुर्चीवरून. जरा आळोखे पिळोखे दिले. बाहेर पडलो ऑफिसच्या. प्रभ्या जोशी बरोबर. वाटेत मानेंनी हाताने रामराम केला. म्हणाले, ‘पुढच्या आठवड्यात नाटकासाठी या बरं का मिटींगला.’ मिलच्या फाटकापाशी कुंचूरही भेटला. ते आपापल्या घरी गेले जेवायला. मी बुधवार पेठेतल्या खानावळीकडे वळलो.

अचानक माई दिसली स्टँडपाशी. म्हणाली, ‘मधू, जेवायला का? मी मानेनेच हो म्हणालो. तर म्हणाली, ‘अरे घरी जा. आजींना मोरूदादांनी अरविंदला बरोबर घेऊन नेलंय सांगलीला, आठ दिवसासाठी. बेबी एकटीच आहे. ताप आहे तिला. जरा तिच्या सोबतीला जाऊन बस. मी डॉ. फडणिसांना सांगून औषध घेऊन येते. एक दोन गोष्टी घ्यायच्या होत्या म्हणून आले होते, उपाध्यांच्या किराणा दुकानात. वाटलं तू भेटशील. मग डॉक्टरांकडे मला वेळ लागला तरी हरकत नाही. ही घे किल्ली.’

मी ‘बरं’ म्हटले. ढांगा टाकत घराशी पोचलो. अकरा चाळीस झाले होते. फाटकाला कडीलाऊन कुलूप उघडून आत आलो.

टेबलावरचा सकाळचा अंक घेतला. आत डोकावले ओझरते. पाहिले तर बेबी झोपली असावी कॉटवर. मग मी मांडी ठोकून बसलो. पेपर पसरला जमिनीवर आणि वाचायला लागलो. बाराचा भोंगा झाला.

माई आलीच पाच दहा मिनिटात. आल्या आल्या औषधाची बाटली, पुड्या ठेवल्यांन कपाटावर, अन् म्हणाली, 'जेवण तयारच आहे. चल हातपाय धुवून. तू जेवून घे. ह्यांना यायला वेळ लागतो.' मी बरं म्हणून हात धुवायला गेलो. तर माई एकदम ओरडलीच, 'मधू इकडे ये!'

मी बाथरून मधून आलो माई जवळ. माई बेबीच्या कॉट जवळ उभी होती. पहातो तो बेबी झोपलेली कुशीवर. ती झोपलेली जागा सोडून बाकीच्या उरलेल्या भागावर संपूर्ण मोठ्या मोठ्या फुल्या होत्या! काळया काळया! मी तर उडालोच!

डोळे विस्फारत माई म्हणाली, 'हे काय झाले? कसे झाले? मी गेले तेंव्हा नव्हते काही या पांढ्ऱ्या चादरीवर? आत्ताच्या आत्ता एवढ्यात हे कसे झाले?' मला कळेचना हे काय गौड बंगाल आहे ते!

मी म्हणालो, 'मी तर आलो कुलूप काढून आत, पेपर घेतला. ओझरते पाहिले बेबी कुशीवर झोपलेली. बसतो वाचत आणि तू येते आहेस. मला काहीही माहित नाही.'

मनात आले आईला शिरवळला व्हायचे तसे तर नाही ना काही? भूत बाधा वगैरे!

## मंगला

त्या काळया काळया फुल्या पाहिल्या. घाबरले मी पोलक्यावरच्या फुल्या आठवून. आता ही काय नवीन भानगड? वाटले बेबीला उठवावी. खडसून खडसून विचारावे. पण झोपली होती गाढ असे वाटले. म्हणून थांबले. अस्वस्थ झालेली मनस्थिती. काही सुचेना. मधूला मग थोडक्यात सांगितले, आधी काय काय झाले होते ते. जेवता जेवता म्हणाला, दादांना बोलवून आणू का पटकन? तेवढ्यात ह्यांच्या सायकलीचा घंटा वाजली. तसं हायसं वाटलं.

## दादा

सायकलला कुलूप लावले. चपला काढून आत आलो. तो मधू आणि ही मधल्या खोलीत होती बेबी जवळ. बुशकोट काढून हँगरला लावला. ही म्हणाली, ‘अहो पटकन इकडे या. हे पाहिलेत का काय नवीन लचांड? संपूर्ण चादरीवर बेबी झोपली आहे तेवढी जागा सोडून फुल्या काळया कुळकुळीत! मी मधू कडे पाहिले म्हटले, ‘तू इथे कसा?’ मग कळले काय झाले होते ते.

तंबाखूचा बार भरला तोंडात आणि विचार करायला लागलो. या फुल्या आल्या कशा? कुणी केल्या? ही म्हणाली, ‘अहो जरा चार घास खाऊन घेता का? तीही तोवर झोपलेली आहे. उठली की लगेच चादर बदलून टाकते. का उठवू लगेच?’

‘थांब ग जरा विचार करू दे. हे केले कुणी? तू म्हणतेस साडे अकराचा भोंगा झाला अन तू निघालीस औषध आणायला. तेंव्हा ही थोडीशी जागी होती. तू म्हणालीस ‘कुलूप लावते’ तेंव्हा ती ‘बरं’ म्हणाली तुला. मग तू मधूला भेटून तो येई पर्यंत किती वेळ झाला असावा?’

'मी आलो तेंव्हा अकरा चाळीस झाले होते. मला आठवतय कारण फाटकाची कडी काढताना घड्याळात पाहिले होते.' मधू म्हणाला.

'मग त्या अकरा तीस ते अकरा चाळीस या दरम्यान दहा मिनिटात इतक्या फुल्या काढता येणे शक्य आहे? पाहू मोजून किती आहेत त्या!

मधू आणि मी मोजायला लागलो. अगदी काठाच्या सर्व जागेत तेरा भरल्या एका रांगेत पुढे कमी जास्त होत्या. ती झोपली त्या भागात अर्धवट झाल्या होत्या काही फुल्या. याचा अर्थ काठाकडून चालू केल्या होत्या काढायला. एकोण साठ पूर्ण आणि तेहतीस अर्धवट होत्या सर्व मिळून!

मी मधूला विचारले, 'काय रे कशाने काढल्या असतील या फुल्या?

'आपलं तर टाळकं चालत नाही बुवा' मधोबा म्हणाला.

'काजळाच्या असल्या सारख्या वाटतायत! पुर्वी पोलक्यावर होत्या आलेल्या तेंव्हा मला वाटले होते त्या काजळाच्या असतील म्हणून!' मंगला म्हणाली.

मी म्हटले, 'काजळाच्या असतील तर कुठाय काजळाची डबी? मंगलाने कोनाड्यातून आणली डबी. माझ्याकडे देत म्हणाली, 'पहा कशा खरवडल्यासारख्या खुणा दिसत आहेत काजळाला!

'असे नसते कधी काजळ ओरबाडल्यासारखे! कधी चुकून नखाला लागले काढताना, तरी इतके ओरखडे मुळीच नसतात. घेतंय कोण माझ्या शिवाय? आजी घालत नाहीत. ना बेबी! येऊन जाऊन लतीच घेते बाहुलीला डोळ्यात घालायला' मंगला म्हणाली.

मी डबी हातून खाली ठेवली. तर बोटाना काळे लागलेले होते. लगेच मंगलाला म्हटले, 'बोटे पाहू तुझी'. तिच्याही बोटांना अगदी बारीक पण काळे लागलेच होते!

'बेबीची बोटे बघ जरा.' मी हिला म्हटले.

हळूच हिने तिच्या हाताचा पंजा हातात घेतला. तो तिची झोप चाळवली. आम्ही तिघे तिच्याकडे पाहतोय म्हणताना उठून बसली.

'काय झालेय पाहिलेस का बेबे?' ही म्हणाली व मी चादरीकडे बोट केले. तशी ती चाट पडली. मी निरखून पहात होतो. काय तिची रिएक्शन आहे म्हणून मला वाटले ती ही प्रथमच पहात होती फुल्या. तिच्या बोटांना काहीच काळया रंगाच्या खुणा नव्हत्या! काय बेबी? हे तू केले नाहीस ना? मी म्हटले. 'मी आणि हे करणार? '

'छे ग बाई. मी कशाला जातेय त्या काजळाच्या डबीला हात लावायला? मी हे पाहतेय तुमच्यासमोर प्रथमच!

तिला पुढे विचारण्यात काही अर्थ नव्हता. आम्ही चादर बदलली. जेवायला बसलो. मधू म्हणाला, 'मी थांबतो. कॅजुअल टाकतो एक.' जेवणं झाली.

तंबाखूचा बार भरला विचार करायला लागलो. आयडिया आली. समजा मीच या फुल्या काढायचे ठरवले, घरात कोणी नसताना! तर मी काय करेन? ठीक आहे, काजळाची डबी घेतली. कशाने काढेन मी अशा फुल्या? काहीतरी काडी बिडी हवी! येस काड्यांची पेटी हवी! ती घेतली. मग मी बसेन काढायला' मग मी चादर आंथरली टेबलावर. काड्यापेटीतील एक काडी काढून गुलाची बाजू हातात घेऊन

काजळाच्या रेघोट्यांवरून आणखी एक रेघोटी ओढली. रेष तर तशी आलेली वाटली काजळात.

चादरीवर एका अर्धवट फुलीला पूर्ण करायचे म्हणून एका फुलीला एका साईडला ती काडी टेकवून रेष ओढली. तर आली. आधी जाड ठळक. पण लगेच कमी होत गेले काजळ. पुन्हा काजळात काडी घालून पुन्हा रेषा ओढत फुली पूर्ण करताना तीन वेळा काड्या मोडल्या, काजळात घालता घालता!

'तुमच्या फुलीत आणि त्या फुल्यात फरक आहे बराच' मधू म्हणाला. 'कमी जास्त झालेय काजळ तुमचे. शिवाय फारच ठळक आहेत तुमच्या! त्या फुल्या एक सारख्या ठशाने पाडाव्यात तशा आहेत!

पुढे दोन फुल्या कशाबशा झाल्या तो पर्यंत आणखी पाच सात काड्या मोडल्या होत्या. माझी बोटे ही बरीच खराब झाली होती. मधू म्हणाला, 'या शेवटच्या दोन फुल्या काढेपर्यंत साधारण साडे तीन मिनिटे लागली तुम्हाला. तर एकोणसाठ पूर्ण व तेहेतीस अर्ध्या काढायला मिनिटाला एक याप्रमाणे किती लागतील काढायला? साधारण पंचाहत्तर लागतील! मी यायच्या आधीची दहा मिनिटे अधिक माई येण्या आधीची तीस मिनिटे धरली तरी सगळी एकूण चाळीस मिनिटे होतात.

'येवढ्यात इतक्या फुल्या ह्युमनली इंपॉसिबल आहे. बेबीला तर शक्यच नाही काढायला जमणार' आणि ती झोपली होती ज्या पोझमधे तेवढा भाग सोडला होता काढायचा. म्हणजे तिने आपल्यासाठी झोपायची जागा सोडून फुल्या काढल्या असाव्यात आणि ती स्वतः नंतर उरलेल्या जागेत झोपली असावी! मी शंका बोलून दाखवली.

'शक्य आहे ते ही.' मंगला म्हणाली.

'अशक्य नसले तरी, मला नाही वाटत तिला हे जमेल एवढ्या तापात,' मधू म्हणाला.

तेही खरेच होते. 'मला वाटले, जर समजा हिनेच त्या फुल्या केल्या असल्या तर ती काय करेल काड्याबिड्यांचे? टाकेल बाहेर कुठेतरी कुठे, या जवळच्या खिडकीतून टाकेल एकतर, नाही तर फार फार तर दार उघडून बागेत टाकेल.'

केळकरांच्या घराच्या बाजूच्या बोळात आलो. जमिनीची कसून पहाणी करायला लागलो. काम तसे त्रासाचे होते. कोयनेलचे कुंपण होते. त्यात पडल्या असल्या अडकून तर दिसणे अवघड होते. मधूने कोयनेल हलवले जरा. पिवळट पालापाचोळ्यात काड्या हुडकणे

जिकीरीचे होते. मी बाहेरूनच मंगलाला म्हणालो, 'अगं जरा चार-पाच काड्या फेक बरं बाहेर, कुठे पडतात ते पाहू.'

काड्या पडल्या विखरून हिने टाकल्यावर. त्याच्या अनुरोधाने मी शोध कसून घेतला. शेवटी वाकून कंबर दुखायाला लागली. तेंव्हा मी परतलो. मधू होता दगड धोंडे उलटेपालटे करत. बाकीच्या दोन्ही खिडक्यांच्या जागीही पाहिले नजर टाकून. काड्या तशा निसटणार नाहीत नजरेतून. पण नव्हत्याच तर दिसणार कुठून?

केळकरांच्या घराचे दार उघडले गेले. आजी बाहेर आल्या. म्हणाल्या, 'काय पाहातासा उन्हाचं इतक्या?

मी म्हणालो, 'काही नाही काही. जरा पेन बीन पडल्यासारखे वाटले म्हणून आलो होतो पहायला.' दार बंद करून केळकरांच्या आजी आत गेल्या.

दाराच्या बाजूने मी पाहिले. कोळशाच्या पेटीकडे नजर फिरवली. कुठेच काहीच मागमूस नव्हता काड्यांचा. मंगलाला म्हटले, 'पहा जरा कचऱ्याच्या डब्यात! असायच्या त्यातच आणि आम्ही फिरतोय इथे तिथे पाहात! असे व्हायचे! पाहून आली म्हणाली, 'नाहीयेत केरात.'

अंगाला धामाच्या धारा लागल्या. शेवटी आत गेलो. फॅन चालू केला तेंव्हा बरे वाटले.

हाताचे काळे काढायला बाथरूममधे गेलो. सनलाईटने हात साफ करता करता साबण काळा झाला. तशी मी हमामची वडी पाहिली. काळपट डाग होते त्यावर. मी टॉवेलला हात पुसले. अन हाताचा वास घेतला. साबणाचा वास अजून होता हाताला.

मी बेबीच्या हाताचा वास घेतला. हमामचा येत होता ! मी विचारले केंव्हा धुतलेस हात तू?

बेबी म्हणाली, ‘आंघोळ तर करतच नाहीये सध्या. सकाळी परसाकडला जाऊन आले, तेंव्हाच हातपाय आणि तोंडाला साबण लावला तेवढाच.’

‘हात बघ वास घेऊन, आत्ता थोड्यावेळा पुर्वी लावल्यासारखा वाटतोय? तिने नाकाला हात लाऊन पाहिले वाटतय तर म्हणाली, ‘पण मला तर गेल्याचे आठवत नाहीये मोरीवर! म्हणजे हे त्यांनीच तर नाही केलेले?’

कुणी काहीच बोलले नाही. चादर हिने 'स्वे ' चा फेस करून पाण्यात बुचकळली. मी पेपर घेऊन कोचावर आडवा झालो. मधू चपला घालून बाहेर जाताना पाहिला.

थोड डुलकी लागली. मधूच्या चपलांचा आवाज झाला म्हणून डोळे उघडले. मधू म्हणाला, 'मगाच्या त्या तुम्ही फुल्या काढायकरता वापरलेल्या काड्या फेकायला बाहेर गेलो. कुठे टाकाव्यात प्रश्न पडला. शेवटी मागे गेलो आणि लक्षांत आले की, जर त्यांना नाहीसे करायचे असेल तर दोन शक्यता आहेत. एक तर त्यांना काडी लाऊन जाळून टाकणे किंवा विहीरीत फेकणे.' कौतुक वाटले मला मधूचे.

अगदी दबक्या आवाजात मी म्हटले, 'मधू ती काजळाची डबी घे. व्यवस्थित गुळगुळीत कर बोट फिरवून, माझे हात काळे करायला नकोत.'

तो डबी घेऊन आला. मला गुळगुळीत केल्याचे दाखवून डबीचे झाकण बंद केले. तेंव्हा मी एका ब्लँक एन्व्हलपमधे ती डबी घातली. बंद केली डिंक लावून. मधूला म्हटले, 'तू जरा जा बघू या खोलीतून. तो गेला आणि मी ती डबी मोठ्या लाकडी कपाटाच्या मागच्या देवळीत ठेवली. फक्त मलाच माहिती होते डबी कुठे आहे ती ! जास्तीत जास्त मधूला की बाहेरच्या खोलीत कुठेतरी डबी आहे काजळाची म्हणून.

# अंधारछाया

## नऊ

## दादा

मंगला आत बेबीकडून जप करून घेत होती. पडल्या पडल्या मी विचार करत होतो. आता यापुढे काय होईल? या संबंधी.

भूत-पिशाच निकट नहीं आवै ।

महाबीर जब नाम सुनावै ।।

हनुमान चालिसातील चरण आठवला! वाटले की ही भूत पिश्शाच योनी आपण मानतो! एखाद्याचा आत्मा अतृप्त राहिला की त्याची वासनापूर्ती होईतो आत्मा फिरत राहातो अंतरिक्षात. आपण पुनर्जन्मावर विश्वास ठेवतो. या जन्माची फळे पुढच्या जन्मात भोगायची असे आपले शास्त्र सांगते. पुर्वीचे बारा जन्म आपण कोण

कोण होतो याची स्मृती बहिणाबाई सारखी अडाणी संतबाई ही सांगते! इंग्लंड-अमेरिकेतही लोक आहेत बरेच ते ही आठवतात आपला पुर्वजन्म! म्हणजे आधीचा जन्म आणि आत्ताचा जन्म यांना जोडणारा काही सांधा, दुवा आहे. जो शरीरातीत आहे. तोच आत्मा किंवा जीव!

हे आत्मे, जीव आपले आधीचे शरीर टाकून जर निखळपणे आले तर त्यांना आधीच्या जन्माचे आठवणार नाही. पण काही संतमंडळी नाही का सांगत, ‘अहो पुर्वजन्मीचे उरलेले कार्य करायला हा जन्म घेतलाय आम्ही! म्हणजे हा आत्मा आपल्या बरोबर ह्या इच्छा – वासना घेऊन येऊ शकतो बरोबर म्हणायचा! बरोबरच आहे! ती इच्छा-वासना अती प्रखर असेल तरच ती बरोबर येणार. ती चांगली असेल लिखाणाची, संशोधनाची, जगदुद्धाराची तर भलेच होणार त्या आत्म्याकडून जगाचे! पण तिच वासना नीच, नकारात्मक किंवा हलकी असेल पण पुर्ती न झाल्याने प्रखर असेल तर मात्र ती कदाचित या भूत पिशाच्च योनीतून सफल होत असेल.

मग यांना माध्यम कोण? यांच्या वासना जर मानवी असतील तर त्याच्या पूर्तीसाठी माणूस हवा. एखाद्याला माणूस मारून खावं वाटलं तर तो कदाचित वाघ किंवा सिंह यांना पकडून वासनपूर्ती करेल. पण एखाद्याला बाईच्या भोगाची किंवा पंचपक्वांनाच्या

जेवणाची अशी वासना करून मृत्यू आला, तर मग त्याला माणूस हेच माध्यम!

मग यांना कुठले लोक मिळणार पछाडायला? वीक माइंडेड! वीक माइंडेड म्हणजे तरी काय? हे मनच आधी काय भानगड आहे? हे कुठे आहे हेच कळत नाही! तर तर वीक की स्ट्रॉंग कसे ठरवणार? ते हार्ट, लिव्हर सारखे थोडेच माहिती आहे कि बाबा पहा कार्डिओग्राम काढून किंवा आणखी काही करून!

मन म्हणजे कंटीन्युअस फ्लो ऑफ थॉट्स असे त्याचे स्वरूप असले तर वीक–स्ट्रॉंगचा प्रश्नच येत नाही. काय वीक आणि काय स्ट्रॉंग विचार करणार? सगळे कल्पनेचेच खेळ!

कल्पना! हे विचार म्हणजे काय? कल्पनांचे तरंगच की! संकल्प विकल्प यांचे! करेक्ट, आता लक्षांत आले की ज्यांचा संकल्प–विकल्प किंवा कल्पना, मिथ्या, नेभळट, सामान्य त्यांचे मन कमकुवत - वीक! या उलट जे नेमके उदात्त, सत्प्रवृत्तीचे, विचार करणारे, पॉझिटिव्ह थिंकींगचे, ते बलवान मनाचे असले पाहिजेत! म्हणूनच जे वीक माइंडेड तेच असल्या वासनाधारी आत्म्यांचे बळी होतात!

पण असे कोण असतील ते नेहमी स्ट्रॉंग माइंड बाजूचेच विचार करत असतील? सर्वसामान्यांचे विचार हे दोन्हींचे मिश्रण असणार! मग क्षणात जो माणूस वीक विचार करेल तोच दुसऱ्या क्षणाला स्ट्रॉंग विचार करेल. त्यामुळे असे निखळ स्ट्रॉंग किंवा वीक विचार करणारे फारच कमी. किंबहुना नाहीतच!

मग खरं तर सगळेच पछाडले जावेत या भुताखेतांनी! कारण आत्ता पर्यंत मेलेले जर मानगुटीवर बसायचे म्हणाले, तर प्रत्येकाला एक एक तरी घ्यावा लागेल उरावर!

पण तसे नाही. याचा अर्थ प्रत्येकाची काही वाही वासना जरी अतृप्त राहिली तरी त्यांचा फ्रीक्वेन्सी इतकी स्ट्रॉंग नसणार. त्यामुळे मेजॉरिटी या भूत पिश्शाच योनीत जात नसावेत. जे जातील ते इतके कडेलोटाचे त्या वासनेत बुडलेले असतील की त्यांच्या पूर्तीशिवाय त्यांना अशक्य वाटत असेल आधीचे आयुष्य!

असे आले आणि बसले मानगुटीवर? तर यांना काढायचे कसे? का त्यांची मनमानी चालू द्यायची? दिली तर कितपत? यांना हरवायला येणार कसे? काय उपाय? उपाय जालिमच हवा कारण रोग जालीम तर उपाय जालिमच! म्हणून पूर्वी ते देव-देवर्षी मारझोड करीत

चिंचेच्या फोकाने, चाबकाने, धुरी देत उलटे टांगून कडूलिंबाच्या पानांची! नाही नाही ते छळ करत! शिवाय पैसे उकळण्यासाठी पिळवणूक करीत ती वेगळीच! दुसरा उपाय म्हणजे शॉक ट्रीट मेंट वगैरे किंवा तिसरा म्हणजे हा गुरूजींचा, जपाचा!

हा जप खरे तर काय करतो? या जपाचा आणि भुताखेतांचा कसा काय डायरेक्ट संबंध? त्यांच्यात अशी कुठली शक्ती की नुसत्या शब्दासरशी आपण या भुताखेतांना नामशेष करू शकतो?

जप म्हणजे तरी काय? ही देवता, हा देव – राम, कृष्ण, शंकर माझ्यापाठीशी आहेत. ते आधार आहेत ही भावना करून देतो. त्यामुळे त्या मंत्राचे सारखे उच्चारण जप करताना आपल्या मनात एक प्रकारचे विशिष्ठ भावनेचे तरंग निर्माण करतो. ते तरंग त्या संकल्पांच्या भावना इतर वाईट, असत् विचारांना येऊ देत नाहीत. म्हणजेच विकारी मनाला बांधून ठेवतात. वासनामय आत्म्यांच्या विचारांना, कल्पनांना बंधनात कोंडून एक सारखे ते चांगले मंत्र तरंग हळू हळू देव-देवतांचा आधाराच्या कल्पनेने मनाला घट्ट बळकट निर्भय बनवतात. वीक माइंडेड माणसातल्या वासना, भय, आत्म्याला निष्प्रभ बनवतात!

पण हे मंत्र, जे आपणाला सांगितले जातात की बाबांनो, राम, कृष्ण, शंकर, देवी-देवतांचे म्हणा. हेच का म्हणायचे? अन्य उच्चार केला तर नाही का चालणार? नाही तरी संस्कृत भाषेत किंवा त्यातून निर्माण झालेल्या भाषेतच ॐ नमःशिवाय याला विशिष्ठ अर्थ आहे! उद्या चिनी माणसाला या ॐ नमःशिवाय मधे काही अर्थ वाटणार नाही! मग या शब्दांना अर्थ नाही! काहीही म्हटले तरी चालेल!

खरचं, चालेल का? नाही चालणार! कारण या शब्दोच्चाराला आज कित्येक जणांनी म्हणून, त्याचा वापर करून त्या मंत्राच्या शब्दांना एक प्रकारचे वजन, धार आणली आहे. ती इतर शब्दोच्चारांना नाही! त्यामुळे आधी पासूनच्या चालत आलेल्या मंत्र जपाचे सिद्ध झालेले आहे! ॐमधून निघणाऱ्या लहरी अत्यंत प्रखर आणि वैशिष्ठ्यपूर्ण आहेत! ॐला तोड नाही! त्यामुळे इतर शब्दोच्चार त्याच्या तोडीचे नसतील! तसेही असू शकेल!

विचार करता करता किती वेळ निघून गेला, कळलेही नाही. कपडे करून ऑफिसला जायला निघालो तेंव्हा मनांत आले या विषयावर चर्चा करावी गुरूजींजवळ. मांडावे आपले विचार. विचारावे हे फुल्या किंवा अतर्क्य काम कोण करतो? कसे करतो?

# अंधारछाया

## दहा

### मंगला

गुरूजींना आलो भेटून सांगलीहून. अजून सत्तेचाळीस माळा व्हायच्या होत्या. गुरूजी म्हणाले, 'आता तीच करेल जप स्वतः. पाहू काय होतय ते. ही मंतरलेली विभूती देतोय ती फक्त सकाळी लावा. फरक दिसेल.

नंतर हे आणि गुरूजी बसले होते बराच वेळ गप्पा मारत. मी बेबीला घेऊन, ब्रेड थोडी भाजीबीजी घेऊन स्टँडवर गेले. हे 'लॉड्र्समधे कटींग वगैरे करून येतो' म्हणाले, 'सावकाश.'

बेबी हात पाय धुवून बसली देवासमोर. माळ हातात घेऊन. म्हणाली, 'करू सुरू माळा? तू आणि मी दोघीही म्हणूया बरोबरच!

'चला, आज हात धरून म्हणावे लागले नाही म्हणायचे.' असे म्हणत मी भाकरीचे पीठ मळायला घेतले आणि बेबी बरोबर जपाला लागले.

# बेबी

त्यो मांग गारुडी जाता जाईना. म्हनालो, ताप घालिवलास पर आता जात का न्हाईस म्हनतोय, ‘आता असा जाईन व्हय तू म्हनल्यावर? मी न्हाई सोडायचा हिला आता! मग म्या मास्तरड्याला बोलीवला. म्हनलो, ‘हे काय बराबर हाय का सांगा? तू बी बघ की एखांद्याला? माझ्या उरावर का बसतोय? मास्तराच वाईच ऐकत्यात आमच्यातली.

‘बगतो थोड दीस. मला चोरी मारी करावीशी वाटतिया! ही फुसकी! काय गज वाकवतीया का कुल्प तोडतीया? पर थांबून जाईन. लिंबू काढू का कापून?

मग म्या मास्तरड्याला म्हनालो, ‘जरा भिववावी म्हनतो, बगा जरा फुल्या टाकून! दुपारच्याला भैन गेली भाईर म्हनताना मास्तरड्यानं धरली हाताला अन काडल्या फुल्या माज्याकडनं. हात भरलं म्हनताना जाऊन धुतो म्हनला. पडले गपचिप हातरुनात!

**काका**

काल दौऱ्यावरून आलो नाटकाच्या. आणि आधी ह्यांना विचारलं, ‘काही पत्रबित्र आलयं का शांतीचं? म्हणाल्या, ‘अहो जरा कपडे बिपडे काढा. चहा घ्या. किती हे अधिरल्यासारखं?

‘शांतीचं पत्र आलंय का? का नाही? हे विचारतोय’ मी तडकलोच होतो.

‘आलय हो तुमच्या लाडक्या लेकीचं पत्र! शिंका दे बाबा पत्र काढून घड्याळाजवळून’

श्रीकांतने पत्र दिले. आंतरदेशीय नाही? आश्चर्य आहे! शांती कधी कार्ड पाठवत नाही! असं मनात आलं. पत्रात फारसा मजकूर ही नव्हता. बेबी पोचल्याचे तिने पत्र टाकले होते आणि आता हे कार्ड!

शांती म्हणतेय, ‘बेबीला जरा ताप आला होता मधे. आता बरं वाटतय. डॉक्टरांचं औषध चालू आहे. शांतीचं पत्र इतकं तुटक तुटक

आणि अपुरं आलेल  वाचलं आणि उगीचच काळजी वाटली बेबीची. आता पुढच्या नाटकाच्या दौऱ्याच्यावेळी कोल्हापूरहून माधवनगरला जावं. पाहून यावी बेबी. असं मनात ठरवत कपडे काढले.

गरम पाण्याची बादली श्रीकांतनं आणली व मोरीत कढत कढत पाण्याचे चार तांबे घेतले आणि खूप बरं वाटले. पुढल्या वेळेला सेकंड क्लास रेल्वेप्रवासाची अट घालायची 'वेगळं व्हायचं मला' साठी बाबूरावांना, म्हणजे इतकं थकल्यासारखं होणार नाही प्रवासाने.

सौंनी ठेवलेला चहा घेतला. पेपर उघडला. इतक्यात पोस्टमन आलेला वाटला. रसरंगच्या संपादकांचं पत्र होतं. आपली मुलाखत छापत आहेत म्हणून. सोबत अंकही होता.

कपडे करून जरा पाय लांब करायला म्हणून बाहेर पडलो. जरा टिळकरोड येईपर्यंत पायात गोळे आल्या सारखे वाटले. म्हणून बसलो एका दुकानाच्या पायरीवर. परतलो मागे. घरी येईपर्यंत अंग गरम झालेयसं वाटलं. कॉटवर सोलापुरी चादर आणि शाल अंगावर लपेटून पडलो. दुपारचा चहा झाला. तो घेतला. जेवणावरची वासनाच उडाली. रात्री जरा खीर घेतली अन पडलो अंथरुणात. तर अंग चांगलच कढत झालेल होतं.

## मंगला

त्या दिवशी चादरीवर फुल्या पडल्या त्याला झाले दहा दिवस. त्या दिवशी संध्याकाळी तापही शंभरच्या खाली आला तो चढलाच नाही. दोन दिवसात अंथरुणावरूनही उठली बेबी. न्हायली. जपही करायला लागली बिनबोभाट. मधेच शशी–लता कडून माळ हातात घेऊन आपणच ओढे मणी, तर कधी कधी ॐ नमः शिवाय म्हणत राही. आता स्वतःच म्हणते, 'अक्का मी करते जप.' बसते मधल्या खोलीत. एकशे आठ माळा आता भराभरा होतात.

दुपारी हे आले. जेवणं बिवणं करून आडवे झाले. मीही थोडी मासिकं चाळत होते इतक्यात ही झोपेतून दचकून जागी झाली. म्हणाली, 'अक्का काय जोरात किंचाळले मी ग?'

मी म्हणाले, 'कुठे काय? आम्ही नाही ऐकले काही? तू ओरडली नाहीस!'

बेबी घाबरलेली वाटली. जरा वेळ बसली तशीच. मग म्हणाली, 'मला नाही नाही ते स्वप्न पडले होते. स्वप्नात लोकं माझ्यामागे लागले होते! मी पळतीय पुढे पुढे! कधी पडतेय कधी ठेचकाळतेय! तर कधी

उठून चालता चालता दमून बसतेय! तेवढ्यात ते लोक अगदी जवळ आल्यासारखे वाटतायत! शेवटी माझ्या अंगावर आला एक माणूस हात टाकायला. तशी मी किंचाळले आणि बहुधा जागी झाले.'

मी म्हणाले, 'स्वप्नात तू घाबरलीस. आता शांत हो. आम्ही आहोत तुझ्या जवळ. कोणी काही येत नाही तुझ्या जवळ. तू जपावर विश्वास ठेव. मग तुला काहीच होणार नाही.'

थोड्या वेळानं उठली. पाणी पिऊन जपाला बसली. मग मला हायसं वाटलं!

रात्री अंगारा फुंकला चहूकडे. मधल्या खोलीत आणि गप्पा मारत पडलो होतो अंथरुणावर. शशी सांगत होता. शाळेतून ट्रीप जाऊन आली महाबळेश्वर, प्रतापगडला. त्याच्या गमती जमती सांगत होता. सातारच्या एस्टी स्टँडवरचे ते बेचव जेवण, रात्री वाईत शाळेत झोपायची सोय केली होती. त्याशाळेच्या राखणदाराने यांना आत येऊ द्यायला नकार दिला! मग रात्री हेडमास्तरांकडे जाऊन किल्ली घेऊन परत येईतो पर्यंत रात्रीचे बारा वाजले! प्रतापगडावर पाऊस झाला होता. चढता चढता घसरून रपारप पडत होते सगळे. केळकर सर पडले तेंव्हा आम्हाला बरं वाटले. कारण तेच म्हणत होते, 'साधे नीट

चालायला नको. पाय घसरतोच कसा तुमचा?’ धुक्यात एकदा शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा एकदा चेहरा दिसे, तर कधी घोडा! महाबळेश्वराहून दोन-तीन पॉइंट्स पाहून परतली मंडळी तेंव्हा वैतागली होती.

दोन तास झाले असतील. इतक्यात किंचाळली ही! हा बेबीचा आवाज म्हणून मी उठले. हे ही जागे झालेच. पाहतो तो बेबी उठून बसली होती थरथर कापत होती. तिच्या मच्छरदाणीत जाऊन हात हातात घेतला. पाठीवरून हात फिरवला. तशी रडायला लागली. म्हणाली, ‘मला झोपच येत नाहीये, झोपलं की सारखं आठवताय काही काही मग स्वप्न पडतायत... मी किंचाळतेय!’

मला काही सुचेना, तिची समजूत कशी घालवी ते. हे उठले. भस्माची पुडी काढून हातात दिली. म्हणाले, ‘लाव तिला.’

बेबीला म्हणाले, ‘या भस्माची शक्ती कशी आहे हे तुला माहीत आहे. आता लाव. एक माळ कर आणि झोप.

शशी-लता उठून बसलेच होते. मी शशीला तिच्या मच्छरदाणीत जायला सांगितलं. आमच्यात माझ्या शेजारी झोपवलं तिला.

# अंधारछाया

## अकरा

## दादा

शेठचा फोन आला म्हणून ऑफिसमधून गेस्ट हाऊसवर गेलो. परत येता येता आठ वाजले रात्रीचे. मंगलाला म्हणालो, 'शेठ हरिपाठाच्या अभंगाचे पारायण करणार आहेत. वासुदेवराव जोश्यांना बोलावलय प्रवचन करायला. विठोबाच्या देवळात पुढच्या महिन्यात सुरवात करणार आहेत.'

जेवणं झाली तशी मंगला म्हणाली, 'आम्ही जाऊन आलो गुरूजींकडे. त्यांना सांगितले हे स्वप्नांचे.' तसे म्हणाले, 'ही चांगली गोष्ट आहे. आपल्या जपाने बरीच प्रगती झाली आहे असे समजा. कारण ह्या अवस्थेत जी स्वप्ने, जे विचार, बेबीला येत होते, याचे भान तिला आधी

नसे. आता तिला तिच्या स्वप्नांची कल्पना आलीय. आता ती स्वप्ने ही कमी होतील तशी तिची बरीच सुटवणूक होईल.'

मला खूपसं हायसं वाटलं. पण म्हणाले, 'याच्या बरोबर जरा इतर भास होण्याची शक्यता आहे.'

मंगला म्हणाली मी जरा खोदून विचारले, 'काय काय होते याची कल्पना द्या.' तशी म्हणाले, 'हे पहा, असे कसे सांगणार मी की अमुकच होईल म्हणून? पण ठोकळमानाने असे म्हणता येईल की तिला घराबाहेर एकटीला सोडू नका. आसपास विहीर बिहीर असेल तर ती तिकडे जाणार नाही याची काळजी घ्या. ती जेवण खाण करते ना याकडे लक्ष ठेवा. पण तिला हे मुळीच भासता कामा नये की तिच्यावर लक्ष ठेवले जात आहे म्हणून.'

मी तिला म्हणालो, 'उद्याच दार करवून घेऊ, विहिराच्या रहाटाच्या जागी. म्हणजे विहीर अगदीच उघडी राहणार नाही.'

मंगला म्हणाली, 'बस मधून येताना चढ आला माळबंगल्याचा आणि ही ताळ झाली एकदम! मी तिचा हात हातात घेऊन जप चालू

केला. तशी माधवनगरच्या स्टँडपर्यंत शांत झाली. मला जरा चिंताच वाटली बेबीची. आता पुढे आणखी काय होणार म्हणून!

मंगलाने माझ्या पुढे काकांचे इनलँड ठेवले अन बोलली, 'काकांना आवडलेलं दिसत नाहीये मी पोस्ट कार्ड पाठवलेलं. मला सविस्तर पत्र पाठवायला सांगितलय. विचारतायत बेबी कशी आहे? ताप बीप गेला का? आता टॉनिक्स वगेरे घ्यायला सांग. अभ्यासाचे काय करतेय का नीट? ते सगळं सविस्तर कळव.'

'मी तुला तेंव्हाच सांगत होतो की कार्ड कशाला पाठवतेस? तर बोललीस, पंधरा–वीस दिवसात पत्र पाठवले नाही तर रागावतील ते. पण लिहायची मनस्थिती नव्हती. तेंव्हा खरडल्या चार ओळी.'

'बरं, असू दे. लिही उद्या–परवा सविस्तर पत्र. म्हणजे त्यांना ही काळजी वाटणार नाही इतकी.'

इतक्यात बेबी उठली. तशी बाथरूमकडे जातेय असे वाटले. स्वंयपाकाच्या घरात बरीच खुडबुड चालू होती. तशी मंगला उठली.

पहाते तो, हिने कंदिलाची वात ढणढण पटवलेली! आणि पहातेय त्या आगीकडे.

मी आधी काच खाली येण्याचा खटका दाबला. वात कमी केली. मंगलाने तिला हलवून विचारले, ‘अग बेबी जरा जपून पेटवावा कंदील.’

‘बरं’ म्हणाली, टमरेल भरून घेऊन एका हातात कंदील घेऊन संडासाकडे गेली. परत सगळे बसलो होतो कोचावर मासिकं पेपर चाळत, वाचत. बराच वेळ झाला. एव्हाना परत यायला हवी बेबी होती, असे वाटून मी मधल्या खोलीच्या दारातून डोकावलो संडासाकडे. तो ही पायरीवर बसलेली, कंदील हातात धरून! मी चपला घातल्या. मंगलाला बोललो, ‘चल मागे.’ पोचलो तिच्या पर्यंत. कंदिलाची वात काजळी ओकत होती, ती कमी केली.

‘बेबी इथे का बसलीस? चल घरात’

तशी काही बोले ना. मंगलाने दंडाला घरून उठवलंन तशी ताठरली होती. हलेना तिच्याने. मग मी तिला उचलली आणि आणली घरात.

शरीर सगळे ताठरल्यासारखे झाले होते. आम्ही काय बोललो ते तिला काही कळले नसावे असे डोळे वाटले. पापण्या लवेनात बराच वेळ!

मंगलाने लगेच भस्म लावले आणि सगळे जप करायल लागलो मोठ्याने. शशी–लता ही आले उठून. जप करायला लागले आमच्या बरोबर. साधारण अर्धा तास झाला असेल. जरा नॉर्मल वाटली. तशी हात पाय हलवून अंग ढिले सोडलेन. म्हणाली, ‘मी इथे कशी? मी तर रेल्वेच्या पुलाकडे निघाले होते पालखीतून!

कोणी काहीच बोललो नाही. ‘जप करायला लाग मोठ्याने’ मी म्हणालो. पंधरा–वीस मिनिटात सर्व शांत झाले. सगळे अंथरुणावर पडलोही. पडल्या पडल्या विचार आला, कंदिलाशी चाळे करायला तिला वेळ मिळाला तसे होता कामा नये. आपण आणखी अलर्ट असले पाहिजे. मंगलाला सांगितले, ‘स्टोव्ह, शेगडी, बंबापाशी येऊ देऊ नको तिला.’

## मंगला

हिला एकटी ठेवायची नाही असे ठरवले मी, पण ते अवघडच होते कुठं कुठं म्हणून आम्ही लक्ष ठेवणार होतो? आता कालच शशी म्हणाला, ‘बेबी मावशी शनिवार पेठेत दिसली. मी मामाकडून परत येत होतो तेंव्हा. मी आणली तिला हात धरून. रस्त्यात बोललीही नाही कशासाठी कुठे निघालीय ते’

शशीला सांगितले, ‘हे पहा तू जरा लक्ष ठेव. मावशीला घराच्या बाहेर जाऊ देता कामा नये. शिवाय विहिरीबिहीरीकडे जायला लागली तर लक्ष ठेव.’ ‘बरं’ म्हणाला, पण त्या बारातेरा वर्षाच्या पोरावर तरी किती विसंबायचे, एकदा वाटले मधूला बोलवावे. तेवढाच आधार वाटतो.

एकशे आठमाळा करते बिचारी रोज. हे ही नसे थोडके. आजी म्हणाल्या मजेने, बाळकृष्णाच्या लीलात जसा बांधून ठेवतात कृष्णाला

दोरीने तशी हिच्या ही मनगटाला बांधावी दोरी आणि आपल्या हाताला एक. मग कळेल लगेच  कुठे निघाली तर! पण आपली नजर चुकवून प्रथम ती दोरी मनगटातून सोडवेल! मग काय उपयोग दोरीचा?' मी म्हणाले.

दुपारची जेवणं झाली. पाटीवर माळांचा सत्याएंशी आकडा पाहिला. मुलं मागे लागली होती, म्हणून चिवडा करायला घेतला. तळता तळता बेबीला हाक मारली, मासला पाहायला. आली माळ ठेवून. वाटी घेतली. झाऱ्याने चिवडा घेतला आणि बसली ओट्या शेजारी. पहिला घास घातलान तोंडात. आणि थू थू करून थुंकलानं! बोलली, 'कडू कडू लागतय सगळं!

मी जरा चिवडा तोंडात टाकून पाहिला तिच्या वाटीतला. म्हणाले, 'अग दाणा लागला असेल एखाद दुसरा कुचका. चिवडा तर ठीक आहे चवीला.'

'अक्का मला तर कडू कडू लागला. औषधाच्या गोळया असतात ना तसा.'

मी जरा चमकलेच. म्हटलं, 'बरं चूळ भर आणि साफ कर सांडलेले.' चूळ भरायला गेली. तो ठसका लागला इतक्या जोरात की बसली मोरीतच मटकन. आम्ही सगळे जमलो तशी रडायला लागली. म्हणाली, 'चूळ भरली तर तोंड पोळलं. इतकं तिखट लागलं पाणी मी काय करू बरं? दादांना सांगा, मला पोचवा पुण्याला. तुम्हाला कशाला त्रास माझ्यामुळे उगीच?'

हे बोलले, 'ते पाहू काय करायचे ते. तू शांत हो. हे लक्षात ठेव की तुला त्रास देणारा आता लवकरच जाणार आहे तुला सोडून. तेंव्हा तू नेटाने जप कर. आणि गुरूजींच्यावर विश्वास ठेव की बरी होशील झटपट.'

कष्टाने उठत बसली मधल्या खोलीत येऊन. माळ घेतलीन करायला. तशी शांत झाल्यासारखी वाटली.

## बेबी

सकाळी उठले. अंथरुणा-पांघरुणाच्या घड्या केल्या. गाद्या पलंगावर ठेवल्या. बेडशीट घातले नवीन धुतलेले. राखुंडीने दात घासले. चूळ भरायला पाणी हातात घेतलं तशी कालची आठवण होऊन घेववेना पाणी तोंडात! वाटलं पुन्हा तिखट लागलं तर? काल मी ना जेवले ना पाणी प्याले याच भितीने की कसा लागेल घास?'

राखुंडीची चव तर तशीच वाटली. पहावे तोंडात पाण्याचे थेंब टाकून. विचार आला तशी टाकले दोन चार थेंब तोंडात. नेहमीचीच चव लागली आणि इतकं हायसे वाटले!

पटकन तोंड पुसले. पदर सावरला. साडी खोचली जरा वर करून. कुंचा घेतला केर काढायला. रोज मीच काढे केर घराचा अंगणाचा ठीक असले तर. बाहेरच्या खोलीतील केर काढता काढता नजर गेली  कॅलेंडरवर. नव कोरं कॅलेंडर लागलं होतं. संक्रांत आली पुढच्या आठवड्यात. मनात विचार आला, 'येऊन आता आपल्याला जवळ जवळ दोन महिने झाले. आता किती राहायचं अक्काकडे? विचाराव का कि मी जाऊ का परत? मग दादांचे बोलणे आठवे, 'आता

जायचे ते बरे होऊनच.’ माझ्याशीच बोलत मी केर गोळा केला आणि मधल्या खोलीत आले.

कुंचा फिरवता फिरवता केंव्हा थांबले कळल नाही. आपल्याला कोणी धरलय म्हणजे काय झालं असावं? असा सारखा विचार यायला लागला. वाटलं आपण कोणाच्या आध्यात ना मध्यात! कोणी का बरं पकडाव आपल्याला? मीच का अशी फसले? इतर का नाहीत? माझ्यात काय कमी आहे? आपल्याला नाही कळलं तर कोणाला विचारावं? हां दादांना विचाराव ते सांगतील नक्की.

केर भरून मागे गेले. ती तिथे विहीर दिसली. वाटलं पहाव जरा किती खोल आहे पाणी. वाकून पाहिलं तर आत खूप खोल पाणी दिसलं! वाटले नीट दिसले नाही. म्हणून एक वीट पडली होती ती उचलली आणि टाकली पाण्यात धडा sss म आवाज करून पाणी उसळलं. मी पाहात होते त्या हालणाऱ्या पाण्याकडे! गार गार असेल पाणी. किती खोल गेलं की तळ दिसेल त्याचा? वाटलं एकदा गाठून पहावा तळ!

‘अग्गोबाई sss , तू इथे?’ असे म्हणत येताना अक्का दिसली. माझ्या दंडांना धरून न्यायला लागली. तशी मी म्हणाले, ‘पाहू दे ना मला विहिरीतले पाणी. किती खोल आहे याचा अंदाज घेत होते.’ शशी धावत आला. माझा दुसरा हात धरून ओढायला लागला. तशी मी ही हट्टाला पेटले. ‘हे सगळे माझ्या मागे काय येताय मला काय झालेय? मी ठीक तर आहे.’ मी म्हणाले.

‘बाई ग, आधी आत हो! विहिरीपाशी तुझं काय काम आहे?’ अक्का तणतणली. हातातला कुंचा शशीने काढून घेतला. तेंव्हा मला जाणवले की माझ्या हाताच्या पकडी किती घट्ट होत्या!

भस्माचा टिळा लावला. ॐ मनः शिवायचा जप चालू केला म्हणायला तशी माझी तंद्री भंग झाल्यासारखी झाली. अक्का आजींना सांगत होती, ‘बरं झालं बाई! तुम्ही तुम्हा म्हणलात विहिरीकडे जा नाहीतर हिने विहिरीत उडी मारायला कमी केलं नसतन! माझ्या नाही कानांवर आला विहीरीत काही पडल्याचा आवाज!’

‘अच्छा, म्हणजे मी विहीरीवर जाऊन आले की काय? माझ्या मनाला झालेय तरी काय? माझे विचार अन माझ्या वागण्यात असा

फरक का?' मी विचार करते मग माझ्यावर नियंत्रण दुसऱ्या कुणाचे आहे?

मला माझ्या विचारावर, वागण्यावर नियंत्रण आणले पाहिजे. मी माझ्या शरीराची असले पाहिजे. माझ्यावर माझी सत्ता हवी. मी कुणाला नाही राहून देणार अशी! एकदम हुरूप आला! वेगळेच वाटले मग. उठले बाहेर बागेत आले. गुलाबाची फुलं तोडून वेणीत खोचली. आसपासच्या झाडावर नजर गेली. नवी पालवी, नवी फुलं, सगळे हसत होते. आनंदात. मजेत. चिमण्या भुरू भुरू उडाल्या आकाशात. इतकं निळं निळं शांत रम्य आकाश. वाटलं कित्येक दिवस झाले आकाश पाहून. जणू पहिल्यांदाच पाहतोय इतके नवीन वाटले आकाश!

बऱ्याच वेळाने मी आत आले ती नव्या उत्साहाने. आपल्याला आता स्वतंत्र व्हायचयं. आपले आपण व्हायचय या निश्चयाने!

मी अक्काला म्हणाले, 'अक्का मला आज वेगळं वाटतय गं! सगळीकडे पहावं ते नवीन वाटतय गं! आकाशात पक्षी आकाशात हिंडताना, झाडाची पानं, फुलं हालताना. आनंदात आहेत सगळे. असं वाटतय, इतकं जग बदललय गं!'

दादा म्हणाले, 'जग आहे तसंच आहे. तुझी त्याच्याकडे पहायची दृष्टी बदलली आहे!'

## डॉ. फडणीस

‘या मिस गोखले, कशी काय तब्बेत आता? ताप बीप पळालाना?’ विचारलं मी.

‘होय डॉक्टर. आता काही तक्रार नाही.’ ती म्हणाली. तिचा बीपी, पल्स नॉर्मल वाटले. खाडीलकर नर्स बाईंनी केसशीट आणला. गेल्या दोन महिन्यात म्हणावी तशी इंप्रूव्हमंट वाटली नाही. तेंव्हा गोळया बदलल्या. टॉनिकही बदलले.

‘डॉक्टर मला एक विचारायचय’ मिस गोखले म्हणाली. ‘काय विचारायचय निसंकोचपणे विचार’ मी बोललो.

‘काल परवा पर्यंत मला या गोळया, औषधं घेण्यानं आपल्याला बरं वाटेल असा विश्वास नव्हता वाटला. पण आज असं वाटतय की काही औषधं नको, काही नको. मला आनंद वाटतोय. सगळीकडे मजा आहे असे वाटतय! ते का?

मी खरं तर बुचकळयात पडलो. तिला नक्की काय म्हणायचय माझ्याकडून काय उत्तराची अपेक्षा आहे हे कळेना. तिला बरं वाटतय ना तिच्या समाधानासाठी बोललो, ‘ही इंप्रूव्हमेंटची स्टेप आहे. तुझ्या मनाने घेतले असेल की मी आता बरी होणार तर, त्याच्यापेक्षा आणखी चांगले औषध ते कुठले?’ इतक्यात बाहेरून कोणी सांगत आलं की सीरियस पेशंट आहे सोमवार पेठेत. तसे मी माझे सामान आवरले आणि मोपेडला कीक मारली.

# अंधारछाया

## बारा

## मंगला

संक्रांतीचे तिळगूळ, गुळाच्या पोळया, सगळं यथास्थित झाले. आपले दहा पंधरा दिवस बरे गेले म्हणायचे असे मनात आले.

त्या दिवशी ती विहिरीकडे गेली. यानंतर दरवाजाकरून घेतला रहाटाच्या खालच्या जागी. त्याला कुलुपाची व्यवस्था केली. तेंव्हा हायसे वाटले.

पण तेंव्हा पासून बराच फरक पडलाय तिच्यात. एक प्रकारचा अल्लडपणा आलाय असे वाटले.

गुरूजींना भेटून सांगितले. तसे ते म्हणाले, ‘आता महत्वाची पायरी आली आहे. हीच तिची मानसिक स्थिती तिला सोडवणार आहे

आपल्या जंजाळातून. पण चुकून पुन्हा निराशा वाटली तर मात्र खंड पडेल बरे व्हायला.’

परवा म्हणाली, ‘मी माझ्या मैत्रिणीला पत्र पाठवणार आहे.’ पण मग बराच वेळ थांबून लिहिलेन ते आईला पत्र. मला वाचायला दिलेन. विचार आला काय लिहिलेय कोणास ठाऊक! काका-काकूला कळवलेलं नाही हे आम्ही तिला सांगितलेलं नव्हते! वाचले तर काहीच उल्लेख नव्हता, बाधेबिधेचा. मंत्र घेतलाय एक मनःशांतीसाठी असा मोघम उल्लेख होता. पत्र घडी करून पाकिटात घातले तशी म्हणाली, ‘दादांना दाखवून टाकीन म्हणते.’

हे आले तशी सायकल ठेवता ठेवता त्यांच्या हातात हिने पत्र ठेवले. वाचता वाचता हे म्हणाले, ‘काय ग? हे तू तिला लिहायला सांगून तिने लिहिलेलं दिसतेय?’

‘छे हो, मी कशाला? तिनेच लिहिलेय मनाने.’ तशी त्यांना हसायला आलं. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते!

## शशी

आल्या आल्या चपला काढून फेकल्या. हातपाय धुतले. शाळेतली हाफपँट बदलली. इतक्यात सुभ्याची हाक आली क्रिकेट खेळायला. आम्ही जाणार होतो स्टेशनच्या पलिकडे. हरीष प्रतापच्या टीममधे प्रॅक्टीससाठी बोलावले होतेन त्याने. आज वर्गात त्याच्या शेजारी बसलो होतो. म्हणाला, ‘कुम्या हळिंगळेच्या टीमशी मॅच आहे या रविवारी.’

मी म्हटले, ‘मी सुभ्याला घेऊन येईन.’ तसे ठरले.

आईला ओझरते सांगितले, मी क्रिकेट खेळायला जातोय. पायात कॅन्हवासचे बूट घातले. इतक्यात आजींची हाक आली. ‘शशी’ म्हणून.

‘काय आहे आता?’ असे मी ओरडलो.

तो त्या आतून म्हणाल्या, ‘जरा काही तोंडात टाकून जा. आत ये पाहू आधी.’

चिडून आत गेलो. आजींनी हातात दाण्याच्या कुटाचा लाडू दिला. तो तोंडात टाकला. माठातले पाणी भांडे भरून प्यायलो. आणि निघालो जायला.

इतक्यात मावशीने हाक मारली, ‘शशी, जरा कंगवा देतोस का?’

कंगवा घेऊन मावशीला दिला. तर म्हणाली, ‘जरा खाजवतोय का पाठीला?’

‘पटकन सांग कुठे ते?’

‘सगळी पाठच!’

कंगव्याने मी पाठीवरून खसाखसा घासू लागलो. तर पाठ पुटकुळ्या पुटकुळ्यांनी भरलेली होती. पाठ घासेपर्यंत दंडाला-हाताला

खाजवत होती. तेही लाल झालेले होते. एकंदरीत अवतार पाहिला मी तिचा अन सुभ्याला म्हणालो, ‘तू जा पुढे मी आलो मागून’

पुन्हा बसलो मावशीपाशी येऊन. आजींनाही हाक मारली. त्याही आल्या हळूहळू.

त्या गेल्या आत. मी आणि मावशी खाजवत होतो तिची पाठ बराच वेळ!

रात्रीची जेवणं झाली. मावशीला आमसुलाचे सार, एक कुठल्याशा मात्रेचा वळसा वगैरे देऊनही आराम पडेना. ती आता सगळच अंग खाजवत होती. मधे मधे हसत होती. आम्ही बघतोय तिच्याकडे म्हणून. तर कधी रडत होती, ‘अग आईगsss! आग आग होतीय’ म्हणून. अंगावर लाल लाल फोड उठले होते. तिला डॉक्टरना दाखवायला हवे असे आई म्हणाली. मग डॉक्टरना दादांनी बोलावले. त्यांनी एक इंजेक्शन दिले तशी झोप लागली तिला. खाज कमी झाली की नाही कोणास ठाऊक?

# बेबी

आगा sss ई sss गं लई तरास होतोया. सगळ्या पायास्नी ठणका लागलाया. कसा पाई आलो हित कोणीस ठावं तिकड पुन्यात कसं आरामशीर चालल व्हतं. इतं आलो आन काहीना काही तरास चालू झाला...

त्यो मांग गारूडू जाता जाईना! मग म्या त्याला घालिवला. तर जाता जाता 'गर्मी आनतो' म्हनून म्हनाला.

मग म्या घाबरलो. आता काय करतोय कुनाला ठावं? पर फुकटच्च्यानं पोरीला ताप! ती बसली आंग खाजवत दिसभर!

माजं हातपाय ठणकत्यात त्या मंत्तर म्हनन्यानं. रोजचा एकशेआठ माळंचा नेमच केलाय त्येंनी. जरा काय आही केलं मंतर म्हनत्यात. आता आमचं काय चालत न्हाई...!

त्या दिवशी लई भानगड केली भाड्यानं! म्हनला जानार, तर ही लै खुशीत होती. म्हनत होती समद्यांसनी. 'आज मला लै बरं वाटतया.' घरी आईला पतर बी धाडलेय. म्हनतिया, माझ्या अंगात कोन हाय, तेला भाईर काढल्या बिगर न्हाई जानार मी हितून...

मी बी बघतोच कसा घालिवतो ते...!

## दादा

फार सहनशील आहे बेबी! इतके खाजवत होते तेंव्हा पण सहन केलंन मुकाट्यान!

जिथे जिथे खाजवले तिथे तिथे मोठ्या गांधी झाल्या. त्याचे फोड झाले. त्या फोडात पाणी झाले! ते फुटले! काही सुकले! धड तिला अंघोळ घालता येईना. बोरिक पावडरने घामोळयाच्या पावडरने पाढरी पांढरी दिसे. कधी केसात खाजव खाजव खाजवे. तेंव्हा केस पिंजारून बसे भुतिणी सारखी!

तिलाच सगळे करायचे होते. केलन सहन बिचारीने!

मध्यंतरी मधू आला होता. तेव्हा म्हणाला, 'काजळाची डबी पाहिलीत का काढून? काही होते का त्यात? मी म्हणालो, 'काही पाहिलेच नाही तिकडे. आता फुल्याही आल्या नाहीत. तेंव्हा ती डबी तिथेच असणार! जातेय कुठे?

तो म्हणाला, ‘पाहू या का?’

मलाही उत्सुकता होतीच. मी आणि मधूने धरून कपाट हालवलं. थोडी फट झाल्यावर, मी आत हात घातला देवळीत. कागदाची एक बाजू लागली हाताला. तसे ओढले धरून. तर आले हातात पाकीट. फोडले तर त्यात काहीच नव्हते!

‘गेली कुठे डबी? मी आणि मधू एकमेकांच्या चेहऱ्याकडे पहात राहिलो! डबी माझ्याशिवाय कुणालाच माहित नव्हती त्या देवळीत आहे म्हणून. फाडून टाकलेल्या कागदांची तपासणी केली तर त्याल कुठूनही फाडल्याचे दिसत नव्हते! म्हणजे ज्याने हे काम केले त्याने आधी हे पाकीट काढले. ते फाडून त्यातून डबी काढून घेतली आणि पाकीट पुन्हा त्याच ठिकाणाहून डिंकाने बंद करून ठाकठीक करून देवळीत ठेवले सरकवून! खरे तर कपाट सरकवल्या शिवाय कोणाचा हात ही तिथे जाणार नव्हता. मलाच स्वतःला ते पाकिट ठेवल्यावर पुस्तकांनी भरलेले सहा फुटी कपाट सरकवायला त्रास पडला, तर बेबी सारखीला ते शक्य नव्हते!

मी मंगलाला बोलावले. तसे शशी, लता, आजी सगळेच जमले बेबी सकट मग मी विचारले की, कुणी या  कपाटल हात लावला का महिन्याभरात? कुणीच हो म्हटले नाही! तसे मी एक एक काय झाले ते सांगितले आणि डबी कशी काय गायब झाली आहे तेही सांगितले.

लता म्हणाली, 'गेले कित्येक दिवसात मी काजळच घातले नाही. त्यामुळे घरातली डबी कुठे गेली आहे याचा आम्हाला पत्ताच नव्हता!

बेबीला डबी लपवल्याचे आत्ताच कळत होते. म्हणाली, 'त्या दिवशी फुल्या पडल्या नंतर डबीचे काय झाले हे मला तर मुळीच माहिती नाहीये! सगळे आपापल्या उद्योगाला लागले. पण मला चैन पडेना. डबीचे गौड बंगाल काय असावे हे न कळल्याने.

दुसऱ्या दिवशी तातोबाला घरी पाठवले. हा पोरगा होता ऑफिसात. हुशार होता. एकदा सांगितले की पुन्हा पाहावे लागत नसे. सुट्टीच्या दिवशी बागेतील साफसफाई, खत घालणे, तण काढणे इतर अंगणाची झाडलोट तोच करी. म्हणालो, 'तातोबा, घराच्या बाजूच्या

अंगणाचे झाडलोट नीट कर आणि काही पेन, फुटपट्टी, कंगवे किंवा काजळाची डबी, सापडली तर मला आणून दे आठवणीने.'

दुपारी काम झाल्यावर मंगलाने त्याला जेवायला दिले. मागच्या बाजूला कचऱ्याची जागा म्हणून एक खड्डा केला होता. म्हणाला, 'तोही उपसून साफ करू का?

मी बरं म्हणालो. मग फावड्याने कचरा भरलान घमेल्यात, मोठा ढीग करून पेटवून दिलान. काजळाची डबी सापडली नाही म्हणून मी निराश होतो. मला खात्री होती कुठेतरी नक्की मिळणार म्हणून. 'बरं जाऊ दे, मिळून तरी काय फरक पडणार होता?'

रात्री प्रवचनाला विठोबाच्या देवळात जायला म्हणून धोतर नेसले. रुमाल घेतला. हरिपाठाचे पुस्तक घेतले. चपला अडकवल्या. बाहेरून कुलूप लावून गेलो देवळात.

## बेबी

मी म्हणाले, 'मला माहित नाही डबी कुणी कुठे हरवली.' पण सगळे माझ्याकडे असे पहात होते की मी ओळखले, या डबीच्या गायब होण्यात माझाच हात असला पाहिजे!

काय झालं असलं पाहिजे? मीच केलेले असणार! नव्हे आहेच! मग मलाच का आठवत नाही? मला आठवलेच पाहिजे. असे होऊन चालणार नाही. आणखी अशा किती अशा गोष्टी होणार आहेत माझ्या हातून माझ्या न कळत? आताशे असे विचार फार येतात. मग बेचैन होते मन. वाटते कुठे पडले या जंजाळात येऊन अक्काकडे. तिला ताप. आपल्याला ही भानगड चालू तो जप करता करता दिवसच्या दिवस जातो. त्यात आपल्या पदरात काय पडतं? ना अभ्यास ना काही काम! मी आपली सदा माळ घेऊन असते. काही नाही बंद कराव्या या माळाबिळा!

क्षणभर असा वैताग येतो या मंत्र म्हणण्याचा. खरे तर लहानपणापासून शिव, शंकर कोणी म्हटलं की मला आवडायचं नाही. राम, सीता, हनुमान, हे देव बरे वाटायचे. शंकर म्हणजे त्या सापाच्या

माळा गळयात, तो तिसरा डोळा, ते त्रिशूळ, मनात तिटकरा त्या देवाचा. कसला हा देव भुता-खेतांचा! असे वाटे. त्यापेक्षा कृष्ण, विष्णू बरा. सिनेमात गोंडस वाटतो. हनुमान म्हटले की खूप छान वाटे...!

त्यावरून आठवले संध्याकाळची माझी भिकारदास मारुतीला फेरी पण किती दिवसात झाली नाही. साधारण पाच-सव्वापाचला निघायची मी. आई भजनाला गेलेली असे. शाळा सुटली की घरी येऊन वह्या-पुस्तक  टाके आणि सरळ घराबाहेर पडे. चौकातली ती माणकी कधी कधी म्हणे, 'कुठे जातेस सरोज? म्हणून. मी थाप ठोके मैत्रिणीकडे म्हणून. वाटे कशाला हिला सांगा म्हणायची मी येते म्हणून? पुढे चांभारांच्या घरांची राग यायची. तो कमावलेल्या कातड्यांचा वास भरला होता माझ्या नाकात. आवडायचा नाही पण आला की आपण बरोबर चाललोय असे वाटे.

जरा पुढे गेलं की रस्ता फुटे बाजीराव रस्त्याला मिळायला. तिथेच एका घराच्या भिंतीवर लिहिले होते 'डोंगरे बालामृत' म्हणून मोठ्या अक्षरात. ते वाचायचीच मी. ठरून गेलं होतं ते. एकदा चुकून वाचायचं राहिलं तर परत फिरले. वाचलं अन् मगच निघाले देवळाकडे! तिथेच पुढे गेलं की चिंचेची झाडं होती. उंच उंच डेरेदार! खूप चिंचा असत लागलेल्या. दगड फेकून कोण पाडतोय चिंचा! मी

बाई-माणूस कोणी ओरडलं म्हणजे? मी आपली खाली पडलेल्या गोळा करी, मग ओट्यात घेऊन जाई मारुतीला. आत जाई, मारुतीला नमस्कार करी, ‘बाबा रे मला शहाणं कर. यंदा एसएससी परिक्षेत पास कर. मग छान स्थळ पाहून दे! मला सुखाने संसार करू दे! मग तो डोंगरे बालामृतचा बाळ आठवे! मला हवं तसं बाळ! त्याला पाजीन ते बालामृत. गुटगुटीत करीन त्याला. काय नाव ठेवाव बाळाचं? मारुतीची नावे फार जुनाट वाटतात. जरा सुधीर, सुबोध सारखी असू देत...’

‘रोज रोज देवाला तेच तेच मागताना मी रंगून जायची. मग अकरा फेऱ्या मारेपर्यंत तेच विचार चालत माझे. मागच्या बाजूला देवाजवळ थांबे दोन पाच मिनिटं. परते घरी. कधी अंधार होई परतताना. कारण चिंचा काढायच्या नादात बरीच पुढे जाई मी...

आठवून आणखी बेचैन झाले. वाटलं इथेही असेच जावे एखाद्या देवाला लांबवर एकटेच! कोणाला न सांगता!.... पाहिलं पाहिजे जाऊन एकदा. चला जाऊ या का आत्ताच? नको कळेल सगळयांना. सगळे कामात असले की सटकावे. ...

नाही रे बाबा सटकताय कसले? ते घारे डोळे असतात ना? ते बरे बाहेर जाऊन देतील? दादांचा गंभीर चेहरा आठवला की असे एकटे जायचे, जप न करायचे विचार एकदम पळून जायचे कुठल्या कुठे! मग वाटे अरे आज आपण एवढे धीट झालोय, आपला आपण विचार करतोय तो त्यांच्यामुळेच. आधी काय यायचे आपल्या मनांत विचार? पुर्वी तर स्वप्न पडत इतकी की, जणू सिनेमेच्या सिनेमे चालत झोपेत! पुढे पुढे इतकी वाढली स्वप्नांची भेंडोळी! भीतीदायकच होते ते सगळे. मी एकटीच असे जंगलात! तर कधी धबधब्याजवळ आलेली असे टोकावर! आता पडणार, इतक्यात दुसरे काही सुरू होई. खूप चिखल, राड त्यातून मला निघता येणे मुष्किल ... मी आत जातेय...!

किती स्वप्ने आणि किती भित्या! त्या स्वप्नात मी कित्येकदा मेले ही असेन! पण मला वाचवणारे होते तरी कोण? आताशे पुन्हा आठवतात काही स्वप्नं आणि जीव धास्तावतो! मग कळते, आपण झोपलोच नव्हतो कित्येक महिनेन् महिने गाढ! या स्वप्नांनीच झोपेत मी जागी असे!. कधी काही करे तर कधी काही!

‘मग मी पुण्यात काय केले असेल? इथे माधवनगरात आल्यावर दादांना कसा सुगावा लागला पुण्यात त्या गजबजलेल्या वाड्यात मी तर लगेच पाहिली जाणार? का मी कदाचित बाहेर नसेलच गेली? घरातच काही केले असेल वावगे? काय ते कुणास ठाऊक! मग मी इथे विहिरी कडे गेले, संडासाच्या दारात कंदील लाऊन बसले, दत्ताला गेले पुढे रेल्वेच्या पुलाकडे ते सगळे स्वप्नात? हो असेच असेल! पण मग आता हे मला आठवले कसे? त्या दिवशी दादा म्हणाले तसे जपामुळे माझ्या मनाची तयारी चांगली व्हायला लागल्याचे हे तर प्रमाण नव्हे? मग मला डबी बद्दल आठवलेच पाहिजे! आज ना उद्या आठवेलच पाहिजे. पाहते कशी नाही आठवत ते....!

बसते अशी विचार करत. मग खाज सुटते सगळीकडे! कुठे कुठे, कशी कशी खाजवू? आधीचे फोड त्याचे पापुद्रे पार शिवशिवतात. डोक्यात हातापायावर कंगव्याने ओरबाडून काढता येते सालटी, पण पाठ मांड्या कंबर, मोरीत जाऊन काय काय करू?  पाणी ओतू अंगावर, का मोरीचा ब्रश फिरवू कमरे खालून?

अंगावर थंडपाणी घेत सुटले. तांब्यातलं पाणी पुरेना म्हणून बादलीच ओतली अंगावर. अंगाची लाही लाही होतेय! कशी काय

घालवू ही खाज? एकदम सुटली की सुटली! बस, काही चालत नाही कुणाचे. सहन करणे हेच हातात आहे!

भडाभडा ओतल्या चार बादल्या अंगावर. तशीच उभी राहिले थंडावा शोषत! दारावर थडथड वाजले. अक्काचा आवाज होता. 'बेबी बाहेर ये ग, अंग पूस, पावडर मलम लावायला आणलय' कडी काढली, कोठीच्या खोलीत गेले. अक्काने साडी-ब्लाऊझ दिलान तो घातला. पावडरीचा थर टाकला अंगावर. तसं जरा बरं वाटलं...!

एकदम वाटले आपण आताशे असा विचार करतो म्हणून ही शिक्षा म्हणून तर नाही ना अशी खाज सुटत?

एकदम पाठीच्या मणक्यातून वीज गेल्यासारखं वाटलं. भयाची. यातून आपण कधीच बरी होणार नाही का? यातच आपला अंत तर नाही?...

# तेरा

## मंगला

बेबीला कॉफी दिली. पुन्हा झोपवली कॉटवर. अंगावरची लाली कमी झाली. पण तिच्या हाताला हात लाववेनात! हातपाय सणकून तापले होते. कपाळावर हात ठेवून पाहिला. तर कपाळ थंड होते! ताप पाहिला तर साडे अठ्ठ्याणण्णव काय करावे कळेना. झोपल्या झोपल्या कॉफी पिते म्हणाली, म्हणून दिली कढत कढत. डोळा लागला असे वाटून मी गेले स्वैंपाकघरात.

आज जपाच्या माळा झाल्या नाहीत हिच्या. रात्री मग जागावे लागते, एकशेआठ माळा पुऱ्या करायला!

दुपारी हे आले. जेवले. तरी ही झोपलेलीच होती. मुले दुपारच्या सुट्टीत खायला आली. तेंव्हा म्हटले, ‘चार घास खाऊन घेतेस का बेबी? तर म्हणाली, ‘नको पडू दे.’ मुले शाळेत गेली परत. आजी

म्हणाल्या, 'थोडीशी खीर नंतर दे बेबीला. उपाशी पोटी कशी राहून चालेल?'

तिला हलवून बसते केले. म्हणाले, 'ही खीर खा. जरा बरं वाटेल!' तशी घेतलेन चार चमचे आणि म्हणाली, 'मला ओकारी होणार आहे.' गेली मोरीकडे. ओकारी काढताना आवाज झाला. मी गेले. पाठीवरून हात फिरवला. चूळ भरलीन. उठली परत यायला. तसा तोल गेला. चक्कर आल्यासारखी वाटली. धरून धरून आणली. बसवली गादीत. तंद्रीतच झोपली पुन्हा.

माळा तर सगळयाच राहिल्या होत्या. बसले शेजारी हातात हात धरला. चालू केल्या माळा करायला. दोन-तीन माळातच हात धरवेना इतका धगधगू लागला! ह्यांना म्हणाले, 'पहा हो, फार गरम आहेत हात! पहा.' ह्यांनी पाहिले, म्हणाले, 'हाताची मूठ करून मुठीत लावून बघ बरं थर्मामीटर. पाहिला तर एकशे चार अंशापुढे ताप ! कपाळावर गरमी काहीच नाही! पोट-पाठ तेही नॉर्मल!

हे म्हणाले, 'कपाळावर हात ठेव. अन चालू ठेव जप. तेवढेच आपल्या हातात आहे.'

माझ्याकडून मी जपाच्या माळा चालू ठेवल्या. हे चहा घेऊन ऑफिसात गेले. माझा गाण्याचा क्लास बुडाला होता.

संध्याकाळी साडेपाचला जरा तिला जाग आल्यासारखी झाली. बडबडत होती, 'कशाला त्रास देताय, जरा पडूदे की गप्प...' मी काही बोलले नाही. जप करणे चालूच ठेवले. जरा मोठ्या आवाजात.

शाळेतून मुले आली. शशीला बसवले माळा करायला. तो बसला होता म्हणत जोरजोरात. मधेच लता बसली त्याच्या मदतीला. रात्री दहा वाजून गेले तेंव्हा शेवटची माळ झाली. तरीही ही झोपलेलीच होती.

खायला सांगावे म्हणून आजी म्हणाल्या, 'बेबी, खाऊन घेतेस का थोडसं? मी थांबलेय बघ तुझ्यासाठी, दहा वाजून गेले बघ रात्रीचे. चल ऊठ. मी वरणभात देते. का दूध भात देऊ?'

आळोखे पिळोखे देत उठली. मोरीवर जाऊन आली. अंथरुणात बसूनच खाल्ले चार घास. पाणी प्यायली. म्हणाली, 'पेपर पाहू दे आजचा.' बसली वाचत बाहेरच्या खोलीत. शशीने तिचे अंथरूण झटकून झाडून घातलेन. इतक्यात बाहेरच्या दरवाज्याची कडी काढलेली वाटली. बाहेर गेले तर ही बसली होती धुण्याच्या दगडावर

ओकाऱ्या काढत. बरं इतकी अशक्तता आली होती. उठली की झोकांड्या जायच्या. संडासला न्यायला आणायला ह्यांना जावे लागे. दाराशी मी उभी राही. बिचारीची अवस्था पाहवेना. पुढे तीन–चार दिवस असेच चालले गेले.

गुरूवार आला आणि धावले गुरूजींकडे. म्हणाले, ‘ह्या ओकाऱ्या थांबत नाहीत. काही खालेलं अंगी लागत नाहीये तिच्या.’

ते म्हणाले, ‘असे होतेच. धीर धरा. काही होणार नाही तिला. माळा चालू आहेत का नाहीत?’

मी म्हणाले, ‘आम्ही शेजारी बसून करतो तिच्यासाठी.’ म्हणाले, ‘ठीक आहे. पण तिला शक्यतो मंत्र म्हणू द्या. आता भस्माचे असे करा की थोड्याशा पाण्यात घाला. ते तिच्या खाण्या आधी द्या. मग खाऊ दे काय खाते ते.’

रात्रीच्या जेवणाआधी पाण्यात भस्म टाकून दिले, जेवली आणि पडली आडवी. नाही ओकली काही. पुन्हा सकाळ दुपारचा चहा घेतलान. पडला नाही उलटून. जरा टुकटुकी आली तशी बसली माळ घेऊन करायला.

गेला आठवडाभर ठीक होती. जपही व्यवस्थित चालला होता. मधेच गुरूजींना दाखवायला घेऊनही गेले सांगलीला. गुरूजींशी नीट बोलली. म्हणाली, ‘आताशे मला इतकी छान झोप येतेय! पुर्वी स्वप्ने पडून झोप कधी मिळालीच नाही गाढ! आता किती दिवस चालणार आहे असे? आता काय होणार आहे आणखीन मला?’

गुरूजी म्हणाले, ‘तू बरी आहेसच. आता फक्त तुला पौर्णिमा – अमावास्येला जपायला हवे. तेंव्हा त्या दिवशी सावध रहा. बाहेर कुठे जाऊ नकोस, खाऊ नकोस!’

‘बरं’ म्हणाली. आम्ही जायला उठलो त्यांच्याकडून. तेंव्हा गुरूजी म्हणाले, ‘आता जरा कळ काढा. अगदी काम होत आलेले आहे!’ मलाही हुरूप आला.

घरी येऊन ह्यांना सांगितलं, हे म्हणाले, ‘आत्ताच आपली खरी परीक्षा आहे.’ तेंव्हा माझ्या लक्षांत नाही आलं, पण दोन दिवसात हिसका कळला!

जेवण इतकं वाढलं हिचं. नेहमीच्या आकारच्या  दोन पोळ्या, वाटीभर भात खाऊन उठणारी ही, पहिला वरण भात, चारपाच

पोळया, पुन्हा भात! पुन्हा भात! हिच्यासाठी वेगळा भात टाकायला लागला दोनदा! काल म्हणाले, ‘जरा थांब. टाकते आणि देते.’ तर चिडून वाटी-भांडे ताटात आपटलेन अन गेली उठून! मीही घुश्शात केला नाही भात! आजी म्हणाल्या, ‘मंगला ही खाते आहे अशी अधाशा सारखी, हे काही चांगले लक्षण नव्हे! बाधेल तिला.’ झाले तसेच. सोसतंय होय असं खाऊन? मग धावल्या बाईसाहेब संडासाकडे! अमावास्या जवळ आली. मला मनातून धाकधूक वाटायला लागली. आता काय होतंय म्हणून!

सकाळपर्यंत ठीक होती. अंघोळ वगैरे केलीन भस्म लावून बसली जपाला. चहा करून दिला मधेच मी तिला. जरा ’सकाळ ’ उघडून वाचायला बसले. ही उठून बागेत जाता दिसली. मी ही ऊठून बाहेर आले. ही झाडाशी ओणवी होऊन खात होती. काय खातेय? पहाते तो ओकली भडाभडा! वर तुळशीची पानं खात होती ओरबाडून! जवळ गेले. पाठीवरून हात फिरवला. बादलीतून पाणी आणले लोटीभर, दिलं चूळ भरायला. घेतलीन चूळ. आली तोंडबींड पुसून. बसली जपाला.

थोडावेळ होतोय ना होतोय तो उठली. मीही धावले तिच्यामागे बाहेर. पुन्हा तशीच ओकारी. परत आणून झोपवली. शेजारी बसून माळा करायला लागले. हातांच्या तळव्यांकडे लक्ष गेले. पांढूरके वाटले तळवे.

रात्रीपर्यंत गेली दोन वेळा! गेली बागेत ओकायला. अन पडली जवळजवळ बेशुद्ध! चालणे अशक्यच होते तिच्याच्यानं. ह्यांनीच आणली उचलून. दारातून आत आणली अन आडवी झाली. ‘हाताचे तळवे फार जळजळतायत, गरमी वाटतेय फार. खाजवा, खाजवा हातपाय’ म्हणून ओरडत होती.

तिला अंगभर खाज सुटली होती. हाताचे तळवे खाजवून खाजवून रक्त येणार कि काय इतके लाल झाले! अन आलेच रक्त, बोटांच्या बेचक्यातून, मनगटापाशी, रक्ताच्या फरकाट्या उठल्या पाठीवर, पायांच्या घोट्यापाशी! खाज आणि आग सहन होईना तिला! तेंव्हा उठली आणि म्हणाली, ‘ओकारी होतेय’. धड बसता येईना हिला. आता ओकारी होणार म्हणताना, मी घमेले आणले. म्हणाले, ‘होऊ दे झाली तर यात. तुला अशक्तपणा आलाय कर इथेच.’

म्हणे म्हणे पर्यंत वांती झाली. लता–शशीला बाहेरच्या खोलीत धाडले. तोंडाला पदर लावला तरी मला उमासे यायला लागले. पहाते घमेल्यात तर शहारलं अंग. रक्त!

ह्यांना बोलावलं ताबडतोब पहा म्हणून. माझ्या अंगातला त्राण गेला होता खरे तर. मी म्हणाले, ‘रक्ताची उलटी होतेय ... आता थांबणे शक्यच नाही... चांगल्या डॉक्टरला बोलावून घेऊन या. डॉक्टर फडणीसांना नका सांगू. त्यांच्यासारखे कुडबुडे डॉक्टर काय कामाचे? आधी तुम्हा डॉक्टरची व्यवस्था करा. हॉस्पिटलात टाका... आता रक्ताची उलटी झालीय... आता मला राहावत नाही...!’ मी हट्टच धरला.

आजीही म्हणाल्या, ‘जनार्दन, काही म्हणता काही व्हायचे! डॉक्टरला बोलवून मिरजेच्या मिशन हॉस्पिटलात न्या तिला.’

ह्यांचा विचार दुसराच दिसला.

# दादा

वांतीत रक्त पाहिले. पण एवढे घाबरण्यासारखे आहे असे मला वाटले नाही. वाटले जरा थांबू आपण. गुरूजींनी सांगितल्याप्रमाणे भस्म पाण्यातून पाजवा बरे! पाहू काय फरक पडतोय ते. हे विसरून चालणार नाही की आज अमावास्या आहे. तेंव्हा आज त्रास हा होणारच!

थोडी समजूत पटल्यासारखी झाली मंगलाची. मी बेबीकडे पाहिले. ती वेगळीच वाटली मला! गुंगीत होती पण चेहरा त्रासलेला, रागीट वाटला. आम्ही तिला त्रास देतोय असा भास वाटला.

तिची अवस्था पार खराब होती. अंगाला खाजवून खाजवून रक्त येत होतेच. पुन्हा वांतीतून रक्त! हा आसुरी शक्तींचाच प्रताप आहे अशी माझी खात्री झाली. आता आपण गडबडलो, घाबरून माघार घेतली, तर सगळ्या केल्यावर पाणी फिरणार होते. पण मंगलाला धीर धरवला पाहिजे होता. स्वतः बेबीला सहन करायची मानसिक तयारी हवी होती. समजत तर सगळेच होते, पण प्रत्यक्षात सगळेच बेजार झालो होतो!

गेले काही महिने घरातील घरपण गेले होते. सगळे मावशीपाशी कोंडाळे करून होते. तिच्या जपाच्या माळा हा आमचा रोजचा चर्चेचा विषय होता. मुलांच्या शाळेचा अभ्यास कधी होई कधी

नाही. मंगलाने तर अभ्यास घ्यायचे पार सोडून दिले होते. तिचे इतर आवडीचे विषय, गाण्याभजनाचा क्लास. इतके सगळे विस्कळीत झाले होते. आजींना दम्याचा त्रास होतोय हेही आम्ही विसरलो होतो. बिचाऱ्या श्वासा-श्वासागणिक धाप टाकत सकाळपासून रात्रीपर्यंत काही ना काही कामात होत्या, कधी जेवण तर कधी चहा. बरीच वर्षे झाली त्यांनी स्वैंपाक मंगलाकडे सोपवून. आता त्यांच्या अंगावर पडली जबाबदारी जेवणाखाणाची.

सगळेच आम्ही मेंटल टेन्शन खाली होतो. शेजारच्या कुणाला काहीही माहित नव्हते. आम्ही कधीच कुणाचा सल्ला घेतला नाही. त्यामुळे सगळे बोलणे, चर्चा, घरातल्या घरात आणि गुरूजींपाशी.

शशीला भस्म आणायला सांगितले. पाण्यातून चमचाभर पाजले तिला. आणखीन चिडल्यासारखी झाली. तेंव्हा मी म्हणालो, ‘असे चिडायला काय झाले? मंत्रजपाने तुला बरे व्हायचेय ना?’

‘तुम्हाला कोणी सांगितलेत असले धंदे? मी माझी बघून घेईन. आधी हे जप करणे थांबवा बरं.’ बेबी एकदम संतापून म्हणाली.

बराच वेळ आम्ही कुणीच काही बोललो नाही. तशी आणखी ताठर झाली. मी मंगलाला म्हणालो, ‘जरा बोलतं कर तिला. पाहू काय काय म्हणतेय?’

मंगला म्हणाली, 'बेबी अग हा त्रास तुला होतोय तो बंद नको का व्हायला? बाधा झालीय. त्यामुळे तुला त्रास होतोय. तेंव्हा आमच्यावर रागवून काय उपयोग? जरा शांत हो. पहा, तुझे तुलाच सहन करायची शक्ती येईल.

ओरडली, 'बास झालं तुमचे उपदेशाचे डोस! तुम्ही मला छळायला बसला आहात. पुण्यात होते तेंव्हा झाले होते का आधी असे कधी? इथे आल्यावर सगळे चालू झाले. तुम्हीच मला त्रास देताय! कुठला कोण तो कुडबुड्या गुरूजी, त्याच्या नादाला तुम्ही लागलातच कसे?

मी म्हणालो, 'नव्हता तुझा विश्वास त्यांच्यावर तर मग आधी का नाही म्हणालीस जाणार नाही म्हणून? त्याच्याकडून मंत्र तरी कशाला घेतलास?'

'मला तर फसवून तुम्हा त्या गुरूजीकडे नेलंत! मला सांगितलं भविष्य बघायला जाऊ! तिथं नेऊन मला फसवलंत. ही अशी माझी बहीण! कशी म्हणावी हिला बहीण! वैरीण आहे!

मंगला धीराने म्हणाली, 'ठीक आहे, मी जरी तुला न सांगता नेले तरी देवाच्या नावाचीच दीक्षा घेतलीना? भोंदू देव-देवर्षीकडे थोडेच गेलो होतो? कवट्या लिंबे, बिब्बे होते तिथे?'

'तो महाबदमाश, त्याला तुम्हा भाळलात! आता मला हे छळतायत. माझी मधल्यामधे फरकट होतेय. मी काय करू? माझी काय दैना केलीत? वेळापरी वेळ गेला. काम नाही. नुसता तो जप. असे भंडावलेत तुम्ही! थांबा, आता करते का बघा!

बेबी गुंगीत बोलत आहे असे मानले तरी ती खरेच बोलत होती. सुसंबद्ध बोलत होती. यावरून शुद्धित होती हे नक्की!

आम्हाला काय करावे सुचेना. लता, शशीला बाहेर जायला संगितले. लता घाबरली म्हणाली, 'मी आई जवळच बसणार!'

मी आणि मंगलाही बाहेरच्या खोलीत आलो. आजी बसल्या होत्या कोपऱ्यात. त्या थांबल्या तिथेच. राग उतरू दे तिचा म्हणून थांबलो आम्ही.

विचार करत होतो, 'हे' मला छळतायत म्हणजे कोण? आम्ही की त्या आसुरी शक्ती? हे मान्य आहे की डिवचले आम्हीच. त्यामुळे आता त्या शक्तींचा तळतळाट चालू झाला आहे! पण आम्हाला असे बोलून हिने काय मिळवले? काहीच पर्पझ नसावे. वैतागली असेल त्रासानी. म्हणून म्हणाली झालं' मी मनावर घेतले नाही.

# अंधारछाया

## चौदा

## मंगला

अशी बोलली ही गधडी तडा तडा. मला सुचेना काय करावं! एरव्ही एक थप्पडच ठेऊन दिली असती. असं अद्वा तद्वा बोलली असती ती तर. पण शारीरिक त्रासानं आधीच बेजार त्यात अमावास्याची रात्र! मीही आवरलं मनाला. बराच वेळ पुटपुटत होती काही काही. मग आम्ही गाद्या टाकल्या. पडलो. तरी मनातून काही केल्या जाईना तिचे बोलणं.

काकांनी पाठवली तिला अभ्यास करायला. तब्बेत सुधारायला. पण हिचं हे लचांड निस्तरता निस्तरता आलेत नाकी नऊ. बरं काकांना कळलं तर म्हणतील तुला कोणी सांगितलं होते हे नसते

धंदे. त्यांचा आधीच भुता-खेतांवर विश्वास कमी. शिवाय जप-जाप्य म्हणजे संतापाने त्यांना तिडीक येते. त्यांना जर हे कळलं लागिराचं तर माझी तर होईलच खरडपट्टी. पण त्यांनाही बोलतील उलटसुलट.

पहाटे पहाटे पाहिलं हिचं अंथरूण, तर पडली होती मुरकुटं करून. केसांची वेणी विस्कटलेली, केस पिंजारलेले. हातापायावर बिब्याचे चरके दिल्यासारखे उठलेले डाग. साडी जरा ठीकठाक केली. अंगावरून पांघरूण घातले. तशी झोप चाळवली तिची. उठून बाहेर आले. जागेतून चक्कर मारली. पायरीवर बसले विचार करत.

किती दिवस चालणार हे असं? कालची ती रक्ताची उलटी! असं अंगाची लाहीलाही होणं, आधीच ही इतकी अशक्त. त्यात हे ताप, उलट्या. किती दिवस काढणार ही! असे उद्या झालं काही बरंवाईट तर आपलं कोणी ऐकणार नाही. दोष मात्र आपणावर येणार, हे आमचे उपद्व्याप म्हणून!

## शशी

दुपारच्या वेळी आमचं क्रिकेट ऐन रंगात आलं होतं रस्त्यावर. बॉल मागे चिकात हरवला. तसे एक एक काही काही निमित्त काढून पळून गेले! मी बराच वेळ हुडकत होतो बॉल. अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. आजींची हाक ऐकू आली. ‘चहा प्यायला चला’ म्हणून आलो घरात, बॉलचा नाद सोडून.

हातपाय धुवून चहा बशीत ओतला, तर आई म्हणाली, ‘मावशीला हा दे चहा.’ मी चहा घेऊन मावशीपाशी आलो. ‘च sss हा, बेबी मावशी’ तिला हालवलं. झटकन उठली. बसली. घेऊ लागली चहा.

बऱ्याच माळा व्हायच्या होत्या. मी मावशीला म्हणालो, ‘चहा झाल्यावर आपण दोघे मिळून करू का या माळा?’ काही बोलली नाही. चहा झाला. मी मांडी ठोकली तिच्या शेजारी. चालू केला जप जोरजोरात म्हणायला. माझ्या पाठीवर बसला एकदम धपाटा! पाहिलं तर मावशी रागावली होती चेहरा भेसूर वाटला! आवाजाने सगळेच मधल्या खोलीत आले पहायला. पाहतात तो मावशी होती माझ्यावर हात उगारून पुन्हा मारायला!

'अग अग, मुलांवर काय हात उगारतेस'? आई म्हणाली, तर मावशीने आईला दटावले, 'तू चूप. बोलू नकोस एक शब्द!'

मी मावशीपासून लांब झालो. दादांजवळ जाऊन उभा राहिलो. दादांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. मला हळूच म्हणाले, 'जा आतून भस्म आण पाण्यात घालून' मी आत सटकलो.

बाहेर आई मावशीला म्हणत होती, 'बेबी, तू फार कमी जेवतेस सध्या. त्यात ते फोड, तळव्यांना होणारी आग. या सगळयामुळं तुझं डोकं झालंय हलकं. म्हणून अशी संतापतेस. जरा शांत हो. आम्ही जप कर म्हणतो ते तुला बरं वाटाव म्हणूनच ना?'

म्हणाली, 'मला तर मारणारच आहेस पण तिकडे काका मरायला टेकलेत याची तरी शुद्ध आहे का?'

'बेबी? काय अशुभ बोलतेस, शुद्धीत आहेस का?'

'मला बेबी नको म्हणूस. मी सांगते ते खर आहे! तुला खरं वाटत नसेल तर मी चालले पुण्याला त्यांना बघायला! काही झालं तरी माझे वडील आहेत ते! तुला जायचं नसणारच! दुष्ट आहेस ना तू!'

आई चिडली. एक मुस्काटात ठेऊन दिलीन मावशीच्या! पण मावशीला लागलेच नसावे. कारण हसत होती. गाल चोळण्याऐवजी म्हणाली, 'खरं बोलले तर राग आला? मार, मार, मारून टाक. पण बापाला पहायला जाऊ नकोस पुण्याला! इथे तडफड! मी जाणार!'

पुढचं बोलणं आईला सहन झाले नाही. डोळयांना पदर लाऊन आई तिथून गेली. आजी स्वैपाक घरात गेल्या. दादांनी मला बाहेर जायची खूण केली. तसा मी बाहेर पडलो घराच्या.

'अहो, या पोरटीला घरातून घालवा बरं! माझ्याने आता सहन नाही होत. काय काय अभद्र बोलतेय ऐकलत ना? शशीला थोबाडीत लगावलीन, उद्या तुमच्या-माझ्यावर हात चालवायला कमी नाही करणार ही! झाली एवढी थेरं पुरे झाली. आत्ताच्या आत्ता हिचं सामान भरा आणि बसवून द्या गाडीत. मध्याला सांगा तिला ने. नाहीतर मीच जाते अन पोचवते पुण्याला. कोणी सांगितलीय ही विकतची डोकेदुखी!'...

'मी काय म्हणतेय ऐकताय ना तुम्ही? ती तंबाखूची गुळणी टाका आणि बोला झडझडून!' माझा संताप इतका झाला होता. हे आपले नुसते हू हूं करून ऐकत होते.

पिचकारी टाकू हे म्हणाले, ‘देऊया ना पाठवून, पण आत्ता नाही. थोड्या दिवसांनी. तुझे आधी संतापून झाले काय? मी काय सांगितले होते तुला गेल्या अमावास्येला? विसरलीस? आज पुन्हा अमावास्या आहे. ती अशी वागली, बोलली आणि आपण नेमके फसलो तर मग आपल्यात आणि बेबी सारख्यात काय फरक? सगळी अध्यात्मिक साधना फुकटच गेली म्हणायची! चल तोंड पूस. तिला पुन्हा बोलते कर. माझ्या अंदाजाने ती ट्रान्समधे पछाडणारी व्यक्ती बोलत असावी!’

गेल्या महिन्यातली अमावास्येची रात्र आठवली. तेंव्हाही माझं मन सैरभैर झालं होतं. वाटलं होतं हॉस्पिटलात नेल्याशिवाय बरीच होणार नाही परत. पण ह्यांनी त्या दिवशी धीर दिला. अन ती वेळ मारून नेली. पुढे आपोआपच तिला बरं वाटलं. खाज कमी झाली. हाताच्या तळव्याची सालडी मात्र निघत होती बरेच दिवस!

आज पुन्हा अमावास्या. हे सकाळपासून माहिती होतं. पण ही अशी फटाफट अभद्र बोलली. तेंव्हा माझा ही तोल गेला. उगीचच मारलं मी तिला. बिचारीचा काय दोष? इतके सगळे ती सहन करतेय तेच किती आहे!

वाईट वाटलं तसं डोळयाच पाणी खळेना. हे जवळ आले. माझ्या खांद्यावर हाताने थोपटत म्हणाले, ‘रिलॅक्स, रिलॅक्स,’ तशी मी त्यांच्या छातीवर डोकं टेकवल. ह्यानी माझ्या केसांवरून हात फिरवला. मला एकदम आधार वाटला. स्पर्शानं नवी धिटाई आली. नवा उत्साह आला!

तोंडावर पाणी मारून साबणाने चेहरा धुतला. केस वळवले. साडी बदलली. पुन्हा बसले बेबीजवळ जाऊन. मोठ्याने जप करू लागले. तशी ती उठून बसली. माळ पकडली. म्हणाली, ‘बोल, केंव्हा जायचय पुण्याला?’ आधी जरा वेळ मी गप्प होते. तर म्हणाली, ‘सामान बांधायला घे माझं!’

हे म्हणाले, ‘जायचंय पुण्याला. पण आत्ता नाही. काही दिवसांनी!’

‘नंतर जाऊन काय उपयोग? आत्ताच्या आत्ता जायला पाहिजे! तर ते भेटतील, दिसतील नाही तर नाही!’

‘अस्सं का? बरं! पण तुला कसं कळलं? आम्हाला काही पत्र बित्र नाहीये, ते आजारी असल्याचे’ हे म्हणाले.

'मी सांगतेय म्हणजे खरंच असणार! त्यांना बरं नव्हतं बरेच दिवस. पण त्यांनी नाही कळवलं तुम्हाला. तुम्ही कळवलं आहेत का मी इतकी बरी नाहीये तरी?' बेबीचा मुद्दा बिनतोड होता.

हे म्हणाले, 'समजा, आत्ता पर्यंत त्यांनी कळवले नाही आणि आता ते मरायला टेकले असतील तरी तुला जाऊन तिथे काय करायचे? बरं आत्ताच्या आत्ता निघून जायचे ठरवले तरी पुण्याला पोहोचायला उद्या सकाळपर्यंत वेळ जाणार. तो पर्यंत उशीर झाला तर?'

'कसं पोचायचं ते मी पाहीन. तुम्हाला त्याची कशाला चिंता? माझे कपडे भरा टॅक्सी बोलवा'

'टॅक्सी कशाला? आम्ही फोन करून विचारू कशी तब्बेत आहे!'

'फोनवर बोलायला कोण तिचा बाप येणार आहे? बऱ्या बोलानं बेबीला सोडता की नाही?' बेबीचा आवाज चढला होता!

'हे कोण बोलतंय मला दरडाऊन? बेबीला सोडा म्हणून सांगणारा तू कोण बोलतोयस? बेबी बोलत नाहीये!'

‘मी कोण आहे तुम्हाला माहित आहे. मग कशाला वाद? तिला सोडा पुण्याला.’

‘तिला पुण्याला सोडायचे की नाही हे आम्ही ठरवणार आहोत. पण कोणी धमक्या देऊन जर पाठवा म्हणत असेल तर नक्कीच नाही पाठवणार.’ हे म्हणाले.

‘अस्सं. मग तुम्ही मला छळायच सोडणार नाही काय? मग मी पहा बेबीचे कसे हाल हाल करतो!’

‘आता आणखी काय हाल करणार आहेस? काय करायचं शिल्लक ठेवलयस?’

‘म्हणूनच बेबीला सोडून द्या. तिला जगू दे. मला पण राहू दे.’

आम्ही सगळे गप्प होतो. ह्यांनी तिच्या कपाळाला भस्म लावले. म्हणाले, ‘आम्ही इतके दिवस झगडतोय ते काय तुला झपाटून ठेवायला सोडून देऊ? बऱ्या बोलाने जाणार आहेस की नाही?’

‘काय माणसं आहात की जनावरं? बाप मेला हे सांगून ही बधत नाहीत!’

'हे पहा, तू आम्हाला काहीही म्हणालास तरी आम्ही काही बेबीला सोडणार नाही, एकटी. तेंव्हा तू केंव्हा हिला सोडतोस बोल?'

'मी सोडीन? वाट बघा! कोण तो फित्तुरडा गुरूजी आणलाय? आत्ता कोलून लावीन त्याला!'

'मग इतक्या दिवस काय झोपा काढल्या काय रे? जा मार ना गुरूजींना. पाहू तुझी काय पॉवर आहे ते! गुरूजी सोड माझ्याशीच होऊन दे ना काय करायचे ते'

'तुला तर सोडणारच नाहीत आमची माणसं. दहा दहा बसतील पाठकुळीवर. तुला काय वाटतेय, तुला काही होणार नाही म्हणून?'

'दहांचे सोड एक तूच ये की सुरवातीला पछाडून बघ जमतंय का!'

मला ह्यांनी, 'कपाळावर टिळे लाव भस्माचे' म्हणून सांगितले.' तशी बेबी हातानी ढकलायला लागली म्हणून थांबले तशीच. ह्यांनी जोरात ॐ नमःशिवाय म्हटलं आणि लावला टिळा. पुन्हा ॐ नमः शिवाय म्हटलं. असे चांगले बरेच वेळा झालं. अंग

ताठवून कडक लक्ष्मीसारखी, एके ठिकाणी नजर लावून बसली होती, ते कमी झाले. एकदम हात खाजवायला लागली. हळू हळू अंग खाजवायला लागली. 'आगsss आग, भाजतय माझं सगळं अंग!' 'पाणी, पाणी!' करून ओरडायला लागली. तांब्यातून पाणी आणून देत हे म्हणाले, 'पाणी पी, बरे वाटेल!'

'मला भस्माचं पाणी पाजताय काय? ते भस्म लावलंत म्हणूनच आग होतेय!'

'अस्सं, म्हणजे आग तुझ्या अंगाची होतेय. बेबीच्या नाही? तर मग होऊ दे काय आग व्हायची आहे ती!'

हे उठून तंबाखूचा बार भरून बाहेरच्या खोलीत आरामात जाऊन बसले. मी आपली बसले समोरच बेबीच्या सोबतीला. खाजवून शेवटी आपोआपच थांबली. आडवी झाली तिथेच. अंगावरून पांघरूण घातले आणि बाहेरच्या खोलीत गेले.

## दादा

मंगलाला जरा पुन्हा चहा, काही खायला आणायला सांगितले. ऑफिसला जायला उशीर होऊन गेला होता. शशीला ऑफिसात पाठवला, काही इंपॉर्टंट मेल आहे का दुपारच्या डाकेला पहायला. राहिलो घरीच.

चहा घेतला. चिवड्याच्या चार फक्क्या मारल्या. ही आली. बसली समोर. म्हणाली, ‘अजून सगळी रात्र बाकी आहे अमावास्येची. रात्री डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवायला सांगितलंय गुरूजींनी. विशेषतः विहिरीकडे.’

‘मी घालणार आहे बाहेरून कुलूपं दारांना, म्हणजे एका दारावर लक्ष ठेवायला बरे.’ मी म्हणालो.

‘अहो गुरूजी काय म्हणत होते त्या दिवशी ? तुम्ही बोलत बसला होतात तेंव्हा विचारीन विचारीन म्हणता म्हणता राहून गेलं धबडग्यात’

‘मी विचारले होते की हे भूतबाधा वगैरे होते याला शास्त्रीय बाजू काय?’

'तर म्हणाले, याला काहीच शास्त्रीय पुरावा, स्पष्टीकरण नाही. बाधा झालेली माणसं आणि इतर यात काही शारीरिक फरक पडत नाही. कुठल्याही शारीरिक परीक्षेत तुम्हाला काहीही वेगळे दिसणार नाही, म्हणून ही योनी शास्त्रीय दृष्टीकोनातून सिद्ध झालेली नाही.'

मी विचारले, 'भुते कशी असतात? ती तुम्ही पाहिली आहेत काय?'

गुरूजी म्हणाले, 'याचे उत्तर होय आणि नाही असे आहे! एखाद्याच्या शारीरिक माध्यमातून ते जेंव्हा प्रकट होतात, दिसतात, बोलतात, व्यथा, आशा-आकांक्षा, इच्छा सांगतात. त्यांची पुर्ती केल्या तर ती गेल्याची उदाहरणे आहेत. पण चांदोबा वगैरे मासिकात चित्रे दाखवतात, तशी अतृप्त वासनांच्या रुपामधली भुते मी ही पाहिलेली नाहीत.'

'ही भुते माणसांना कशी पकडतात? मी विचारले.

ते म्हणाले, 'आत्ता पर्यंतच्या अनुभवावरून मी असे म्हणेन की साधारण संध्याकाळ नंतरची ते रात्री बारा पर्यंतची वेळ, एकाकी माणूस व बाधित जागा म्हणजे पुर्वीच्या काळात वापरात असलेली वास्तू, ह्या सर्वांतून बाधेला प्रारंभ होतो. शिवाय कित्येक वेळा असे ही

पाहिलेय की एकाला सोडून दुसऱ्याला पकडायला, त्यांना वेळ काळ लागत नाही.’

‘ही बाधा, भुतं तुम्ही काढता म्हणजे काय करता? त्यांच्या इच्छा तुम्ही पूर्ण करता का?’

गुरूजी म्हणाले, ‘फार छान प्रश्न विचारलात. बऱ्याच जणांचा असा ग्रह होतो की मी भुते काढतो याचा अर्थ मी त्यांच्या उरावरून उठवून माझ्या उरावर घेतो. तसे नाही. मंत्र विकारी वासनांचा नाश करतो, हाच भुते नष्ट होण्याचा खरा मार्ग. तेंव्हा इच्छा पूर्ती करणे म्हणजे भुतांच्या दृष्टीने त्यांना बळकटी देणे नाही काय?’

मी म्हणालो, ‘मला हे कळत नाही की जर त्यांना इच्छा पूर्ती करायच्या असतात तर त्या ते छळ करून कशाला करतात पुर्ण? आता बेबीचेच पहा, तिला ताप, खाज येणे ह्यापासून त्या बाधणाऱ्या व्यक्तीला वासनापूर्तीच्या दृष्टीने काहीच मिळाले नाही?’

गुरूजी म्हणाले, ‘असे आहे, जो पर्यंत तुम्हाला माहित नव्हते तो पर्यंत तिला त्रास नव्हता. साधे उदाहरण घ्या. असे पहा तुम्हाला तहान लागली आहे आणि ते न मागता मिळतेय. पण जर मागितलेत कोणाला, पाणी पाहिजे म्हणून आणि जर त्यानी ते दिले नाही तर

तुम्ही त्यांना हाणता दोन थोबाडीत. पण त्यामुळे तुमची तहान शमली का? नाही! तसेच आहे. बाहेर काढायला लागल्यावर त्रास चालू होतो.'

आणि बरेच प्रश्न विचारावेसे वाटले, पण वेळ व्हायला लागला. शेवटी उठताना म्हणालो, 'आता बेबीची काय काळजी घ्यायची?'

म्हणाले, 'अमावास्या पौर्णिमा सांभाळा. बाहेर जाऊ देऊ नका. जर ती तंद्रीत गेली तर तिला बोलते करा व माहिती काढा. काही हे द्या, ते द्या, काही करा, खायला द्या वगैरे म्हटले तर मानू नका. तुमच्या घरात विहीर आहे म्हणता, तर तिला तिकडे जाऊ देऊ नका. बाकी तुमच्या विचाराप्रमाणे करा. भस्म भरपूर घ्या बरोबर. शिवाय गोमयाच्या गोवऱ्यांची राख करून तीही मंत्रून वापरा पाण्यात टाकून तिच्यावर शिंपडा कधी तंद्रीत गेली तर.'

मंगला व मी बराच वेळ होतो बसलेलो समोरासमोर न बोलता विचार करत.

रात्री बाहेरून कुलूप ठोकून मी घरात वाचत होतो, राम चरित मानसातील काही कांडे. उत्तर रात्र झाली मग मीही झोपलो कंटाळून.

रात्र काहीही न होता गेली. अँटी क्लायमॅक्स वाटला.

## अंधार छाया

## पंधरा

## शशी

लाकडं जमवायला पोरं येत होती. सकाळपासून मी माझी बॅट, स्टंपा आत टाकल्या कोठीच्या खोलीत. बागेतल्या कॉटच्या फळया घरात टाकल्या आणि फाटकाशी होतो लक्ष ठेऊन. कुणी पोरं येत नाहीत ना पहायला!

मन आत होते. मावशीपाशी. गेल्या अमावास्येपासून पंधरा दिवसात बोलत नव्हते कुणी फार. दादा रामायणाचे वाचन करीत, ऑफिसमधून आले की. आई मावशीकडून जपाच्या माळा करून घेई. कुणीच कुणाशी गप्पा मारत नव्हते. ना हसून खेळून होते. त्यात आज पौर्णिमा. दादा आईला सांगत होते, 'आज पुन्हा जपले पाहिजे तिला म्हणून.'

परवा माझ्याच्याने राहावले गेले नाही. मावशीची गोष्ट मी मित्रांना सांगायला लागलो, स्टेशनवरून फिरून येताना. सुभ्या म्हणाला, ‘भिती वाटतेय, पण फार मस्त सांगतोयस रे तू! लिहून काढ कधीतरी.’

पुरणपोळीचे जेवण झाले. मी सुभ्याकडे पाच तीन दोन खेळायला बसलो. संध्याकाळी रिंग खेळायला आमच्या घरापाशी जमलो. आईने घरात बोलावून सांगितले, ‘आज बाहेर खेळा. आपल्या घराच्या अंगणात नको.’ मग आम्ही सगळे बाहेर गेलो खेळायला मिलच्या चाळीकडे.

संध्याकाळ झाली तसा परतलो मी. लता निमा भिडेकडे गेली होती खेळायला. ती ही परतली. दादांना सुटी होती होळीची. दिवेलागणीला आम्ही सगळे घरी परतलो. हात पाय धुवून मी भक्तिमार्ग प्रदीप काढून स्तोत्र आरत्या म्हणायला लागलो. भीमरूपी, रामरक्षा पाठ होती माझी. लतासाठी पुस्तक काढून म्हणायला बसलो. मावशी होती मधल्या खोलीत. मधल्या दारापाशी एका भिंताला टेकून बसली होती. ओट्यात माळ घेऊन करत होती जप पुटपुटत. रामरक्षा झाली. आम्ही मावशीपाशी बसलो जाऊन.

पाटीवर एकशे तीन आकडा होता. आता पंधरा वीस मिनिटांत मावशीच्या एकशे आठ माळा होणार होत्या. साधारण तीन मिनिटे लागत एक माळ व्हायला. साडे पाच–सहा तास लागत असत, बसले सलग रोजचे तर.

साधारण आठचा सुमार असेल, जेवण करून घेतली. बसलो होतो मावशीच्या शेजारी. चांगली हसत बोलत होती, जेवलो तेंव्हा. आता बसली भिंताशी टेकून, अन एकदम चेहरा बदलला.

डोळे एकटक पाहतोय असे झाले. हात पाय ताठरले होते. बसल्या बसल्या मी दादांना म्हणालो, ‘बेबी मावशीला कसतरी होतय. बघा कशी करतेय!

पटापट सगळे हात धुवून आले. मावशी थोडीशी घुमायला लागल्यासारखी करत होती. बोलत मात्र नव्हती. आम्ही गप्प बसून होतो. दादा म्हणाले, ‘म्हणारे ॐ नमः शिवाय मोठ्याने.’ आम्ही म्हणायला लागतो. चांगला तासभर गेला असेल.

साधारण नऊ असतील झालेले. बाहेर होळ्या पेटवून पोरं मोठमोठ्यांनी बोंबलत होती. अर्वाच्य शिव्या देत होती. मी घरातूनच पहात होतो सगळं. चंद्रही बराच वर आला होता. हळूहळू चंद्राला ग्रहण लागायला लागलेले पाहिले. मग मावशीजवळ येऊन बसलो मी.

आई दादांचा जप चालू होता. मावशीला मधेच गुंगी आली असावी. कारण ती शांत वाटली. थोड्या वेळाने हाताचे आळोखे पिळोखे चालू झाले. एकदम उठून उभी राहिली. आम्हीही उठून उभे राहिलो सगळे.

मावशी ओरडून म्हणाली, ‘थांबा कोणी बोंबलू नका. काय दंगा चालवलाय!’

आम्ही गप्प. आमच्यात चुळबुळ झाली. भस्माचा टिळा आईने लावायचा प्रयत्न केला हात झटकून टाकलान. दादांनी टिळा लावायचा प्रयत्न केला तर त्यांचाही हात धरला आणि झटकून टाकलान. मग आम्ही तांब्यातून पाणी आणले भस्म घालून. त्याचा सपकार तिच्या तोंडावर मारला. ढम्म नाही तिला! डोळे तसेच सताड उघडे! इतक्या जोरात पाणी पडले चेहऱ्यावर तरी पापण्या मुळीच लवल्या नाहीत! दोन चार वेळा मंतरलेले पाणी मारले तरी त्याचे तिला काही नव्हते. एखाद्या खांबासारखी उभी होती ती. आमचा जप सारखा चालला होता.

## दादा

जसजशी रात्र आणखी व्हायला लागली तशी बेबी अधिकाधिक रागीट झाली. एक बरे होते, ती व्हायलंट होऊन मारामारी करत नव्हती. तिला बोलते करण्यासाठी जपाचा, भस्माच्या टिळ्यांचा भडिमार चालू होता. शेवटी जेरीला येऊन ती ट्रान्समधून बोलायला लागेल.

उभीच्या उभी ही! तासभर झाला. शेवटी मी अणि मंगलाने तिचे पाय मुडपून बसती करायची प्रयत्न केली पण व्यर्थ गेला.

चंद्रग्रहणाची उच्च सीमा साडेअकराच्या सुमाराला होती. तो पर्यंत तिला जास्तीत जास्त त्रास होण्याची शक्यता गुरूजींनी बोलून दाखवली होती. साधारण अकरा वाजले असावेत. बेबीचा चेहरा खूप निवळल्यासारखा झाला.

## बेबी

म्या लई दम धरला पन ह्यास्नी हरवायला यीना. त्यो गुर्जी पडला भारी. माझी आस पुरी व्हयील असं दिसना. म्हनतानं बाप मेल्याचं सांगावं म्हनून पैल्यांदाच बोलले दादासंगट. पन बेबी बोलती तसच बोललो म्या. त्यांना संशय नको म्हनताना. बाप मेला म्हनताना निघालीती पोचवायला पन दादानं आडावलं भनीला.

माझ्या पायाला लई कळा मारत्यात. समदी म्हनत्यात, 'दे सोडून तिला. ती आता सटकली तुझ्या हातून. काय पायजे ते मागून घे होळीला, गऽऽप सोड तिला आमी बी कंटाळलो हितं...'

मी बी इचार करतो कशापाय़ी ज़्हाव हित ह्यास्नी सांगून टाकावं समदं. ऐकलं आपलं तर बरं हाय. आपली बी आस भागलं. तोंडावर मारत्यात सपकारे त्यांनी माझं थोबाड सुजलय!

## मंगला

साडे अकरा झाले. इकडे ही लागली हलायला डोलायला. आधी होती पुतळ्यासारखी. मग एकदम लागली हातपाय हलवायला.

आम्ही पाण्याचे सपकारे मारले तोंडावर तशी ओरडली, ‘मारताय काय मला पाण्याच्या सपकाऱ्याने?

‘मारणारच तू सोडून जातोस की नाही? जो पर्यंत जात नाहीस तोपर्यंत अशीच पाण्याने मारणार तुला.’ मी म्हणाले.

‘दादा कुठं हाय मला बोलयचंय त्याच्याशी’

मी ह्यांना बोलावले. बेबी त्यांना म्हणाली, ‘मला हित ऱ्हावून देत न्हाई तर मग मला जाऊ दे.’

हे म्हणाले, ‘वा वा! फार छान! आत्ताच चालू लाग.’

‘माझ्या काही अटी हायत. त्या पुऱ्या झाल्या तरच मी जाय़ीन. न्हाई तर कधीच न्हाई!’

‘अटी? अटी बिटी काही नाही. मुकाट्याने जायचे बघ. तेही आत्ताच्या आत्ता!’  हे म्हणाले.

'न्हाई न्हाई अटी पुऱ्या केल्या बिगर माला जाताच येनार न्हाई.'

मी ह्यांना म्हणाले, 'आधी अटी तर ऐकून घेऊ या मग पाहू काय करायचं ते.'

'तू गप्प बस. मला बोलू दे.' दादा म्हणाले, 'काहीतरी मागून बसली तर आपल्याला ते शक्य होणार नाही. तेंव्हा अटी काही ऐकायची गरज नाही.'

बेबी एकदम मधे म्हणाली, 'न्हाई न्हाई... अटी पुऱ्या करा तुमी. त्या शिवाय मला जाता याच न्हाई!'

'अटीबिटी गेल्या उडत. त्यांना आम्ही भीक घालत नाही. पण तू हे सांग, तू कोण? तुझा संबंध काय हिच्याशी? हिला का पछाडलंयस? ते तू बोल.'

बेबी विकृत हसली. म्हणाली, 'संमदं सांगतो. पन मी मागीन ते देनार काय? ते सांगा.'

आजी बसल्या होत्या म्हणाल्या, 'जनार्दना, हो तर म्हण बरे. करायचे का नाही नंतर ठरव.'

## बेबी

'आता सांगावच समदं. आपली आस तरी पुरी करत्याल.'

'माजं नाव झुबैदा. मी हाय पुन्याची. तिकडं शिकलगाराची वस्ती हाय तिथं ऱ्हायाचो मी. लहानपनी मां गेली. अब्बा संगट मीबी चिमटे झारे बनवायचो. फुडं माजा निका मुबारक झाला. त्यो होत जर्द्याच्या फ्याक्टरीत. काही बरसानां तलाक दिलानं. दुसरी शादी केलीनं. मी फुडं बिडी कारखान्यात विडया वळायला ग्येली. पुना विडी कारखान्यातली नोकरी सोडली. मग एकाच्या कांडप मिशनमधी लागतो. लई कुट्टाकरून तिखाटं बनिवलं. माझी भांडाभांड झाली दाल्यासंगट. त्यो म्हनायचा, 'तुला पोर व्हईनात.' म्हनतान एका मांत्रिकाला बोलिवलान, अन माझ्यातलं भूत काढाया लागला. 'पकडा! पकडा! तिच्या वरल्या सावलीला जाळून टाका' म्हनायला लागला. म्या फुडं बेशुध झालो. फुडं मला रोग झाला. आजारी पडत पडत एक दिवशी मेलो! आमच्यात मेल्यावर दफन करत्यात. दफना आधी आंगुळ घालत्यात, साबनान शिककाईनं. खायाला कोंबडी कापत्यात. भात खायाला देत्यात. मला काय बी केलं न्हाय. मला रोगानं मारली तशी माजी लई तळतळ झाली. मला मरताना कोनी बी दुवा न्हाई दिला. तवाच म्या ठरिवलं मरताना सगळं ऱ्हायलं ते करून घ्यायाचं म्हनून!'

## दादा

बेबीचे बोलणे ऐकले. वाईट वाटले. 'मग आता जायला तयार आहेस का?'

म्हणाली, 'आता जायाला पायजे. पन तुमी माजी आस पुरी करनार न्हवं? तर मी जातो.'

मी मंगलाकडे पाहिले. ती मानेने हो म्हणाली. 'मी म्हणालो, ठीक आहे. आम्हाला जमेल तितके करू आम्ही. बोल काय अट आहे तुझी?'

'माला आता आंघूळ घाला. साबनान, शिककाईनं न्हायाला द्या. सव्वाशेराचा भात करा. त्येचात धई, दूद घालून कालवून द्या. अन बेबीच्या हातून हिरीपाशी घेऊन आत टाकायला सांगा.'

मी ऐकून थक्क झालो. आता हिला रात्री बारा आणि एकला न्हायला कोण देणार? बरं भात एक शक्य आहे, पण बेबीला विहिरीकडे जाऊ देणे शक्य नव्हते. तिच्या बोलण्याचा काय विश्वास?

मंगला म्हणाली, ‘आता कोण पेटवणार बंब आणि घालणार अंघोळ? मी नाही बाई करणार हं हे!’

‘का छळतायसा मला! इतकं बी करायचं न्हाई तर मी कशी सोडू हिला?’ बेबी म्हणाली.

‘सव्वाशेराचा भात किती होईल महिती आहे तुला? तो खाता तरी येणार आहे का? तेवढा सगळा विहिरीत टाकायला मी हे मुळीच करणार नाही!’ मंगला म्हणाली.

पुढे बराच वेळ मंगलाचा व बेबीचा वाद झाला. कोपऱ्यातून आजी म्हणाल्या, ‘मंगला कशाला तू वाद घालतेस? असे बघ. ती जाते म्हणतेय ना, घालू तिला न्हायला. यात काय अवघड आहे? भात म्हणावं सव्वा वाटीचा घालते? तेवढ्यावर भागतय का ते विचार.’

‘मला सगळं गैर वाटत होते. बरे हे सगळे करून ती गेली तर ठीक! मनात आलं आत्ताच विचारावं हिला आणखी’

‘तू कशी आणि कुठं पकडलीस हिला?’

ती बोलेना. आम्ही मंतरलेले पाणी तिच्या तोंडावर मारले. ॐ नमः शिवायचा जप पुन्हा जोरात करायला सुरवात केली. वाटले गेला हिचा ट्रान्स. शशी, लता, मंगला व मी चौघे मारत होते पुन्हा पुन्हा पाण्याचे सपकारे तोंडावर. पण पापणीही लवत नह्ती. निर्विकार दगडी झाले होते तिचे शरीर.

बऱ्याच वेळाने हालचाल झाली. म्हणाली, 'देतायसा न्हवं खायाला, अंघुळीला?'

मी म्हणालो, 'हो घालू, पण भात सव्वा वाटीचा घालू! आणि मुख्य म्हणजे ते विहीरीशी जाऊन मी टाकेन. बेबीला नेवू देणार नाही!'

पुन्हा वादावादी झाली. तडजोड म्हणून मंगला म्हणाली, 'बरं, ह्यांच्या बरोबर बेबीला नेऊ विहिरीशी. पण भात विहीरीत टाकणार ते हेच!'

कशीबशी हो म्हणाली. मंगला बंब पेटवायला गेली. आजींनी भात करायला तांदूळ वैरले. मी बेबीला म्हणालो, 'तू कोण ते कळलं, पण बेबीला का पकडलेस? किती दिवस झाले हिला पकडून?'

'किती दीस झाले ते न्हाई आता आटवत. पर हां एक डाव संध्याकाळच्याला चिंचा वेचाया आलीती तवा पासून हेरली मी तिला.

पाडली एक डाव ठेचकाळून. चढलो हिच्यात. पर काय बी तरास दिला न्हाई. ती काय खाईल पीईल ते खायाची. तिच्या शाळेच्या पुस्तकाचा मला तरास वाटं!'

'आता हिला सोडून तू काय करणार?' मी विचारले. म्हणाली, 'आता मी काय ऱ्हात न्हाई!'

'ती काजळाची डबी पाकिटातून गायब झाली ती कुठं गेली?' मी विचारले.

'त्यो मास्तरडा हाय त्येनं हीरीत फेकली म्हनाला.'

जास्त विचारण्यात काही अर्थ नव्हता. मी जरा तंबाखूचा बार भरायला उठलो. बाहेर होळीच्या लाकडांची राख धुगधुगी धरून होती. चंद्र ग्रहणचा काल संपला होता. मंद मंद वारा आला. तसे अंगावर रोमांच उभे राहिले. ग्रहण काळानंतर गेली ही तर किती बरं चार महिन्याचा वनवास संपेल एकदचा.

**आजी**

मंगलाने कडकडीत पाणी तापवलेन. तोवर मी भात तयार केला. ताटात घालून दही-दूध ओतून सरबरीतसा काला केला. वाईट

वाटले सगळे हे वाया चालले याचे. शिककाईची पूड पाण्यात भिजत घातली.

बेबीला उठवून मोरीत नेली. मी वरून शिकेकाईचे पाणी घातले. मंगलाने डोक्याला खसाखसा चोळलेन. भडाभडा तांबे घातलेन अंगावरून, डोक्यावरून. तिला तशी मध्यम शुद्ध होती. अंघोळ घालतायत इतपत कळतेय असे वाटले.

पंचाने केस बांधले. टॉवेल घेऊन साडी सोडलीन. कोठीच्या खोलीत आणून साडी नेसायला दिली. मंगलाने भाताचे ताट घेऊन जनार्दनला हाक मारली. मी मनानेच हिरव्या चुड्याच्या बांगड्यातल्या दोन बांगड्या ताटात ठेवल्या. वाटले सवाष्णीला नाही का ठेवत आपल्यात. जाऊ दे, एवढे केलेय आता तिची पिडा संपू दे. म्हणजे सुटली. जनार्दनने तो ताटातला भात बेबीला दाखवला. विहिरीकडे निघाला. मंगलाने बेबीचा हात धरून नेलेन विहिरीकडे. विहीरीतल्या पाण्याचा आवाज ऐकला. जनार्दन, मंगला, बेबी परतल्या घरात. मी मीठमोहऱ्या तयारच ठेवल्या होत्या. ओवाळून टाकल्या सर्वांवरून. म्हणाले, 'सर्व अरिष्ट जाऊ देत गं बेबी!' सगळयांनी बसून अकरा माळा केल्या. रात्रीचे दोन वाजून गेले असावेत!

बेबीला जवळ घेऊन मंगला झोपली.

## डॉ. फडणीस

‘खाडीलकरबाई, हा हिचाच केसशीट आहे ना? कारण गेल्या दोन आठवड्यात तिचे वजन पाच पौंडानी वाढलेय!’ मिस सरोजचा गालगुच्चा घेतला. म्हणालो, ‘आता तुझे गाल सफरचंदासारखे दिसताहेत. काय औषध खाल्लेस?’ मीच डॉक्टर असून मला प्रश्न पडला होता! मिसेस ओक आल्या होत्या बरोबर. त्यांनी सांगितले तिला काही बाधा झाली होती म्हणे! होळीच्या पौर्णिमेनंतर दोन आठवड्यात तिची शारीरिक वाढ इतक्या झपाट्याने झालेली होती की मला सुद्धा केसशीटवरच्या नोंदीत काही चूक असावी असे वाटले क्षणभर!

## बेबी

डॉ फडणीसांकडून आले. अक्का दादांना सांगत होती, डॉक्टर काय म्हणाले ते. अन माझा मलाच आनंद झाला. मी सुटले होते सुखरूप. गेल्या आठपंधरा दिवसात किती हुरूप किती उत्साह आला होता. सगळं जगच बदललं होतं माझं.

गुरूजींना भेटायला गेलो तर ते एकदम म्हणाले, ‘अभिनंदन सुटलीस याबद्दल!’ गुरूजी जेवायला घरी आले, तेंव्हा मी किती आग्रहानं घातले एक एक पदार्थ! दादांनी माझ्या हातानी धोतरजोडी दिली त्यांना. ‘रोजच्या रोज माळा करायच्या न चुकता.’ गुरूजींनी आशीर्वाद देताना म्हटले.

घरी जावे आई, काकांना, सुभा, श्रीकांता, सुमन सगळ्यांना भेटावं असं वाटू लागलं अक्काला म्हणाले, तर ती म्हणाली, ‘पुढच्या आठवड्यात जाऊ. मी पण बरोबर येते. पोचती करते काका काकूच्या हवाली. सगळी हकीकत सांगते सविस्तर.’

होळीनंतर ती बाई लांब रेल्वेच्या फाटकापाशी आहे असे वाटे. काही दिवसांनी पार लांब गेली बुधगावच्या वाटेला. असे करत करत ती आठवेनशी झाली, पंधरा वीस दिवसात!

**मंगला**

बेबीनं देवाला नमस्कार केलानं, आजींना केलानं, ह्यांना केला तशी ह्यांनी आशीर्वाद दिला, डोक्यावरून हात ठेऊन. जवळ ओढली, पाठीवर शाबासकी देत म्हणाले, ‘आता सांभाळून रहा.’ माझ्याजवळ आली तशी ओढली छातीशी. दोघींच्या डोळयातून धारा लागल्या होत्या आसवांच्या. म्हणाली, ‘अक्का माझ्यामुळं किती त्रास झाला तुम्हाला! घरातली शांतता नष्ट झाली. शशी लताचे अभ्यास बुडाले!’ मी म्हणाले, ‘बाई, तू बरी झालीस यात सर्व आलं! आता छान अभ्यास कर. पास हो की मग उडवून देऊ बार तुझा!’

पुण्यात टांग्याने घरापाशी उतरलो. तो इंदूताईंनी दारातून पाहिलं आम्हाला. ‘अग्गो बाईsss कोण हीsss बेबी काsss?’ म्हणाल्या. काका काकूंनी पाहिलं आम्ही आलोय ते आणि ते थक्क झाले, बेबीची ही टम्म फुगलेली छबी बघून!

‘शांते, ही आमची बेबी वाटतं? काका म्हणाले चेष्टेने अन मला खूप आनंद झाला. चहा झाला. बसले सगळे अवती भवती. सावकाश हकीकत सांगता सांगता किती वेळ गेला कळलंही नाही.

# समाप्त

# चित्रमय परिचय



Figure 1माधवनगरचा गुरूवार पेठेतला आमचा त्या वेळचा बंगला. मी (शशी) आपल्या मित्रांसह रिंग खेळताना



Figure 2 त्याच जागेतील नव्या बंगल्याचे रूप



Figure 3 प्रज्ञानानंद सरस्वती - आई व वडिलांचे गुरू. यांनी इस्लामपुराच्या वास्तव्यात मराठीत श्रीराम चरितमानसाचे रुपांतर केले.



Figure 4 रेल्वेस्टेशन पलिकडील विठोबाचे मंदीर



Figure 5 माझ्या वडिलांचा कापडाचा व्यवसाय इथे तेंव्हाचे लक्ष्मी नंतर अनंत मग सध्या पुन्हा श्रीलक्ष्मी चित्रपटगृहात सुरू झाला. खुर्चा काढून मोकळ्या जागी तागे व मालाच्या गाठी रचलेल्या असत. पडद्याजवळच्या स्टेजवर वडिलांचे ऑफिस असे.



Figure 6 एके काळी माधपनगरची शान कॉटन मिल व साखर कारखाना काळाच्या ओघात आपले अस्तित्व गमावून बसलेत.




**Figure 7** (वर) दादा व आई त्यांच्या लग्नाच्यावेळी व (खाली) कादंबरीतील काळाच्या सुमारास





Figure 8 सध्या अशा दिसतात बेबी व मंगला








Figure 9 सध्याच्या अवतारात लता व शशी



Figure 10 बेबीचे बंधू सुभाष व श्रीकांत



Figure 11 लेखक - शशिकांत ओक

## प्रत्येक व्यक्तिमत्वाच्या छायेत अंधार लपलेला असतो. त्याचा शोध घेणारी सत्यघटनांवर आधारित कादंबरी

आत्मनिवेदनातून फुलत जाणारी कथा वस्तू, बोली भाषेतील वाक्य रचना, सर्व पात्रे रोजच्या घसटीतील असल्या सारखी आहेत. लेखन 'जसे घडले तसे' या स्वरूपात आहे. त्यात अतिशयोक्ती वा वातावरण निर्मितीसाठी रंगवून केलेले वर्णन नाही.

योग्य गुरूच्या मार्गदर्शनामुळे चिकाटी, दृढ श्रद्धेच्या जोरावर आसुरी शक्तींशी समर्थपणे लढा देता येतो व विजय मिळवता येतो. हे पटवून देणारे उदाहरण म्हणून या सत्यघटनांकडे बोट दाखवता येईल.

या कादंबरीची नाळ गुरूचरित्राच्या पारायणाच्या प्रचितीशी जोडली गेली आहे. प्रत्येक पारायणाच्या नंतर विविध तऱ्हेच्या घटना, प्रेरणा, व्यक्तींच्या भेटी प्रसाद रुपाने येत राहिल्या. नाडी ग्रंथ भविष्य, ऑटो रायटींग आदि विषयांची गोडी व त्यावर लेखन कार्य हे त्याच कडीतील एक भाग आहेत.

ॐ नमःशिवाय या पंचाक्षरात मंत्रसामर्थ्य आहे. या नामजपाने मनोशक्ती तयार होऊन मानवेतर योनीतील प्रभावावर उपाय म्हणून उपयोग होतो, याचे धडधडीत उदाहरण म्हणून ही घटना मानता येईल'.

कादंबरीचे उपनामकरण विषय-वस्तूला समर्पक ॐ नमः शिवाय असे दिले आहे.

**नेहा ईबुक प्रकाशन**

**किंमत रु. 200**

मो. 9881901049

shashioak@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंटरनेट आणि मोबाईल क्रांतीचा उपयोग मराठी भाषेच्या, साहित्याच्या आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी करणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यातील एक आहे ई साहित्य प्रतिष्ठान. ई साहित्य प्रतिष्ठान दरमहिन्याला किमान चार ते दहा मराठी ई पुस्तके प्रकाशित करून ती सुमारे सव्वा दोन लाख वाचकांपर्यंत पोहोचवते. यात खेड्यापाड्यातील वाचक असतात तसेच सातासमुद्रापलिकडचेही.

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे .

आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद .

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनतातुम्हाला ई . त्यांच्या .लवर सर्वात आधी मिळतंसाहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मे त्यांच्या .त्यांच्या योजनांची माहिती मिळते .कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं .कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतातमिळाली की ते त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं . त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई .इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात .साहित्यचे प्रतिनिधी बनता

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावताआमचा उद .्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणंहे केवळ आणि केवळ मराठी आणि हे लक्ष्य साध्य करणं . आपल्या भाषेचं .लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून .हुतात्मे झाले १०६ राज्य व्हावं म्हणून वीस-आपण एक दहाई मेल आयडी देणारच नावाचनाची आवड असो वा ! त्यांना .चे ई मेल पत्ते पाठवाफ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकां .नसो करूनच .लावूच लावू .आपणच लावू .वाचनाची आवड आपोआप लागेल .दाखवू

आहे ना .तीन कामं : एक दम :

संपर्क साधा :esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहेत्यामुळे आपले मित्र आपल्यावर . मेल्सचा वापर फ़क्त शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई .खुश होतील इतर कसल्याही .आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल तेव्हा लवकरात लवकर .जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिकमराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान